जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार २६ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

शाळांसाठी 'एफडीए'कडून विशेष कार्यशाळेचे आयोजन

मुंबई /प्रतिनिधी- अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्ततुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात एफडीएच्या कारवाईचा राज्यभर धडाका सुरू आहे. मात्र, त्याचसोबत त्यांच्याकडून जनजागृती आणि संबंधितांना मार्गदर्शनही तितकेच केले जात आहे. शाळकरी मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची नियमावली जाहीर केल्यानंतर मुलांच्या आरोग्याची हेळसांड होउ नये, आणि शिक्षक तसेच शाळा प्रशासनांना नव्या नियमावलीची योग्य माहिती व्हावी याकरता एफडीएच्या वतीने राज्यस्तरीय कार्यशाळांची एक व्यापक मोहीम राबवण्यात आली, ज्याला राज्यभरातून ऊत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.२८ जुलै ते २१ ऑगस्ट दरम्यान राज्यभरातील शाळांना त्यांच्याकरता आखून दिलेल्या नियमावलीची माहिती व्हावी याकरता राज्यभरात ९८ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात २२ हजार ४४३ शाळांनी सहभाग घेतला होता, ज्यात २५ हजार १०८ शिक्षक सहभागी झाले होते. याशिवाय २५० शाळांची तपासणी या कालावधीत करण्यात आली, तेव्हा त्यातील ११ आस्थापनांचे परवाने निलंबत तर ४ ठिकाणी परवाने रद्द करण्यात आले आहेत. तर अतिशय गंभीर अवस्थेत असलेल्या २ ठिकाणचे व्यवसाय थेट बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गेल्या आठवड्याभरात एफडीएच्या पथकाकडून राज्यभरातील एकूण ४५ हाटेल, रेस्टारंट आणि धाबा यांची तपासणी करण्यात आली. त्यातील ३३ आस्थापनांना सुधारणा नोटीस देत ११ आस्थापनांचे परवाने निलंबन करण्यात आले आहेत. ज्या वांद्रे-कुर्ला संकुलातील प्रतिष्ठित मुंबई क्रिकेट असोसिएशनमधील आस्थापनांसह दादरच्या शिवाजी पार्क परिसरातील आयकानिक कॅफे कॅडेलाचाही खाद्य परवाना निर्लंबित करण्यात आला आहे.

धक्कादायक! महिलेची रस्त्यावरच प्रसूती

ग्रामीण रूग्णालय हाकेच्या अंतरावर तरीही मदत नाही

बुलढाणा/प्रतिनिधी : राज्यातील आरोग्यसेवेचे धिंडवडे निघाल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. मागील काही वर्षांत शासकीय रु ग्णालयांमध्ये आग लागून रु ग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या. नुकतेच अमरावती येथील शासकीय महिला रु ग्णालयाला भीषण आग लागून नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती.

आदिवासी भागात आरोग्यसेवा, रस्ते आणि दळणवळणाच्या सुविधांचा अभाव असल्यामुळे गरोदर महिलांना प्रसूतीसाठी खाटेवरू न अनेक किलोमीटर अंतर पार करून रु ग्णालयात नेल्याच्या घटना नवीन नाहीत. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर आणि जळगाव जामोदसारख्या आदिवासीबहुल तालुक्यांतही अशी परिस्थिती वारंवार दिसून येते. मात्र, तुलनेने विकसित समजल्या जाणा-या मेहकर शहरातही अशीच संतापजनक घटना घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

नेमके काय घडले?-मेहकर ग्रामीण रु ग्णालयापासून अवघ्या ५० ते १०० मीटर अंतरावर एका महिलेची रस्त्यावरच प्रसूती झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (२५ ऑगस्ट) घडली. प्रसूतीच्या वेदनांनी महिला तडफडत असताना ग्रामीण रु ग्णालयातील कर्मचा-याने हाकेच्या अंतरावरील घटनास्थळी येण्यास नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. महिलेची गंभीर अवस्था पाहून योगेश सौभागे यांनी ग्रामीण रु ग्णालयात धाव घेउन मदतीची विनंती केली. मात्र, डॉक्टर ऊपलब्ध नसल्याचे सांगत महिला कर्मचा-याने बाहेर येण्यास नकार दिल्याचा आरोप सौभागे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

नागरिकांमध्ये संतापाची लाट

अखेर एका खासगी रु ग्णालयातील नर्सने घटनास्थळी धाव घेत रस्त्यावरच महिलेची प्रसूती केली. त्यानंतर महिला आणि नवजात बाळाला पुढील ऊपचारासाठी खासगी रु ग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट ऊसळली असून, जीवावर बेतलेल्या अशा आपत्कालीन परिस्थितीत शासकीय आरोग्य यंत्रणेची भूमिका आणि ग्रामीण रु ग्णालयातील ड?क्टरांच्या ऊपस्थितीवर गंभीर प्रश्नचिन्ह ऊपस्थित झाले आहे.

शहरात तणावाचे वातावरण- मेहकर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संजय रायमुलकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत सामान्य नागरिकांना त्रास होत असल्यास ग्रामीण रु ग्णालयाच्या कारभाराकडे लक्ष देण्याचा इशारा दिला आहे. दुसरीकडे, या घटनेची, करण्यात आलेल्या आरोपांची आणि संबंधित अधिकारी-कर्मचा-यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करू न जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे. या घटनेमुळे मेहकर शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

फायर ऑडिटकडे 37 दिवस दुर्लक्ष?

जिल्हा स्त्री रूग्णालयातील आगीच्या प्रकरणात धक्कादायक माहिती!

अमरावती/प्रतिनिधी- येथील जिल्हा स्त्री रु ग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत तीन बालकांच्या मृत्यू प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाचा निष्काळजीपणा चव्हाट्यावर आला आहे. रु ग्णालयाचे फायर ऑडिट करू न घेण्यासाठी रु ग्णालय प्रशासनाने वारंवार पत्रव्यवहार करू नही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागाने तब्बल ३७ दिवस याकडे दुर्लक्ष केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

२५ जून रोजी दिले होते पत्र- जिल्हा स्त्री रु ग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार यांनी पीडब्ल्यूडीला फायर ऑडिट करण्यासाठी २५ जून रोजी पत्र दिले होते. त्यावर कार्यवाही झाली नाही. म्हणून त्यांनी १७ जुलैला स्मरणपत्रही पाठवले. मात्र त्याकडे ३७ दिवस दुर्लक्ष करण्यात आले. डॉ. पवार यांनी कार्यकारी अभियंता व ऊपअभियंत्यांशी वेळोवेळी संपर्क साधला असता प्रक्रिया सुरू असून लवकरच एजन्सी नियुक्त केली जाईल, अशीच ऊत्तरे दिली जात होती. मात्र तब्बल ३७ दिवस कोणतीही प्रत्यक्ष पाहणी किंवा सुरक्षा तपासणी झाली नाही, हे स्पष्ट झाले आहे.

महिनाभरापूर्वी वॉशिंग मशिन जळाली- सुमारे एक महिन्यापूर्वी रु ग्णालयाच्या एका कक्षात व?शिंग मशिन जळून खाक झाली होती. कर्मचा-यांनी ही घटना वरिष्ठांपासून लपवून ठेवली. त्यावेळी जर विद्युत यंत्रणेची तपासणी झाली असती, तर संभाव्य धोका ऊघडकीस येउ शकला असता, असे ➪(पान २ वर)

डोळ्यात अडकली बंदुकीची गोळी

- मोठी चिरफाड टाळून 'टोन्स'ने काढली,
- एम्स नागपूरचा पहिला प्रयोग यशस्वी

नागपूर : डोळ्याच्या खोबणीत अडकलेली बंदुकीची गोळी मोठी शस्त्रक्रिया न करता अत्यल्प छेदातून बाहेर काढण्यात एम्स नागपूरच्या डाक्टरांना यश आले. मध्य प्रदेशातील ३६ वर्षीय व्यक्तीवर ट्रान्सऑर्बिटल न्यूरो-एन्डोस्कोपिक शस्त्रक्रिया (टोन्स) ही अत्याधुनिक कमी छेदाची पद्धत प्रथमच यशस्वीपणे करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर रु ग्णाचा डोळा बाहेर येणे आणि डोळ्याच्या खोबणीतील वेदना पूर्णपणे दूर झाल्या.



बंदुकीची गोळी लागल्यानंतर ती डाव्या डोळ्याच्या खोबणीत आणि लगतच्या परानासल सायनसमध्ये अडकली होती. त्यामुळे डोळा बाहेर येणे, डोळ्याच्या खोबणीत वेदना आणि डोळ्यांच्या हालचालींवर मर्यादा निर्माण झाली होती. विविध विभागांच्या तज्ज्ञांनी तपासणी केल्यानंतर रु ग्णाचा कायम राहणारा त्रास, परानासल सायनसशी गोळीचा संपर्क आणि संसर्गाचा संभाव्य धोका लक्षात घेउन गोळी काढण्याचा निर्णय घेण्यात आला. शरीरात राहिलेल्या धातूच्या गोळीमुळे भविष्यात चुंबकीय अनुनाद प्रतिमांकन तपासणीत अडचणी येण्याची शक्यताही होती.

ट्रान्सऑर्बिटल न्यूरो-एन्डोस्कोपिक शस्त्रक्रिया म्हणजे डोळ्याची खोबण ➪(पान २ वर)

परप्रांतीय रिक्षावाला परतीच्या वाटेवर

मुंबई/प्रतिनिधी : सोशल मीडियात सध्या मराठी हा हॅशटॅग ट्रेंडिंगमध्ये आहे, त्याचं कारण म्हणजे परिवहन मंत्र्यांनी राज्यातील रिक्षाचालकांना मराठीत संवाद साधनं बंधकारक केलं आहे. विशेषतः मुंबईत जे परप्रांतीय रिक्षाचालक आहेत, त्यांच्यासाठी सरकारनं मराठीचे धडे द्यायलाही सुरु वात केली आहे. जिथं आपण पोटापाण्यासाठी काम करतो तिथली स्थानिक भाषा यायला हवी, तसेच मराठी अर्थात आपल्या मातृभाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी हे पाउल ऊचलण्यात आले आहे. पण याला काही परप्रांतीयांनी विरोध दर्शवला आहे. त्यातून एकाने परत आपल्या मूळ राज्यात परत जाण्याचा निर्णय घेताना सोबत ट्रेनमधून रिक्षा घेउन जात असतानाचा एक व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. त्यामुळे मराठी सत्तीचा यांनी चांगलाच धसका घेतल्याचे चित्र आहे.

सोशल मीडियात जो व्हीडीओ व्हायरल होत आहे तो एका रेल्वे प्लॅटफार्मवरचा व्हीडीओ आहे. प्लॅटफार्मवर रेल्वेगाडी थांबलेली असून या गाडीच्या लगेजच्या अर्थात पार्सलच्या डब्यात जिथून दुचाकी वाहने, तीनचाकी वाहनांची इतर राज्यांमध्ये सुरक्षितरीत्या वाहतूक केली जाते. या डब्यात एक रिक्षाचालक इतर काही लोकांच्या मदतीने आपली रिक्षा कोंबताना दिसत आहे. पण हा व्हीडीओ मराठीच्या सत्तीमुळे परत निघालेल्या रिक्षाचालकाचा आहे की नाही? याबाबत अद्याप पुष्टी होउ शकलेली नाही. पण मराठी ➪(पान २ वर)

टीम भाजपानंतर आता केंद्रीय कॅबिनेटमध्ये होणार फेरबदल

१२ रिक्त जागांवर येणार नवे चेहरे?

नवी दिल्ली - भारतीय जनता पार्टीच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा झाल्यानंतर आता केंद्रीय कॅबिनेटमधील फेरबदलाची चर्चा सुरू झाली आहे. या विस्तारात नवीन चेहरे, युवा आणि महिलांचा समावेश, आगामी विधानसभा निवडणुका आणि २०२९ ची लोकसभा निवडणुकीची समीकरण पाहून नेत्यांचा समावेश केला जाणार आहे. संविधानाच्या अनुच्छेद ७५(१A) नुसार केंद्रीय मंत्रिमंडळात पंतप्रधानांसह कमाल ८१ मंत्री असू शकतात. सध्या कॅबिनेटमध्ये ६९ मंत्री आहेत, म्हणजेच यातील १२ जागा रिक्त आहेत.सध्याच्या मंत्रिमंडळात १४ ➪(पान २ वर)

सामाजिक न्यायाचा निधी वळवणे असंवेदनशील-सुळे

मुंबई : सामाजिक न्याय विभागाचा हक्काचा निधी इतर योजनांकडे वळवून सरकार शोषित, वंचित आणि गरीब घटकांवर अन्याय करत असल्याचा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

सामाजिक न्याय विभागासाठी अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जात असल्याबद्दल सुळे यांनी संताप व्यक्त केला. जो शोषित, वंचित आणि दुर्बल घटक आहे, त्याच्या कल्याणासाठी असलेला पैसा काढून घेणे अत्यंत असंवेदनशील आहे. निवडणुका आल्या की अशा ➪(पान २ वर)

आदिवासी वसतिगृह प्रवेशासाठी 30 वर्षांची वयोमर्यादा रद्द

- पुण्यातील आदिवासी विद्यार्थी आंदोलनाला मोठे यश
- आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागणीनंतर सरकारचा मोठा निर्णय

मुंबई/प्रतिनिधी : गेल्या १२ दिवसांपासून विविध मागण्यांसाठी पुण्यातील मांजरी येथे आदिवासी विद्यार्थी आंदोलन चालू आहे. त्यातील एका आंदोलकांची प्रकृती खालावल्याने विद्यार्थ्यांमध्ये संताप ऊसळलाय. त्याचदरम्यान सरकारनं मोठी घोषणा केलीय. शासनाने आज आंदोलनाच्या १३ दिवशी वसतीगृहाबाबतचा निर्णय अखेर रद्द केलाय.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर आणि वाढत्या दबावानंतर अखेर राज्य सरकारनं मोठा निर्णय घेत आदिवासी विभागांतर्गत येणा-या वसतीगृहांमध्ये प्रवेशासाठी लाग करण्यात आलेली ३० वर्षांची वयोमर्यादा रद्द करण्यात आलीय. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने त्याचबरोबर लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करून १४ ऑगस्ट २०२६ रोजीचा शासन निर्णय तसेच त्यानुषंगाने जारी करण्यात आलेली एकत्रित सुधारित नियमावली ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती आदिवासी विकास मंत्री डा.अशोक वूईके यांनी दिली. शासकीय आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोयी-सुविधा, प्रवेश प्रक्रिया तसेच वसतिगृह व्यवस्थापनाच्या विविध बाबींवर आदिवासी विकास मंत्री डा. अशोक वूईके यांच्या अध्यक्षतेखाली आज त्यांच्या निवासस्थानी लोहगड येथे बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्यांनी माहिती दिली. या बैठकीस मंत्री नरहरी झिरवळ, आदिवासी खासदार, आमदार,आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे,आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) आयुक्त निलेश सागर यावेळी ऊपस्थित होते.

शासकीय आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व आवश्यक सोयी-सुविधा प्रभावीपणे ऊपलब्ध करू न देण्यासाठी तसेच वसतिगृह व्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी प्रवेश प्रक्रिया, सोयी-सुविधा, प्रशासकीय कार्यपद्धती, देखरेख व तपासणी याबाबत सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होउ नये आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस पोषक वातावरण ऊपलब्ध व्हावे, यासाठी आवश्यक त्या ऊपाययोजना करण्याचे निर्देश मंत्री वूईके यांनी बैठकीत दिले. ➪(पान २ वर)

राहुल गांधींचा क्रिती सेनॉनला पाठिंबा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : बालिवूड अभिनेत्री क्रिती सेनानला एका जाहिरातीवरु न ट्रोल केलं जातं आहे. यावरु न भाजपा खासदार आणि अभिनेत्री कंगनानेही तिच्याविरोधात पोस्ट केली होती. दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी क्रितीला पाठिंबा दिला आहे. राहुल गांधींनी क्रितीची इन्स्टा स्टोरी पोस्ट करत त्यावर रिप्लाय दिला आहे. रक्षाबंधनच्या या जाहिरातीत क्रिती सेनानने परिधान केलेल्या पोशाखामुळे सोशल मीडियावर वाद निर्माण झाला. असे कपडे का घातले गेले आहेत? असा प्रश्न नेटकरी विचारू लागले. ज्यानंतर आता राहुल गांधींची प्रतिक्रिया चर्चेत आली आहे.

नेमकं प्रकरण काय आहे? अभिनेत्री क्रिती सेनान नुकतीच एका ज्वेलरी ब्रँडच्या रक्षाबंधनच्या जाहिरातीत दिसली होती. या जाहिरातीत सण साजरा करताना तिने ऑफ-व्हाइट रंगाचा ब्रालेट-स्टाईल ब्लाऊज, त्यावर केप आणि ड्रेप्ड स्कर्ट परिधान केला होता. तिचा हा पोशाख रक्षाबंधन साठी शोभत नाही असं म्हणत नेटक-यांनी तिला ट्रोल केलं. एवढंच नाही तू असे कपडे घालून संस्कृती बिघडवते आहेस वगैरे टीकाही केली. पण क्रिती शांत होती. अभिनेत्री आणि खासदार कंगनाने मात्र क्रितीला जे खडे बोल ऐकवले त्यानंतर तिने सडेतोड ऊत्तर दिलं. ➪(पान २ वर)

पाटण्यात विद्यार्थी आंदोलन चिघळले, पोलिसांकडून लाठीमार

पाटणा/प्रतिनिधी : बिहारमध्ये पुन्हा एकदा विद्यार्थी आंदोलन पेटले असून, पाटणा येथील जनकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिहार आरोग्य विज्ञान विद्यापीठाबाहेर आंदोलन करत असलेले विद्यार्थी आणि पोलीस आमने-सामने आले. यावेळी पोलिसांना आंदोलकांवर लाठीमार केला. तर आंदोलक विद्यार्थ्यांनीही पोलिसांवर हल्ला केला. यात दोन पोलीस जखमी झाले आहेत.निकालामध्ये झालेल्या कथित अफरातफरीच्याविरोधात आज हजारो विद्यार्थ्यांनी बिहार आरोग्य विज्ञान विद्यापीठाबाहेर गोळा झाले होते. तसेच आपल्या मागण्या घेउन आंदोलन करत होते. आंदोलनादरम्यान काही विद्यार्थ्यांनी गोंधळ घातला. तसेच विद्यार्थ्यांनी आर्यभट्ट विजद्यापीठाच्या आवारात मोडतोड केल्याचा आणि तेथील कर्मचा?यांना मारहाण केल्याचा दावाही केला जात आहे.दरम्यान, या आंदोलनावेळी आंदोलनकर्ते विद्यार्थी आणि पोलीस आमनेसामने आल्याने परिस्थिती आणखीनच चिघळली.

➪(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

रक्षाबंधन दोन दिवसांवर आले

लाडक्या बहिणींना पैसे कधी मिळणार?

मुंबई/प्रतिनिधी :रक्षाबंधन दोन दिवसांवर आलं तरी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जुलै महिन्याचा हप्ता अद्याप लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झालेला नाही. मात्र आता या लाडक्या बहिणींना

दिलासा देणारी माहिती समोर आली आहे. लाडक्या बहिणींना जुलै महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून ३४४ कोटी रु पयांचा निधी महिला आणि बालकल्याण विभागाकडे वर्ग केला आहे. या संदर्भातील जीआरही काढण्यात आला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना जुलै महिन्याचा हप्ता देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच लवकरच ही रक्कम लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होणार आहे.

राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र असलेल्या महिलांना सदर योजनेच्या हप्त्याची रक्कम ही पुढच्या २४ ते ४८ तासात मिळू शकते. त्यामुळे रक्षा बंधनाच्या तोंडावर या योजनेतील पात्र महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या संपूर्ण पडताळणी आणि ई-के वायसीनंतर या योजनेतील लाभार्थी महिलांची संख्या २.४८ कोटींवरून घसरून थेट १ कोटी, ६५ लाख, ६६ हजार, १६४ वर आली आहे. लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या १.६५ कोटींवर स्थिरावल्यामुळे या योजनेचा आर्थिक भार आता दरमहा २,४८४.९२ कोटी रु पये इतका असून वार्षिक खर्च २९,८१९.१० कोटी रु पयांवर आला आहे. तर अपात्रतेच्या निकषांनुसार ९२.१० लाख नोंदी रद्द करण्यात आल्या आहेत.

पान १ व १० वरून

फायर ऑडिटकडे 37 दिवस

सांगितले जात आहे. पहाटे अतिदक्षता विभागातील व्हेंटिलेटरमध्ये शॉर्ट सर्किटमुळे स्फोट झाला. मात्र, अग्निशमन यंत्रणेचा अलार्म वाजलाच नाही. त्यामुळे आग आणि धूर पसरल्यानंतरच हा प्रकार लक्षात आला.

व्हेंटिलेटरच्या दर्जावर प्रश्नचिन्ह-या दुर्घटनेत व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्याची माहिती पुढे आल्यानंतर व्हेंटिलेटरच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह ऊपस्थित केले जात आहे. हे ऊपकरण नागपूर येथील एका कंपनीने पुरवले होते. अवघ्या आठ महिन्यांपुर्वी हे ऊपकरण बसविण्यात आले होते, अशी माहिती समोर आली आहे. या ऊपकरणाचा दर्जा तपासायला हवा. निकृष्ट दर्जाची ऊपकरणे खरेदी केल्यामुळे विद्युत भाराचा ताण येउन हा स्फोट झाला का, याची ऊच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी करण्यात येत आहे. दुसरीकडे, एवढी मोठी आग लागूनही फायर अलार्म वाजला नाही. तसेच फायर फ?गरही कार्यान्वित झाले नाही. विशेष म्हणजे या दोन्ही यंत्रणा तुलनेने नव्याच आहेत. या यंत्रणेच्या गुणवत्तेवर शंका ऊपस्थित होत आहे.

डोळ्यात अडकली बंदुकीची

हा नैसर्गिक मार्ग वापरू न केली जाणारी कमी छेदाची शस्त्रक्रिया. अत्यल्प छेदातून दुर्बिणीद्वारे डोळ्याची खोबण, तिचा मागील भाग आणि कवटीच्या तळाशी असलेल्या रचना स्पष्टपणे पाहता येतात.

या पद्धतीचा फायदा काय?मोठी बाह्य शस्त्रक्रिया टाळून अत्यल्प छेदातून ऊपचार करता येतात. निवडक डोळ्यांचे विकार, डोळ्याच्या खोबणीच्या मागील भागातील आजार, कवटीच्या तळातील विकार तसेच अडकलेल्या परक्या वस्तू काढण्यासाठी ही पद्धत ऊपयुक्त ठरते.टोन्स पद्धतीची पहिलीच शस्त्रक्रिया

दुर्बिणीद्वारे गोळी थेट पाहून ती यशस्वीपणे बाहेर काढण्यात आली. गोळी काढल्यानंतर रु ग्णाचा डोळा बाहेर येण्याची स्थिती आणि वेदना पूर्णपणे दूर झाल्या. एम्स नागपूरमध्ये टोन्स पद्धतीने करण्यात आलेली ही पहिलीच शस्त्रक्रिया आहे.

शस्त्रक्रियेत कोण सहभागी होते?मेंदू व मज्जातंतू शल्यचिकित्सा विभागातील डा. अलोक ऊमरेडकर, डा. अनिलकुमार बी.सी. आणि डा. मयूर इंगळे; कान-नाक-घसा विभागातील डा. विजय बिडकर, डा. आशिमा सक्सेना, डा. रिशान टी.के. आणि डा. रोहित बोंडेकर; भूलशास्त्र विभागातील डा. गजानन चौहान आणि डा. मंगेश मुलाओकर यांचा सहभाग होता. नेत्ररोग विभागानेही महत्त्वाचे सहकार्य केले.

एम्स नागपूरसाठी या यशाचे महत्त्व काय?कार्यकारी संचालक प्रा. डा. पी. पी. जोशी यांच्या मार्गदर्शनामुळे ही अत्याधुनिक सेवा विकसित झाली. टोन्सच्या यशस्वी प्रारंभामुळे एम्स नागपूरमध्ये कमी छेदाच्या डोळ्याच्या खोबणी आणि कवटीच्या तळाच्या शस्त्रक्रियांची क्षमता आणखी वाढली आहे

परप्रांतीय रिक्षावाला परतीच्या

हॅशटॅगसह हा व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर शेअर झाला आहे.

कुर्ला रेल्वे स्थानकावरील व्हीडीओ-हा व्हीडीओ मुंबईतील कुर्ला रेल्वे स्थानकातील असून ज्या रेल्वेच्या डब्यात रिक्षा चढवली जात आहे, ती रेल्वे ०१०७४ (बनारस-मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस) आहे. तर रिक्षाचा क्रमांक एमएच ०३ सीटी ५७७५. अर्थात ही रिक्षा मुंबई पूर्व (वडाळा आरटीओ) पासिंगची रिक्षा आहे. त्यामुळे रिक्षा मुंबईतून बनारस अर्थात ऊत्तर प्रदेशकडे जात असल्याचे या माहितीवरू न स्पष्ट होत आहे.

मराठी भाषेतच बोलण्याचे आवाहन- त्यामुळे सोशल मीडियावर ब-याच लोकांनी हा व्हीडीओ शेअर केला असून मराठी शिका नाहीतर रिक्षाचा परवाना रद्द.. या सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत आहेत. तसेच या परप्रांतीय लोकांसाठी राज्य सरकारने मराठी शिकायला मोफत क्लास आणि वेळही दिला आहे. तरीपण हे लोक निघून जाउ पण मराठी शिकणार नाही यावर अडून राहिले आहेत. पण आपण मराठी माणसं ऊाचच त्यांच्या कम्फर्टसाठी त्यांच्याशी हिंदीत बोलतो. आपल्याला पण आपल्या भाषेचा अभिमान असला पाहिजे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत.

टीम भाजपानंतर आता

केंद्रीय मंत्री असे आहेत, ज्यांच्याकडे एकापेक्षा अधिक खात्याचा कारभार आहे. माहितीनुसार, मंत्रिमंडळात विस्तारात या खात्यांचा समतोल साधला जाउ शकतो. पेपरफुटी प्रकरणातील विरोधानंतर शिक्षण मंत्रि पदावरू न धर्मेंद्र प्रधान यांना पायऊतार व्हावे लागले. जार्ज कुरियन आणि रवनीत सिंग बिट्टू यांचा राज्यसभा कार्यकाळ संपल्यामुळे कुरियन यांनी अल्पसंख्याक मंत्रालय आणि बिट्टू यांनी रेल्वे राज्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे.

हर्ष मल्होत्रा यांना दिल्ली आणि पंकज चौधरी यांना ऊत्तर प्रदेश अध्यक्षपदी नेमणूक केली आहे. पेट्रोलिअम मंत्री हरदीप सिंग पुरी आणि सामाजिक न्याय राज्य मंत्री बी.एल वर्मा यांचा राज्यसभा कार्यकाळ येत्या नोव्हेंबरला संपणार आहे. त्यामुळे या मंत्र्यांच्या जागी नवे चेहरे आणले जाण्याची शक्यता आहे. नव्या फेरबदलात युवा आणि महिलांना अधिक संधी मिळण्याची शक्यता आहे. पंजाबमध्ये अकाली दल आणि भाजपाच्या युतीची चर्चा पुन्हा सुरू झाल्याने हरसिमरत कौर बादल यांच्याही नावाची चर्चा पुढे आली आहे. परंतु सध्या यावर सस्पेन्स आहे.

दरम्यान, AAP सोडून भाजपात सहभागी झालेल्या ७ राज्यसभा खासदारांचे नेतृत्व केलेल्या राघव चड्ढा यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते. ठाकरेंचे ६ खासदार शिंदेसेनेत सहभागी झाल्याने लोकसभेत त्यांचे संख्याबळ वाढले आहे. त्यामुळे शिंदेसेनेला नव्या विस्तारात आणखी एक कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. यासाठी श्रीकांत शिंदे आणि शिंदेसेनेत नव्याने दाखल झालेल्या ६ पैकी एका खासदाराला संधी मिळू शकते. त्याशिवाय तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडलेले २० खासदार यांच्या गटानेही एनडीएला पाठिंबा दिला आहे. त्यांच्यापैकी एकाला मंत्रिमंडळ विस्तारात स्थान मिळण्याची शक्यता आहे.

सामाजिक न्यायाचा निधी वळवणे

योजना जाहीर करायच्या आणि निवडणुका संपल्या की बजेटअभावी महिलांना वगळायचे, हा निव्वळ फसवणुकीचा प्रकार आहे, असा आरोप त्यांनी केला.

पहिल्या टप्यात सुमारे ८० लाख महिलांना केवायसीच्या नावाखाली अपात्र ठरवले जात असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. देशात प्रत्येक वाडी-वस्तीवर जनधन बँक खाती आणि आधार कार्ड पोहोचू शकते, मग लाडक्या बहिणींचे केवायसी का होउ शकत नाही? हे प्रशासनाचे अपयश असून जाणीवपूर्वक महिलांची संख्या कमी करण्याचा हा डाव आहे, असे सुळे **म्हणाल्या.**

मूलभूत सुविधांना प्राधान्य द्या- सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या विधानाचा दाखला देत त्या म्हणाल्या, कुंभमेळा आणि मोठ्या महामार्गांवर हजारो कोटींची ऊधळपट्टी केली जात आहे, तर दुसरीकडे मराठी शाळा, आश्रमशाळा आणि रु ग्णालयांची दुरवस्था झाली आहे. अमरावती रु ग्णालयातील नवजात बालकांचा मृत्यू आणि पुण्या-नाशिकमधील रस्त्यांवरील खड्डे ही वस्तुस्थिती आहे. रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ता अशी परिस्थिती असताना सरकारने मोठे बिग तिकीट प्रकल्प करण्यापेक्षा शाळा, आरोग्य केंद्रे, स्थानिक रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांवर खर्च करावा.

शेतकरीविरोधी व लहरी निर्यात धोरण- कांदा, साखर आणि तांदळाच्या वाढत्या किमतींवरू न केंद्र सरकारला घेरताना त्या म्हणाल्या, शेतक-यांच्या हातात चार पैसे मिळण्याची वेळ आली की केंद्र सरकार निर्यातबंदी किंवा नियमांत बदल करते. कृषी मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालयात अजिबात समन्वय नाही. लहरी धोरणांमुळे जागतिक बाजारपेठेत भारताची विश्वासार्हता कमी होते आणि देशातील सामान्य शेतकरी मात्र भरडला जातो. गेल्या १५ दिवसांत सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले असून महागाई प्रचंड वाढली आहे.

विलीनीकरणाच्या चर्चा फेटाळल्या- राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेबाबत विचारले असता त्यांनी या चर्चा पूर्णपणे फेटाळून लावल्या. आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमचा कोअर ग्रु प नियमितपणे पक्षीय आढावा बैठका घेत असतो. २९ तारखेला होणारी बैठक ही नियमित संघटनात्मक बैठक असून विलीनीकरणाचा कोणताही प्रश्नच ऊद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

आदिवासी वसतिगृह प्रवेशासाठी

वसतिगृह व्यवस्थेतील अडचणी दूर करू न विद्यार्थ्यांना सुविधा अधिक परिणामकारकपणे ऊपलब्ध करून देण्यात याव्यात. लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा सकारात्मक विचार करू न विद्यार्थीकेंद्रित, पारदर्शक आणि अधिक सक्षम वसतिगृह व्यवस्था निर्माण करण्यासाठी काम करण्याबाबतही मंत्री वूईके यांनी यावेळी सांगितले.

राहुल गांधींचा क्रिती

राहुल गांधींनी काय पोस्ट केली?-महिलांनी काय परिधान करायचं, काय करायचं, कुठे जायचं हा त्यांचा निर्णय असला पाहिजे. महिलांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी ट्रोल करणं थांबवा अशी प्रतिक्रिया देत त्यांनी क्रिती सेनानची स्टोरी पोस्ट केली आहे.

कंगनाने काय म्हटलं होतं?-कंगनाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये क्रिती सेनानचे थेट नाव घेतले नसलं, तरी तिने क्रितीवर या ज्वेलरी ब्रँडच्या जाहिरातीवरू न सुरू असलेल्या वादावरच भाष्य केलं. कंगना पोस्टमध्ये म्हणते, महिलांसाठी हा खूप चांगला काळ आहे, आपल्या कपाटात वेगवेगळ्या कपड्यांचे अनेक पर्याय आहेत. आजची महिला ही जागतिक महिला आहे. काकटेल ड्रेसेसपासून ते लहेंगा चोली, जीन्स ते साडी आणि बिकिनीपासून ते सलवार कमीजपर्यंतचे अनेक पर्याय आज ऊपलब्ध असताना, तुम्ही तुमच्या भावाला बिकिनी किंवा अंतर्वस्त्रांमध्ये राखी का बांधाल? तुमचे इतर स्टायलिंगचे पर्याय कुठे गेले? असा प्रश्न कंगनाने केला. ज्यावर क्रितीने सडेतोड ऊत्तर दिलं.

क्रितीची पोस्ट काय?-क्रिती सेनान म्हणाली, कुठल्याही सणांचं सौंदर्य हे कपड्यांमध्ये नसतं. त्याबाबतच्या भावनांमध्ये ते सौंदर्य असतं. या भावनाच आपल्याला आपल्या परंपराशी जोडून ठेवतात. आपण महिलांना हे सांगणं कधी बंद करणार आहोत की त्यांनी काय कपडे घातले पाहिजेत? एथनिक फॅशनमध्ये वेळेनुसार बराच बदल झाला आहे. मात्र आजही एखाद्या महिलेचं मूल्यमापन, ती संस्कृती टिकवते आहे की नाही हे सगळं तिच्या कपड्यांवरु नच जोखलं जातं. संस्कृती आणि परंपरा ही स्त्रियांच्या मनात असते. त्यांच्या कपड्यांमध्ये किंवा कपड्यांच्या नेकलाईनमध्ये नसते असं म्हणत क्रितीने कंगनाला ऊत्तर दिलं. यानंतर क्रितीच्या बहिणीनेही कंगना रणौतला ऊत्तर दिलं. आता राहुल गांधींनीही क्रिती सेन?नला पाठिंबा दिला आहे.

पाटण्यात विद्यार्थी आंदोलन चिघळले,

यादरम्यान, काही विद्यार्थ्यांनी पोलिसांवरच हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तसेच यावेळी झालेल्या झटापटीत एका महिला पोलीस कर्मचा-यासह दोन पोलीस कर्मचारी जखमी झाले. जखमी पोलीस कर्मचा-यांमध्ये जितेंद्र कुमार यांचा समावेश असून, त्यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे.

अडीच लाखांची लाच घेताना

शुल्क विभागाच्या कार्यालयात अडीच लाखांची लाच स्वीकारताना आकाश जाधवला रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नावाचा उल्लेख असल्याने त्या वरिष्ठ अधिकाऱ्याचीही चौकशी केली जात आहे.

अमरावती ऐवजी नागपूरला

यावे, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणात तक्रारदाराने अमरावतीऐवजी थेट नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार का केली, हा देखील आता चर्चेचा विषय ठरला आहे. तक्रारदाराला अमरावती येथील संबंधित यंत्रणेवर दबाव किंवा प्रभाव टाकला जाऊ शकतो, अशी भीती होती का? हा प्रश्नही उपस्थित होत आहे. नागपूर ACBच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली असून, या संपूर्ण प्रकरणातील पैशांची मागणी, वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका आणि लाचखोरीची साखळी यांचा तपास होणे आवश्यक आहे.

गुणनियंत्रण विश्लेषणात जिल्ह्यातील

१९६८ अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

एकूण प्राप्त झालेल्या ३ हजार १५७ तक्रारीपैकी २ हजार ३२६ तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये ११ ऑगस्ट २०२६ रोजी कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ज्या तालुक्यांमध्ये येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी व इतर कंपनींविरुद्ध एकूण ४१ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी विरुद्ध १० गुन्हे तर ईनोव्हेज ॲग्रो,इंदोर कंपनीवर ५, पार्श्व जेनेटीक्स इंदोर कंपनीवर ५, श्री. सिड्स खंडवा कंपनी २, ग्रिन गोल्ड ॲग्रीटेक १, रवि सिड्स ७, एस. के. बी सिड्स २, ग्रिन ॲग्री रिव्होल्युशन २, व्हिगर बायोटेक २, अंकुर सिंड्स २, ईगल सिड्स १, श्री. ओसवाल सिड्स १ आणि उत्तम सिड्सवर १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व गुन्ह्यांमध्ये पोलीस विभागाकडून तपास सुरु आहे.

सोयाबीन बियाण्यांच्या तालुका स्तरावर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत ईनोव्हेज ॲग्रो, इंदोर कंपनीच्या २७३, पार्श्व जेनेटीक्स, इंदोर कंपनीच्या ११९, श्री. सिड्स, खंडवा कंपनी १०३, ग्रिन गोल्ड ॲग्रीटेक कंपनीच्या ६७१, रवि सिड्स कंपनीच्या १८२, एस. के. बी सिड्सच्या ४५ तक्रारी प्राप्त झाल्या असून या कंपन्यांचे बियाणे विक्री परवान्यांवर बियाणे कंपनी कायदा १९६६ आणि बियाणे अधिनियम १९६८ अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव निविष्ठा व गुण नियंत्रक संचालकांकडे पाठविण्यात आला आहे.

एसटी तिकीट दरवाढीविरोधात

आमदार वीरेंद्र जगताप यांनी केली. प्रवाशांच्या आर्थिक अडचणींचा विचार करून एस.टी. महामंडळाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही काँग्रेसच्या वतीने देण्यात आला. यावेळी आगार व्यवस्थापकांनी या मागण्यांवर तत्काळ कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले.

या आंदोलनाला महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांची उपस्थिती होती. विद्यार्थी-विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक, पालक, कामगार आणि सर्वसामान्य प्रवाशांनी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

याशिवाय, चांदूर रेल्वे एस.टी. डेपो परिसरातील स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता करावी तसेच प्रवाशांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली. प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणारी वाहतूक सेवा उपलब्ध करून देणे ही एस.टी. महामंडळाची जबाबदारी असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. यावेळी असंख्य विद्यार्थी व काँग्रेसचे कार्यकर्ते रुपेश पुडके, शेट्टुदादा सूर्यवंशी,स्वप्निल मानकर, प्रफुल कोकाटे, सारंग देशमुख,अरविंद गुरुदे,अभिजीत देशमुख, अनंत पोलाद, आर्यन वानखडे, रुपेश बनसोड, दत्तात्रय भागवत, प्रवीण चींचे, आदीमनी बोधिले, राजेश बनसोड, संयोग ठाकरे, जीवन आगाशे, प्रतीक भैसे, सौरभ गावंडे, भावना बाणेकर, पायल कांबळे, आचल शेंडे, चैताली चौधरी, अस्मिता बेले, परी गोल्हे, सिद्धी बोडकुठे, रिया रंगारी, मंजुषा शेंडे, प्रणिता सहारे, कशिष पोहेकर, ऋतुजा कावरे, संजय राव गावंडे, हनुमान जी मोडक, वैभव चुकेकर, प्रमोद सोनवणे, राहुल राऊत, अथर्व वनवे, प्रफुल माईंदे, अर्पित चौधरी, सराड दादा, दिनेश चौकडे, शंतनु राऊत, प्रणव इंगळे, असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

द्धगाव तिथे शाखा, घर तिथे

सुर्जी , दर्यापूर,वलगाव, अमरावती या मार्गावर विविध गावांमध्ये शिवसेना शाखा स्थापना, कार्यकर्त्यांशी संवाद आणि वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.अचलपूर येथून सुरू होणारे हे विस्तार पर्व विविध गावांमधून मार्गक्रमण करत अमरावती शहरात दाखल होईल आणि राजकमल चौक येथे या ऐतिहासिक अभियानाचा भव्य समारोप करण्यात येणार आहे.

'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हा केवळ संघटन विस्ताराचा नारा नसून, शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे संघटन तळागाळापर्यंत पोहोचवून प्रत्येक गावात सक्रिय शाखा आणि प्रत्येक घरापर्यंत शिवसेनेचा विचार पोहोचविण्याचा ठोस संकल्प आहे. युवक, महिला, शेतकरी, पदाधिकारी, शाखाप्रमुख आणि सर्वसामान्य नागरिकांना संघटनेशी जोडून शिवसेनेची मजबूत कार्यकर्त्यांची फळी उभारण्यावर या विस्तार पर्वात विशेष भर राहणार आहे. मोठ्या संख्येने शिवसैनिक, पदाधिकारी, युवक, महिला आणि शिवसेनाप्रेमी नागरिक या अभियानात सहभागी होणार असून, संपूर्ण मार्गावर शिवसेनेच्या संघटनात्मक शक्तीचे दर्शन घडणार आहे. आगामी काळात अमरावती जिल्ह्यात शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे , डॉक्टर श्रीकांत शिंदे तथा शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे संघटन अधिक व्यापक, मजबूत आणि जनतेशी थेट जोडणारे करण्याच्या दृष्टीने हे शिवसेना विस्तार पर्व महत्त्वाचा राजकीय आणि संघटनात्मक टप्पा ठरणार आहे.

रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ९.०० वाजता अचलपूर येथून सुरू होणाऱ्या या ऐतिहासिक शिवसेना विस्तार पर्वात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन शिवसैनिकांना करण्यात आले आहे.

मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमनाबाबत

पुढील आठ दिवसात अंमलात आणाव्यात. यासाठी आस्थापनांना जबाबदार धरून त्यांच्याकडून अग्निशमन यंत्रणांची दुरूस्ती, देखभाल आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत राखण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण दर महिन्याला देण्यात यावे. तसेच ही यंत्रणा संबंधित आस्थापनांना सोपविताना जबाबदारी निश्चित करण्यात यावी. जोखमीच्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा स्वयंचलित मोडमध्ये ठेवण्यात यावी. तसेच याची नियमित देखभाल आणि दुरूस्ती करण्यावर भर देण्यात यावा. यात प्रामुख्याने स्वयंचलित यंत्रणा कार्यक्षम असल्याची खात्री करावी. अग्निशमन यंत्र वापराबाबत प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी याचे प्रात्यक्षिक घेण्यात यावे. यातील सुरक्षा विषयक कामांमध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही.

रूग्णालयात विजेच्या नियंत्रित वापरावर असलेल्या वैद्यकीय उपकरणांना स्टॅबिलायझर जोडण्यात यावेत. तसेच स्मोक डिटेक्टर कार्यान्वीत होण्यासाठी या यंत्रणेची नियमीत देखभाल करण्यात यावी. मोठ्या ठिकाणी आवश्यकतेनुसार फायर सिलींडर, होज पाईप किंवा स्प्रिंकलर व्यवस्था करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणेच्या पाहणीसाठी शहरी भागात ५० आणि ग्रामीण भागात ५० टिम तयार करण्यात येतील. त्यानंतर त्यांच्या सूचनेनुसार अग्निशमनाबाबत सुधारणा करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.

मेळघाट व्याघ्र ङ्कल्पांतर्गत

शेतमुल्यांकनधारक, वनहक्कधारक आणि घरमुल्यांकनधारकांनी आवश्यक दस्तऐवज सादर न केल्याने त्यांना मोबदला अदा करण्यात अडचण येत आहे. या सर्व शेतमुल्यांकनधारक आणि वनमुल्यांकनधारकांनी १०० रुपयांच्या स्टँपपेपर वर अर्ज, बँक खात्याची छायाप्रत,शेतीचा ७/१२ आणि शेतमुल्यांकनधारक मयत असल्यास त्यांचे वारसप्रमाणपत्र व वारसाच्या खात्याची छायाप्रत तसेच घरमुल्यांकनधारकांनी १०० रुपयांच्या स्टँपपेपर वर अर्ज, बँक खात्याची छायाप्रत,नमुना ८, घरमुल्यांकनधारक मयत असल्यास त्यांचे वारसप्रमाणपत्र व वारसाच्या खात्याची छायाप्रत तातडीने अकोट वन्यजीव विभाग अकोट येथे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोमठाना खुर्द येथील लाभार्थ्यांची नाव निहाय यादी mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

खरीप हंगामासाठी खतांचा

संयुक्त खतांच्या किंमतीत वाढ झाली असली तरी सर्व रासायणीक खतांच्या किंमतीत सरसकट प्रति बॅग १२५ ते ३०० रुपयांनी वाढ झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या कृषी निविष्ठा रास्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली. जिल्हा स्तरीय भरारी पथक स्थापन करुन कृषी सेवा केंद्रांची नियमीत तपासणी करण्यात आली. लिंकींग व तत्सम तक्रारींबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयात शेतकरी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तक्रार निवारणासाठी कृषी सेवा केंद्रांमध्ये क्यु.आर.कोड आणि बियाणे,खते व किटकनाशक संदर्भातील तक्रारींकरिता व्हाट्स ॲप लावण्यात आला. https://adozpamravati.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-O-padding.html ब्लॉगवर जिल्ह्यातील कृषी केंद्र निहाय उपलब्ध खत साठा बघण्याची सोय करून देण्यात आली.

डफरिन दुर्घटनेमुळे

सांत्वन करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व खासदार व आमदार लवकरच त्यांच्या भेटी घेणार आहेत.

२७ सप्टेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार-

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त केल्याबद्दल आगामी २७ सप्टेंबर रोजी अमरावती येथे भव्य शेतकरी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विशेष सत्कार करण्यात येणार असून, या कार्यक्रमाला युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेला चेतन गावंडे, शिवराय कुलकर्णी, किरण पातुरकर, जयंत डेहनकर, निवेदिता चौधरी, डॉ. अनिल बोंडे, प्रवीण पोटे पाटील, प्रताप अडसड, राजेश वानखडे, उमेश यावलकर, प्रवीण तायडे, केवलराम काले, जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे आणि इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त

पायाभूत सुविधांमध्ये तसेच क्रीडा क्षेत्राच्या विकासात झालेल्या परिवर्तनावर चर्चा करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील युवक, माय भारत स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, महाविद्यालयीन विद्यार्थी, खेळाडू आणि क्रीडा क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन माय भारत केंद्र, अमरावती आणि राष्ट्रीय सेवा योजना, अमरावती यांच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था तसेच १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवक अधिकारी अक्षय निपाणे यांनी केले आहे.

कृषी पर्यटन केंद्र

माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास कसा साधता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आजच्या डिजिटल युगात ए.आय चा वापर कसा करता येईल यावरही त्यांनी प्रकाश टाकला. गणेश चौधरी यांनी कृषी पर्यटन केंद्र चालवताना निसर्गाचा समतोल राखून शाश्वत विकासाची कास कशी धरावी आणि स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याबद्दल तांत्रिक व व्यावहारिक माहिती दिली.

अध्यक्ष लहू अवताडे यांनी राज्यातील कृषी पर्यटनासमोरील आव्हाने, संचालकांचे संघटन आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोन कसा असावा, यावर आपले अनुभव अभ्यासपूर्ण रितीने मांडले. तसेच शाळेच्या सहली व शासनाच्या विविध विभागांशी कसा समन्वय साधता येईल यावर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी अमरावती विभागातील विजय श्रीराव (महेंद्री कृषी पर्यटन केंद्र, वरुड), सुनील वारे (वनश्री कृषी पर्यटन केंद्र, उदखेड) तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील मातोश्री कृषी पर्यटन केंद्र (अंबड) आणि श्री गोकुळ कृषी पर्यटन केंद्र (जालना) येथील संचालकांनी आपले अनुभव सांगितले. या एक दिवसीय कार्यशाळेमुळे अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांना केंद्राचा दर्जा उंचावण्यासाठी नवीन नियमावली समजून घेण्यास व नवनवीन संकल्पना राबवण्यास मोठी दिशा मिळाली आहे. 'मामाचं वावर' चे संचालक मोहन तेजराव जगताप यांच्या सहकार्याने सर्व संचालकांनी निसर्गरम्य वातावरणात वनभोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'पर्यटन मित्र' शिवाजी गायकवाड यांनी केले, तर प्रादेशिक कार्यालय अमरावतीचे उपलेखापाल राजेश मोहिते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

२८ लाखांसाठी जिल्हाधिकारी

अधिग्रहित करण्यात आली होती. त्यावेळी या जमिनीच्या मोबदल्यापोटी त्यांना ५५ हजार रुपये देण्यात आले. मात्र, मोबदला अत्यल्प असल्याचा दावा करी

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

ढाबे झाले 'पेट्रोल - डिझेल डेपो'

पातूरच्या महामार्गावर इंधनाचा काळाबाजार?

टँकरमधून इंधन 'कट' करून विक्रीचा कथित गोरखधंदा; गुजरात पोलिस आले, स्थानिक यंत्रणा झोपेतच?

■ अॅड. समीर ठाकूर ■

अकोला : पातूर तालुक्यातील महामार्गावर रात्रीच्या अंधारात नेमके काय सुरू आहे, याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. बाहेरून पाहता हे ढाबे; मात्र या ढाब्यांवर पेट्रोल-डिझेलची कथित अनधिकृत साठवणूक व विक्री होत असल्याच्या आरोपांनी संपूर्ण यंत्रणेलाच सवालांच्या कठड्यात उभे केले आहे. अधिकृत पेट्रोल पंपांच्या नियमबद्ध व्यवसायाला छेद देत महामार्गालगत 'पॅरलल पेट्रोल पंप' उभे राहिल्याचा आरोप होत असून, या कथित व्यवहाराकडे पातूर पोलिसांची संशयास्पद शांतता का? असा सवाल आता उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, गुजरातमधील इंधन टँकरशी संबंधित प्रकरणाचा तपास करताना गुजरात पोलिस थेट पातूरमध्ये पोहोचले आणि एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती समोर येत आहे. बाहेरील राज्यातील पोलिसांना पातूरचा रस्ता सापडतो; मात्र स्थानिक पोलिसांच्या नजरेसमोर कथितपणे सुरू असलेला हा धंदा दिसत नाही, हीच बाब अनेक प्रश्नांना जन्म देत आहे.

'पारिवारिक' वातावरणात ढाबा, पण उलाढाल 'नॅशनल'?

महामार्गावरील काही ढाब्यांवर पेट्रोल-डिझेलची मोठ्या प्रमाणात कथित साठवणूक होत असल्याची चर्चा आहे. बाहेरून पारिवारिक वातावरण, आतून मात्र इंधनाचा कथित मोठा व्यवहार, अशी परिस्थिती असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. आजूबाजूच्या अधिकृत पेट्रोल पंपांच्या तुलनेत या ठिकाणी होत असल्याचे सांगितले जाणारे व्यवहार संशय निर्माण करणारे आहेत. या दाव्यांची वस्तुस्थिती तपासण्यासाठी प्रशासनाने अचानक तपासणी करण्याची गरज आहे.

गुजरात पोलिस आले अन् पातूरचे रहस्य उघड झाले?

गुजरातमधील एका इंधन टँकरमधून मोठ्या प्रमाणात पेट्रोल-डिझेल काढल्याच्या कथित प्रकरणाचा तपास करत गुजरात पोलिस पातूरमध्ये पोहोचल्याची माहिती आहे. संबंधित प्रकरणात एका व्यक्तीला ताब्यात घेऊन गुजरातला नेण्यात आल्याचेही सांगितले जाते. या घटनेने स्थानिक यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुजरात पोलिसांना पातूरमधील धागा सापडतो, मग पातूर पोलिसांना काय दिसत नाही? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महामार्गावर 'ज्वालामुखी' तर उभा करत नाही ना?

पेट्रोल-डिझेलचा अनधिकृत साठा, टँकरची ये-जा, ढाब्यांवरील गर्दी आणि ज्वलनशील पदार्थांची हाताळणी—या सर्वांचा मेळ म्हणजे संभाव्य धोक्याचे गंभीर समीकरण आहे. एखाद्या ठिकाणी आग लागली किंवा इंधनाचा स्फोट झाला तर त्याची झळ केवळ संबंधित ढाब्यापुरती मर्यादित राहणार नाही. महामार्गावरील वाहतूक, प्रवासी आणि आसपासची दुकाने किंवा वस्त्यांनाही त्याचा फटका बसू शकतो. प्रशासनाला कारवाईसाठी दुर्घटनेची वाट पाहायची आहे का? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

चौकशी 'वरवरची' नको; थेट मुळापर्यंत हात घाला!

या प्रकरणात केवळ दोन-चार ढाब्यांवर धाडी टाकून कारवाईचा देखावा करण्यापेक्षा संपूर्ण साखळीचा तपास होणे आवश्यक आहे. इंधन कुठून येते, कोण पुरवते, कोणत्या टँकरमधून किती माल कमी होतो, कोण खरेदी करतो, पैसा कुठे जातो आणि या व्यवहारामागे कोण आहेत.

याचा छडा लागणे गरजेचे आहे. जर आरोप खोटे असतील तर तेही स्पष्टपणे जनतेसमोर यायला हवे. आणि जर आरोपांमध्ये तथ्य असेल तर संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई व्हायलाच हवी.

टँकर येतो... 'कट' होतो... आणि पुढे जातो?

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर आरोप म्हणजे महामार्गावरून जाणाऱ्या पेट्रोल-डिझेल टँकरमधून ठरावीक प्रमाणात इंधन काढले जात असल्याचा. टँकर चालकांना ढाब्यावर थांबवून त्यांच्यामार्फत इंधनाचा काही भाग वळविला जातो आणि त्यानंतर उर्वरित माल पुढे रवाना केला जात असल्याची चर्चा आहे. इंधनाच्या या कथित 'कटिंग'मध्ये नेमका किती माल काढला जातो? तो कुठे साठविला जातो? कोणाला विकला जातो? या प्रश्नांची उत्तरे अधिकृत तपासातूनच समोर येऊ शकतात.

'नदीम' नाव चर्चेत; आरोपांची सत्यता तपासण्याची गरज

या कथित नेटवर्कच्या सूत्रधारापैकी एक म्हणून 'नदीम' नामक व्यक्तीचे नाव स्थानिक चर्चेत असल्याचे सांगितले जाते. टँकर चालकांशी संपर्क, ढाब्यांवरील कथित व्यवहार आणि आर्थिक भागीदारीबाबतही त्याच्याविषयी आरोप केले जात आहेत. मात्र, कोणत्याही व्यक्तीचे नाव केवळ चर्चेच्या आधारावर दोषी म्हणून मांडता येणार नाही. त्यामुळे पोलिसांनी या नावाची स्वतंत्र चौकशी करून सत्य काय आहे, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

'ढाबा' नाव, धंदा मात्र इंधनाचा?

पातूर तालुक्यातील काही ढाब्यांवर पेट्रोल-डिझेलची कथित विक्री सुरू असल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे. सर्वसामान्यांना या ठिकाणांची माहिती असल्याचा दावा केला जात असताना, संबंधित विभागांना त्याची माहिती नसणे हेच आश्चर्याचे कारण ठरत आहे.जर येथे इंधन विक्री होत नसेल तर प्रशासनाने तपासणी करून हा संशय दूर करावा. आणि जर अनधिकृत विक्री होत असेल तर त्यावर तत्काळ कारवाई का होत नाही, याचे उत्तरही प्रशासनाने द्यावे.

अधिकृत पंप चालकांचे नुकसान; सरकारचा महसूल धोक्यात

परवाना घेऊन, कर भरून आणि सुरक्षा नियमांचे पालन करून पेट्रोल-डिझेल विक्री करणाऱ्या अधिकृत पंप चालकांच्या व्यवसायावर या कथित अनधिकृत विक्रीचा थेट परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे शासनाचा कर व महसूलही बुडण्याची शक्यता आहे. म्हणूनच हा प्रश्न केवळ 'अवैध धंद्या'चा नाही; तर महसूल, ग्राहकांची सुरक्षितता आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या गुणवत्तेशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.

पालकांच्या मागणीला यश! चांधई जि.प. शाळेत शिक्षक रुजू

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

चांधई येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. या संदर्भात पालकवर्ग व ग्रामस्थांनी नवीन शिक्षकाची मागणी केली होती.

या मागणीची तात्काळ दखल घेत शिक्षण समितीचे अध्यक्ष प्रेम मनिराम जाधव, उपाध्यक्ष अमोल डिगांबर हागे तसेच भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांनी शिक्षण विभागाकडे तात्काळ पाठपुरावा केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांनी संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांशी चर्चा करून शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यांच्या पाठपुराव्याला तात्काळ यश मिळाले असून चांधई जिल्हा परिषद शाळेत नवीन शिक्षक रुजू झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक रुजू झाल्यानंतर पालकवर्ग व ग्रामस्थांनी शिक्षण समितीचे अध्यक्ष प्रेम मनिराम जाधव, उपाध्यक्ष अमोल डिगांबर हागे आणि भाजपा तालुका अध्यक्ष रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांचे आभार मानले.

बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत वृक्षदिंडी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगांव येथे वृक्षदिंडी शाळेपासून ते मालेगाव शहरातून विविध ठिकाणा वरून वृक्षदिंडी काढण्यात आली. यामध्ये तहसील कार्यालय,मुख्य बाजारपेठ, शिक्षक कॉलनी व स्वामी समर्थ मंदिर इथून वृक्षदिंडी नेण्यात आली. वृक्ष दिंडीच्या माध्यमातून समाजाला पर्यावरण जनजागृती करण्याचा अनमोल असा संदेश शाळेतील चिमुकल्यांनी या वृक्षदिंडीतून दिला. यावेळी मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निसर्गामध्ये वृक्षांना किती महत्त्व आहे .आणि वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे असे संत तुकाराम महाराजांनी का म्हटले याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.सदर वृक्षदिंडी ला वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यावेळी विद्यार्थिनी मराठमोळ्या पोशाखात वेगवेगळी वृक्ष घेऊन वृक्ष दिंडीमध्ये सहभागी झाले व जनजागृती फलक सुद्धा विद्यार्थ्यांनी यावेळी तयार करून आणले. सदर वृक्षदिंडी ची सांगता श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये करण्यात आली.

श्री मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळात एसटी स्मार्ट कार्ड शिबिर

अकोला : आपल्या गणेशोत्सवाचे ९० वर्षे पूर्ण करणाऱ्या सावतराम चाळ परिसरातील श्री मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सव उत्सवाची तयारी जोमाने सुरू झाली आहे.उत्सवात अनेक आरोग्यदायी उपक्रमाचे आयोजन नेहमीप्रमाणे करण्यात आले आहे.

या अनुषंगाने सावतराम परिसरातील मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात शनिवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी स १० वाजता नागरिकांसाठी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.ज्येष्ठ नागरिक,महिला व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असणारे राज्य परिवहन महामंडळाचे हे स्मार्ट कार्ड उपयुक्त असून या शिबिरात या कार्डची नोंदणी करण्यात येणार आहे.

'विशेष मानपत्र' प्रदान करून विठोलीच्या पीएमश्री शाळेचा गौरव

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील विठोली येथे असलेल्या व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देतानाच शाळेच्या भौतिक सुविधा, शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या कार्याची जिल्हा प्रशासनाने विशेष दखल घेतली आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सवी पर्वावर शाळेचे मुख्याध्यापक अर्जुन साखरबाई अंकुशराव लोंढे यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल 'विशेष मानपत्र' देऊन गौरविण्यात आले. वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या या शाळेने मागील वर्षात गुणवत्तावाढीच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली.

कुपटा उपसा सिंचन प्रकल्पात मुबलक पाणीसाठा असूनही वाळत चाललेल्या पिकांना पाणी मिळेना



■ प्रतिनिधी | मानोरा ■

मौजा कुपटा येथील उपसा सिंचन प्रकल्पात सुमारे ७० टक्के पाणीसाठा उपलब्ध असूनही परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. याबाबत धानोरा खुर्द, ता. मानोरा येथील शेतकरी वर्गाने जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

विद्युत कनेक्शन बंद केल्याने सिंचन ठप्प

निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांचे सिंचनासाठी असलेले विद्युत कनेक्शन महावितरण

धानोरा खुर्दच्या शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

विभागाने काही कारणास्तव बंद केले आहेत. प्रकल्पात मुबलक पाणी असूनही केवळ लाईट नसल्याने शेतीला पाणी देता येत नाही. सध्या खरीप पिके वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत असून आगामी रब्बी हंगामासाठीही पाण्याची नितांत गरज आहे.

वेळेवर पाणी न मिळाल्यास हजारो रुपये खर्च करून उभी केलेली पिके वाया जाण्याची आणि शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती आहे.

दोन महिन्यांसाठी का होईना वीज जोडणी पूर्ववत करा - मागणी

शेतकऱ्यांनी आपल्या निवेदनात कळकळीची मागणी केली आहे की, सध्याच्या उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून किमान दोन महिन्यांच्या कालावधीसाठी का होईना, बंद केलेले विद्युत कनेक्शन तात्काळ पूर्ववत सुरू करून सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. दोन महिन्यानंतर पाणीसाठा संपल्यास किंवा पाणी उपलब्ध नसल्यास त्यानंतर कनेक्शन पुन्हा बंद केले तरी आमची कोणतीही हरकत राहणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

यापूर्वी सहाय्यक अभियंता, लघु पाटबंधारे उपविभाग क्र. ७, कारंजा (लाड) यांनाही दि. ९/०८/२०२६ रोजी पत्र देण्यात आले होते, मात्र कार्यवाही झाली नाही.

गोकुलधाम अग्रसेन भवन येथे श्रीमद्भागवत कथेला भक्तांचा प्रतिसाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक गोकुलधाम अग्रसेन भवन येथे गायत्री सत्संग मंडळ, अग्रवाल समाज यांच्या वतीने सुरू असलेल्या सात दिवसीय श्रीमद्भागवत कथा महोत्सवाला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, सहाव्या दिवशी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भागवताचार्य पंडित आनंद दायमा यांच्या अमृतमय वाणीतून सुरू असलेल्या या कथेत भगवान श्रीकृष्णांच्या विविध लीलांचे अत्यंत भावपूर्ण वर्णन करण्यात आले. सहाव्या दिवशी श्रीकृष्ण-राधा लीला, गोपींसोबतच्या प्रेममय लिला, फुलांची होळी आणि छप्पन भोगाचा प्रसाद असा भक्तिमय सोहळा पार पडला. यावेळी भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. फुलांची होळी खेळताना संपूर्ण कथामंडपात राधे-राधे, जय श्रीकृष्णाच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. याचबरोबर श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव अत्यंत आनंद आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा प्रसंग सादर होताच भाविकांनी जल्लोष करत नंदोत्सव साजरा केला. बालकृष्णाच्या दर्शनासाठी आणि आशीर्वादासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.पंडित आनंद दायमा यांनी सांगितले की, श्रीकृष्णांच्या लीला केवळ ऐकण्यासाठी नसून त्या आपल्या जीवनात आचरणात आणण्यासाठी आहेत.

कारखेडची स्नुषा सोळंके (मकवाने) यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारखेड (ता. मानोरा) येथील मूळ निवासी तथा कारंजा येथील सेवानिवृत्त प्राध्यापक बाबुराव सोळंके (कारखेडकर) यांच्या स्नुषा सौ. रोशन रितेश सोळंके (मकवाने) यांची नुकतीच उपजिल्हाधिकारी (डेप्युटी कलेक्टर) पदी पदोन्नती झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाकडून नुकतीच तहसीलदार ते उपजिल्हाधिकारी पदोन्नतीची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली असून, त्यात त्यांच्या नावाचा समावेश आहे.

मूळच्या मनमाड येथील असलेल्या सौ. रोशन सोळंके यांनी शासकीय सेवेची सुरुवात 'मुख्याधिकारी' पदापासून केली. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (MPSC) परीक्षा

महसूल प्रशासनातील उल्लेखनीय कार्याचा गौरव

उत्तीर्ण होऊन त्यांनी तहसीलदार पदाची जबाबदारी स्वीकारली. यापूर्वी त्यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत सहायक आयुक्त म्हणूनही उत्कृष्ट सेवा बजावली आहे.

गेल्या दहा वर्षांपासून त्या नागपूर महसूल विभागात तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत. या कार्यकाळात सिंदेवाही, वरोरा, कळमेश्वर आणि सध्या नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात तहसीलदार (महसूल) म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. आपल्या शिस्तप्रिय, पारदर्शक आणि कर्तव्यदक्ष कार्यपद्धतीमुळे त्यांनी महसूल प्रशासनात आपल्या कर्तृत्वाचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आणि उपजिल्हाधिकारीपदी झालेल्या निवडीबद्दल सोळंके परिवार, नातेवाईक, महसूल प्रशासनातील सहकारी व मित्रपरिवाराकडून त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, भावी प्रशासकीय वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

महागाव, मोठेगाव येथे २०० संशयितांची क्षयरोग तपासणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्राथमिक आरोग्य केंद्र मांगूळझनक अंतर्गत महागाव व मोठेगाव येथे संशयित क्षयरुग्णांच्या तपासणीसाठी क्षयरोग तपासणी शिबिर घेण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. डाखुरे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनल रुहाटिया यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. शिबिरात हॅन्ड हेल्ड एक्स-रे मशीनद्वारे संशयित क्षयरुग्णांची तपासणी करण्यात आली. क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी महागाव येथे ९० संशयितांचे, तर टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी मोठेगाव येथे ११० संशयितांचे एक्स-रे काढले.

जिल्हा गुंतवणूक परिषद उत्तम पायाभूत सुविधांसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू-पालकमंत्री

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात विकासाची मोठी क्षमता असून, त्यादृष्टीने येथे औद्योगिक वसाहतीत आवश्यक सुविधा, तसेच उत्तम पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असे प्रतिपादन राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. येथील स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्रात जिल्हा गुंतवणूक परिषदेचे उद्घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.

खासदार संजय देशमुख, आमदार सई डहाके, आमदार श्याम खोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उद्योग सहायक आयुक्त रंजना पौळ, तहसीलदार वैशाली देवकर, केंद्राचे महाव्यवस्थापक शिवाजी कासारकर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, मैत्री कक्षाच्या नोडल अधिकारी धनश्री जाधव, नाबार्डचे डीडीएम शंकर कोकडवर तसेच एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी गौरव इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोठ्या, मध्यम उद्योगांबरोबरच सूक्ष्म व लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने अनेकविध उपक्रम व योजना अंमलात आणल्या आहेत. येथील औद्योगिक वसाहतीत सुधारणा आवश्यक असल्याची सूचना लोकप्रतिनिधींनी केली आहे. त्यानुसार लवकरच उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी. उद्योजक, प्रतिनिधींची बैठक मुंबईत घेतली जाणार आहे.

एमआयडीसी वसाहतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील, असे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. रस्ता सुधारणेसाठी तत्काळ १ कोटी रू. जाहीर स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्राच्या रस्त्याची दुरूस्ती आवश्यक असल्याचे लक्षात येताच पालकमंत्र्यांनी स्वत:हून दखल घेत या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी १ कोटी रू. निधीची तरतूद करत असल्याचे जाहीर केले. परिषदेत विविध उद्योग, व्यवसायांशी १७९ कोटींचे २० सामंजस्य करार झाले. यावेळी करारपत्रांचे वितरण पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक, एमआयडीसी संघटनेचे प्रतिनिधी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६९ ■ बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

२८ लाखांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर जप्तीची वेळ

अधिग्रहित जमिनीच्या वाढीव मोबदल्याचे प्रकरण; न्यायालयीन बेलीफ दाखल होताच प्रशासनाची धावपळ, ४ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

वर्धा जनमाध्यम : रस्त्यासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला आणि त्यावरील व्याजाची सुमारे २८ लाख रुपयांची रक्कम अदा न केल्याने जिल्हाधिकारी कार्यालयावरच जप्तीची नामुष्की ओढवण्याची वेळ मंगळवारी आली. न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणीसाठी याचिकाकर्ते आणि न्यायालयीन बेलीफ जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होताच प्रशासनाची एकच धावपळ उडाली. दिवसभर अधिकारी आणि याचिकाकर्त्यांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सुरू होत्या. अखेर प्रशासनाने न्यायालयाकडे मुदतवाढ मागितल्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंतची मुदत मिळाल्याने जप्तीची कारवाई तूर्तास टळली.

सुधाकर कृष्णराव उमाटे आणि कमलाकर कृष्णराव उमाटे यांची २२ आर जमीन सन २००२ मध्ये सेवाग्राम-दत्तपूर मार्गासाठी अधिग्रहित करण्यात आली होती. त्यावेळी या जमिनीच्या मोबदल्यापोटी त्यांना ५५ हजार रुपये देण्यात आले. मात्र, मोबदला अत्यल्प असल्याचा दावा करीत उमाटे यांनी न्यायालयात धाव घेतली. सुनावणीनंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिला. त्यानंतरही वाढीव मोबदला आणि व्याजाची रक्कम मिळाली नसल्याने उमाटे यांनी पुन्हा न्यायालयात दाद मागितली.

या प्रकरणाची दखल घेत वर्धा येथील चौथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तराने जिल्हाधिकारी कार्यालयातील साहित्य जप्त करण्याचे आदेश दिले. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयीन बेलीफ सुशील मानवटकर आणि उमाटे मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले.

जप्तीची कारवाई होणार असल्याची माहिती मिळताच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांना याची माहिती देण्यात आल्यानंतर त्यांनी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले.

उमाटे यांना मोबदल्याची रक्कम तातडीने देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. मात्र, प्रशासनाने तत्काळ रक्कम देण्याऐवजी न्यायालयात मुदतवाढ मागण्याचा मार्ग स्वीकारला. प्रशासनाने ४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्याची विनंती न्यायालयास केली. न्यायालयाने ही विनंती मान्य केल्याने जिल्हाधिकारी कार्यालयावरील जप्तीची कारवाई टळली.

दोन दशकांपासून मोबदल्याचा तिढा

सन २००२ मध्ये जमीन अधिग्रहित झाल्यानंतर मोबदल्याच्या रकमेसाठी सुरू झालेला न्यायालयीन संघर्ष तब्बल दोन दशकांनंतरही संपलेला नाही. न्यायालयाच्या आदेशानंतरही वाढीव मोबदला मिळण्यासाठी याचिकाकर्त्यांना पुन्हा न्यायालयाची पायरी चढावी लागली. आता ४ सप्टेंबरपर्यंत प्रशासन संबंधित रक्कम अदा करते की पुन्हा न्यायालयीन कारवाईची वेळ येते, याकडे लक्ष लागले आहे.

तांदळात भुसा-तुटके दाणे; गरिबांच्या ताटात निकृष्ट धान्याचा घास

आष्टी (शहीद) जनमाध्यम : गरिबांच्या ताटात दोन घास सुखाचे पडावेत, यासाठी शासनाकडून स्वस्त दरात आणि मोफत धान्याचे वाटप केले जाते. मात्र, आष्टी शहीद येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानातून वितरित करण्यात येत असलेल्या तांदळाच्या गुणवत्तेवरच आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लाभार्थ्यांना मिळालेल्या तांदळामध्ये मोठ्या प्रमाणात तुटलेले दाणे, भुसा आणि इतर मिश्र पदार्थ आढळून आल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला आहे. त्यामुळे संतापाची लाट निर्माण झाली आहे.

लाभार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाकडून मिळणाऱ्या धान्याचा दर्जा समाधानकारक असणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात हातात पडणाऱ्या तांदळाची अवस्था पाहता धान्याची गुणवत्ता तपासली जाते तरी कोणत्या पातळीवर, असा प्रश्न उपस्थित होत आहे. निकृष्ट तांदूळ लाभार्थ्यांच्या माथी मारला जात असेल तर त्याची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे.

नमुने प्रयोगशाळेत पाठविण्याची मागणी

या प्रकरणाची केवळ कागदोपत्री चौकशी न करता संबंधित दुकानातील तांदळाचा पंचनामा करून अधिकृत नमुने तातडीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, अशी मागणी लाभार्थ्यांनी केली आहे. तपासणीत धान्याचा दर्जा निकृष्ट आढळल्यास संबंधित पुरवठा यंत्रणेची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

शासकीय धान्य हे गरिबांच्या हक्काचे आहे. त्यामुळे त्यांच्या हक्काच्या धान्याच्या गुणवत्तेशी तडजोड होत असेल, तर प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

संजय गांधी व श्रावणबाळच्या लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्रासाठी ॲप सुविधा

वर्धा जनमाध्यम : लाभार्थ्यांना हयातीचे प्रमाणपत्र मोबाईल ॲपद्वारे सादर करता यावे याकरीता बेनेफिसरी सत्यापण ॲप (BSA) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी या ॲपचा वापर करुन डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करावे, असे आवाहन देवळीचे तहसिलदार समर्थ क्षिरसागर यांनी केले आहे.

राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य योजनेतील वृध्द, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्या, अनाथ, अपंग, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती इत्यादी लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र सादर करावे लागतात. पात्र लाभार्थ्यांना मोबाईल मार्फत अथवा गावपातळीवरील ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, ग्रामपंचायत मधील संगणक परिचालक व कर्मचारी यांच्या मार्फत अथवा सेतू सेवा केंद्र, आपले सेवा केंद्र, नागरी सेवा केंद्र इत्यादीमार्फत बेनेफिसियरी सत्यापण ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने हयात प्रमाणपत्र सादर करता येणार आहे.

ही सेवा लाभार्थ्यांना वापरण्यास नि:शुल्क आहे. तथापि लाभार्थ्यांनी आपले सेवा केंद्रामार्फत घेतल्यास ५० रुपये शुल्क आकारण्यात येईल. यासाठी लाभार्थ्यांनी ॲप प्रणालीचा वापर करुन आपले हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने तयार करुन त्यासह श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी वृध्दपकाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांनी आपले अद्यावत आधारकार्ड, बँक खाते पासबुक ची छायांकीत प्रत तसेच संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांनी आपले अद्यावत आधारकार्ड, बँक खाते पासबुक ची छायांकीत प्रत व चालु वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, अपंग असल्यास अपंग प्रमाणपत्र, अद्यावत यू.डॉ.आय.डी. कार्ड इत्यादी तहसिल कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना शाखेत सादर करावे, असे देवळीच्या तहसिलदारांनी कळविले आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

देवळीतील लाच प्रकरणाने खळबळ; ठाणेदारांच्या चौकशीची मागणी

मानवाधिकार संघटनेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार

वर्धा जनमाध्यम : देवळी पोलीस ठाण्यातील एका पोलीस कर्मचाऱ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्यानंतर आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. या लाच प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर देवळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक संदीप कापडे यांच्या कथित भूमिकेचीही चौकशी करावी, अशी मागणी मानवाधिकार संघटनेने केली आहे.

संघटनेचे राज्य अध्यक्ष मंगेश चोरे पाटील यांनी यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. केवळ लाच स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यापुरती चौकशी मर्यादित न ठेवता, त्यामागे वरिष्ठांचे निर्देश, दबाव अथवा संगनमत होते काय, याचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

देवळी पोलीस ठाण्यात अशा प्रकारची वसुलीची पद्धत कार्यरत होती काय, याचाही तपास करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तसेच ठाणेदार कापडे यांच्या कथित आर्थिक व्यवहारांची, मालमत्तेची, बँक व्यवहारांची तसेच जवळच्या नातेवाईकांच्या नावावरील संपत्तीची कायदेशीर पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, तक्रारीतील आरोपांची सत्यता अधिकृत चौकशीतूनच स्पष्ट होणार असून संबंधितांची बाजूही तपासात समोर येणे अपेक्षित आहे. दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी चोरे यांनी केली आहे.

भारत मालिकेच्या वाहनधारकांना कराचा भरणा करण्याचे आवाहन

वर्धा जनमाध्यम : भारत (बीएच) मालिकेमध्ये नोंदणीकृत झालेल्या वाहनाचा कर दोन वर्षासाठी घेतला जातो. त्यानंतर या कालावधीनंतर वाहन मालक वाहनाचा कर वेळेत भरत नाहीत. अशा वाहनधारकांनी अतिरिक्त शुल्क टाळण्यासाठी वेळेत कर भरणे करणे आवश्यक आहे.

दोन वर्षानंतर वाहनधारकांनी कर वेळेत न भरल्यामुळे प्रतिदिन १०० रुपये एवढे अतिरिक्त शुल्क लागू आहे. त्यामुळे भारत मालिकेमध्ये नोंदणीकृत झालेल्या वाहन मालकांनी कर वेळेत भरणे आवश्क आहे.

रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अधिसुचनेनुसार भारत (बीएच) मालिकेमध्ये वाहने नोंदणीकृत करण्यासाठी अधिसुचना जारी केली होती. सदर अधिसुचनेनुसार भारत मालिकेमध्ये नोंदणीकृत झालेल्या वाहनांचा कर हा दोन वर्षासाठी घेतला जातो. तसेच वाहनाचा कर वैध असल्याचा कालावधीचा शेवटचा दिवस पूर्ण झाल्यानंतर ७ दिवसानंतर प्रतिदिन १०० रुपये ऐवढा अतिरिक्त शुल्क आकारला जातो, असे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

मैत्री हे जगातील सर्वांत सुंदर नाते : प्रदीप निफाडकर

साहित्यिकांच्या स्नेहभेटीत मैत्रीच्या आठवणींना उजाळा

वर्धा जनमाध्यम : कोणत्याही स्वार्थाशिवाय आणि औपचारिकतेच्या पलीकडे जाऊन मनापासून जपली जाणारी मैत्री ही जीवनातील सर्वांत अनमोल संपत्ती आहे. जिथे स्वार्थ असतो, तिथे खरी मैत्री टिकत नाही, असे मत पुण्याचे प्रसिद्ध मराठी-उर्दू गजलकार प्रदीप निफाडकर यांनी व्यक्त केले.

वर्धा येथील हॉटेल वृंदावन येथे प्रसिद्ध शायर व साहित्यिक इमरान राही यांची निफाडकर यांनी स्नेहभेट घेतली. या वेळी दोघांनीही अनेक वर्षांच्या मैत्रीच्या प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात निफाडकर यांनी आपल्या लेखणीतून ठसा उमटविला असून, इमरान राही यांनी तीन गजलसंग्रहांच्या माध्यमातून हिंदी-उर्दू साहित्य क्षेत्रात देशभरात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असल्याचे निफाडकर यांनी सांगितले.

या स्नेहभेटीला अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण, विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते, स्पोर्ट कराटे असोसिएशनचे सचिव मंगेश भोंगाडे, ज्येष्ठ समाजसेवी मोहन गौरशेट्टीवार, समाजसेवी राजू लभाणे, आकाश दाते, अहसान राही, भगवानदास आहुजा, राजेश धोपटे, विजय सत्यम आदी मान्यवर उपस्थित होते.

चांगली मैत्री माणसाला केवळ आनंद देत नाही, तर अधिक चांगला माणूस होण्यासाठी प्रेरणाही देते, असे मत योगेश सोमण यांनी व्यक्त केले. साहित्यिकांच्या या स्नेहभेटीत साहित्य, मैत्री आणि सामाजिक जिव्हाळ्याच्या विविध विषयांवर मनमोकळी चर्चा झाली.

कावडीखाली चिरडलेल्या अभिजीतच्या कुटुंबाला मदतीचा आधार द्या

वर्धा जनमाध्यम : कावड यात्रेपूर्वी ठेवण्यात आलेल्या कावडीखाली दबून सहा वर्षीय चिमुकला अभिजीत पाटील याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण परिसर हळहळला आहे. या दुर्घटनेमुळे पाटील कुटुंबावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला असून, या संकटाच्या काळात शासनाने कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, अशी मागणी पूर्व राज्यमंत्री रणजीत प्रताप कांबळे यांनी केली आहे.

कांबळे यांनी वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देत अभिजीतच्या कुटुंबाला शासकीय आपत्ती व्यवस्थापनाच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याची मागणी केली. अवघ्या सहा वर्षांच्या चिमुकल्याचा अपघाती मृत्यू हा कुटुंबासाठी कधीही न भरून निघणारा आघात आहे. या घटनेने कुटुंबीयांचे मानसिक बळ खचले असून, त्यांच्यासमोर भविष्यातील उदरनिर्वाहाचा प्रश्नही निर्माण झाला आहे. अशा आकस्मिक आपत्तीच्या प्रसंगी शासनाची मदत ही केवळ आर्थिक आधार नसून दुःखात सावरणाऱ्या कुटुंबासाठी मोठा दिलासा ठरते. त्यामुळे प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत अभिजीतच्या कुटुंबाला तातडीने शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे. चिमुकला अभिजीत आज या जगात नसला तरी त्याच्या कुटुंबाचे आयुष्य पुढे उभे आहे. त्यांच्या भविष्याला आधार मिळावा, उदरनिर्वाहाचा मार्ग सुकर व्हावा आणि या असह्य दुःखातून सावरण्यासाठी शासनाने मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

संघर्षाला यशाची सलामी; साहिल शंभरकर यांची राज्य कर निरीक्षकपदी भरारी

वर्धा जनमाध्यम : जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर यशाचे शिखर गाठलेल्या साहिल संजय शंभरकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून राज्य कर निरीक्षक (ऍ्ली ऊँ घ्हेजम्दे) पदावर भरारी घेतली. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल थूल ले-आऊट परिसरातील मित्र परिवाराच्या वतीने भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

अशोकनगर, थूल ले-आऊट, सिंदी मेघे येथील रहिवासी संजय शंभरकर यांचे सुपुत्र साहिल यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत एमपीएससी परीक्षेत यश मिळविले. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीयांसह परिसरातील नागरिक आणि मित्र परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आम्रपाली बुद्धविहारातील सदस्य बारहाते, नितीन थूल, दिलीप नारायणे, राजेश शेंडे, अविनाश तामगाडगे, राजेश कांबळे, दिलीप वैध तसेच सामाजिक कार्यकर्ते पद्माकर कांबळे यांच्या मित्र परिवाराच्या वतीने साहिल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या यशाबद्दल मनोगत व्यक्त करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

साहिल यांच्या यशाने परिसरातील युवकांसमोर मेहनत, चिकाटी आणि ध्येय निश्चितीचा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. त्यांच्या यशाचे परिसरातून कौतुक होत असून, भविष्यातही त्यांनी प्रामाणिकपणे समाजसेवा आणि कर्तव्य बजावावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

स्मार्ट मीटर ठरतोय 'स्मार्ट' बचतीचा मंत्र

वर्ध्यातील ९७ हजार ग्राहकांची जुलैमध्ये २३.९० लाखांची बचत

वर्धा जनमाध्यम : वाढत्या महागाईच्या काळात वीज ग्राहकांना दिलासा देणारी महावितरणची स्मार्ट टीओडी अर्थात टाइम ऑफ डे मीटर योजना वर्धा जिल्ह्यात ग्राहकांच्या फायद्याची ठरत असल्याचा दावा महावितरणने केला आहे. जुलै २०२६ या महिन्यात वर्धा जिल्ह्यातील ९७ हजार ५७२ ग्राहकांनी तब्बल २३ लाख ९० हजार रुपयांची बचत केली आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरचा वापर आणि दिवसा वीज वापरण्याची पद्धत ग्राहकांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार सौरऊर्जेच्या उपलब्धतेचा अधिकाधिक फायदा ग्राहकांना मिळावा, यासाठी टीओडी दररचनेचा वापर करण्यात येत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना चालू आर्थिक वर्षात प्रति युनिट ८५ पैशांची सवलत दिली जात आहे. भविष्यात ही सवलत प्रति युनिट एक रुपयापर्यंत वाढविण्याचे नियोजन असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

वर्ध्यात १.५१ लाख स्मार्ट मीटर

वर्धा जिल्ह्यात घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रवर्गातील मिळून सुमारे १ लाख ५१ हजार ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. उर्वरित ग्राहकांनाही बिलिंग सायकलनुसार या प्रक्रियेत सहभागी करून घेतले जात आहे. स्मार्ट मीटरमुळे मीटर रीडिंग स्वयंचलित होत असून प्रत्यक्ष वीज वापराची माहिती डिजिटल पद्धतीने उपलब्ध होत आहे. 'एमसीएल महा ऊर्जा' ?पच्या माध्यमातून ग्राहकांना आपल्या वीज वापराचा रिअल टाइम डेटा पाहता येतो. त्यामुळे कोणत्या वेळी किती वीज वापरली जाते, याचा अंदाज घेऊन ग्राहकांना वीज वापराचे नियोजन करता येत आहे,

स्मार्ट मीटरबाबत काही ठिकाणी गैरसमज पसरविले जात असल्याने महावितरणने ग्राहकांना सावध केले आहे. स्मार्ट मीटर बसविण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसून ही प्रक्रिया मोफत असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढते किंवा ठरावीक कालावधीनंतर वीजपुरवठा आपोआप खंडित होतो, अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

वर्ध्यातील ग्राहकांचा थेट फायदा

जुलै महिन्यात वर्ध्यातील ९७ हजार ५७२ ग्राहकांच्या बिलात २३.९० लाख रुपयांची बचत झाली आहे. म्हणजेच दिवसाच्या सौरऊर्जेच्या उपलब्धतेच्या काळात वीज वापरण्याची सवय ग्राहकांच्या खिशाला दिलासा देणारी ठरत आहे. अचूक बिलिंग, वीज वापराचे डिजिटल निरीक्षण आणि सवलतीचा लाभ यामुळे स्मार्ट टीओडी मीटर योजना वर्ध्यात कितपत लोकप्रिय होते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

महावितरणला शेतकऱ्यांचा इशारा; आता अंधार सहन करणार नाही

आर्वी जनमाध्यम : शेतकऱ्यांच्या शेती व सिंचनाच्या प्रश्नावर दहेगाव (मुस्तफा) येथे आता संतापाचा वणवा पेटण्याची चिन्हे आहेत. शेतीसाठी अनियमित आणि रात्रीच्या वेळी होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत असल्याचा आरोप करीत सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर राठोड यांच्या नेतृत्वाखाली महावितरण आणि जिल्हा प्रशासनाला २४ तास अखंड, सुरक्षित आणि दर्जेदार शेती वीजपुरवठ्याची मागणी करणारे सविस्तर निवेदन देण्यात आले. १५ दिवसांत लेखी निर्णय न झाल्यास महावितरण कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत संविधानिक जनआंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

दहेगाव (मुस्तफा)सह कवाडी, गव्हाणखेडी, पाचेगाव, बोरगाव हातला, पिपरी, धनोडी आणि पारगोठाण परिसरातील शेकडो कृषीपंपधारक शेतकरी वीज समस्येने त्रस्त असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दिवसा वीज न देता मध्यरात्री किंवा पहाटे अनियमित वीजपुरवठा केला जात असल्याने शेतकऱ्यांना हातात टॉर्च घेऊन जीव मुठीत धरून शेत गाठावे लागत आहे. कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा आणि जळालेले ट्रान्सफॉर्मर यामुळे सिंचनाचे नियोजन पूर्णपणे कोलमडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर W9925016 वरील माझे RITURAJ CHUDIWALE असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील RITURAJ ALOK CHUDIWALE नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- बच्छराज रोड वर्धा ४४२००१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

भाजपचा 'एकला चलो'चा नारा

- भाजपने अकाली दलासोबतची युती तोडली
- पंजाबच्या राजकारणात खळबळ उडाली
- पंजाबमध्ये भाजप सर्व ११७ विधानसभा जागांवर उमेदवार देणार

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : पंजाबमध्ये मोठी राजकीय घडामोड घडली आहे. भाजपने एकला चलोचा नारा देत मित्र पक्षासोबत युती तोडली. अकाली दलासोबतच्या युतीबद्दलच्या अटकळांना पूर्णविराम देत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केवल सिंग ढिल्लन यांनी स्पष्टपणे सांगितले की, भाजप पंजाबची निवडणूक स्वबळावर लढेल. त्यांनी पुढे असेही सांगितले की, २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत आमचा पक्ष सर्व ११७ विधानसभा जागांवर स्वत?चे उमेदवार उभे करेल. त्यामुळे अकाली दलासोबत युती करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मंगळवारी हाटेल ले बॅरन येथे झालेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर केवल सिंग ढिल्लन यांनी पत्रकार परिषद घेत भाजप स्वबळावर निवडणूक लढणार असल्याचे सांगितले. केवल सिंग ढिल्लन म्हणाले की, पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते निवडणुकीसाठी पूर्णपणे तयार असून पंजाबमध्ये भाजपचे सरकार स्थापन करण्याच्या उद्देशाने सक्रियपणे काम करत आहेत.

ढिल्लन यांनी पुढे असेही सांगितले की, 'पंजाबमधील सध्याची परिस्थिती चांगली नाही. राज्यावरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत चालला आहे. विकासकामे अपेक्षेप्रमाणे होत नाहीत आणि लोकांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल चिंता आहे. पंजाबच्या जनतेला आता आम आदमी पार्टीचे सरकार बदलायचे आहे. पंजाबमधील जनता भाजपकडे एक पर्याय म्हणून पाहत आहेत.' तसंच, 'केंद्रातील मोदी सरकारने देशात विकासाची नवी दिशा निर्माण केली आहे आणि परदेशात भारताची प्रतिष्ठा वाढत चालली आहे. पंजाबच्या जनतेलाही २०२७ मध्ये भाजपला संधी मिळावी असे वाटत आहे. पंजाबमध्ये भाजपचे सरकार स्थापन करण्यासाठी पक्षाचे कार्यकर्ते खूप मेहनत घेत आहेत.' पंजाब विधानसभा निवडणूक भाजप स्वबळावर लढणार असल्यामुळे आता पंजाबमधील राजकीय समिकरणं आणखी बदलण्याची शक्यता आहे.

भ्रष्ट अधिका-यांना आता दे धक्का! 314 अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या रडारवर

मुंबई/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत जाण्याच्या चर्चांना उधाण आलेलं असतानाच आता राज्याच्या प्रशासनात ऊलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. राजकीय वरदहस्तामुळे दीर्घकाळ एकाच विभागात प्रभाव निर्माण केलेल्या अधिका-यांकडे मुख्यमंत्र्यांच्या टार्गेटवर आल्याची चर्चा आहे. राज्यातील शेकडो अधिका-यांवर मुख्यमंत्री कार्यालयाची करडी नजर असल्याची माहिती सूत्रांनी दिलीये.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून मंत्रालय आणि विविध विभागांतील अधिका-यांच्या नियुक्त्यांचा आढावा घेण्यात येत असल्याची चर्चा आहे. कोणता अधिकारी किती वर्षांपासून एकाच विभागात कार्यरत आहे? कोणत्या पदावर आहे? आणि त्याची बदली किती काळापासून प्रलंबित आहे? याची माहिती संकलित करण्यात आल्याचं सूत्रांनी म्हटलंय. विशेष म्हणजे, या प्रक्रियेत एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या सुमारे ३१४ अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या रडारवर आल्याची माहिती आहे. या अधिका-यांना सध्याच्या विभागातून इतर विभागांमध्ये हलवण्याच्या हालचालींना वेग आलाय. त्यामुळे येत्या काळात मंत्रालयासह विविध शासकीय विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय फेरबदल होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, मंत्रालयातील विविध विभागांसह मंत्रालयाबाहेरील महत्त्वाच्या कार्यालयांमध्ये अनेक अधिकारी वर्षानुवर्षे एकाच विभागात कार्यरत आहेत. काही अधिकारी तर जवळपास दहा वर्षांपासून त्याच विभागात महत्त्वाच्या पदावर असल्याचं समोर आलंय. त्यामुळे प्रशासनात दीर्घकाळ एकाच विभागात असणा-या अधिका-यांमुळे निर्माण होणा-या हितसंबंधांच्या साखळीवरही प्रश्न ऊपस्थित झालेत.खरंतर,याआधी मुख्यमंत्री कार्यालयानं मंत्री आस्थापनेवर अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या खासगी सचिव आणि OSD यांच्याबाबतही कठोर भूमिका घेत अनेकांना बाहेरचा रस्ता दाखवला होता. त्यानंतर आता मंत्रालयातील प्रशासकीय यंत्रणेच्या इतर स्तरांकडेही मुख्यमंत्र्यांनी मोर्चा वळवल्याचं दिसतंय.

देवेंद्र फडणवीसांना केंद्रात नवी जबाबदारी? दिल्लीत भाजपच्या गोटात हालचाली

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे दिल्ली दौरे वाढू लागलेत तसं राज्याच्या राजकारणात त्यांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.त्यातच मुख्यमंत्री फडणवीसांनी महायुतीतील नेत्यांसोबत वर्षा निवासस्थानावर खलबतं केल्याची माहिती समोर येतेय. या बैठकीनंतर विरोधकांना मात्र गुदगुल्या झाल्यात. फडणवीस पंतप्रधान व्हावे अशी इच्छा काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवारांनी बोलून दाखवलीये. तर दुसरीकडे फडणवीसांनी दिल्लीला जायची आवराआवर सुरू केली असल्याचं थेट विधान संजय राउतांनी केलं आहे. स्थानिक स्तरावर महायुतीत पूर्णपणे समन्वय ठेवावा.महायुतीतील आमदार किंवा खासदारानं एकमेकांच्या नेत्यांवर किंवा पक्षांवर सार्वजनिक टीका करू नये. निधी वाटपावरून मतभेद झाल्यास सर्वप्रथम विभागीय आयुक्तांमार्फत तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा. विभागीय स्तरावर तोडगा न निघाल्यास समन्वय समितीच्या पातळीवर अंतिम निर्णय घ्यावा.तरीही वाद कायम राहिला तर मुख्यमंत्री आणि दोन्ही ऊपमुख्यमंत्र्यांच्या ऊपस्थितीत अंतिम निर्णय घेतला जाईल.दुसरीकडे भाजपच्या संसदीय समितीत फडणवीसांना स्थान मिळण्याची शक्यताही सूत्रांनी वर्तवली असल्यानं या चर्चांना फडणवीसांच्या राजकीय विरोधकांकडूनही बळ दिलं जातंय. मुख्यमंत्र्यांनी महायुतीच्या बैठकीत समन्वयाचं आवाहन केलं असलं तरी ही खरच आवराआवर आहे का? आणि एकूणच फडणवीस दिल्लीच्या राजकारणात सक्रीय होणार का हे पाहणं औत्सुक्याचं असेल.....

साखरेच्या आयातीसाठी नवीन नियम लागू; सरकारने उचलले कठोर पाउल

नवी दिल्ली / प्रतिनिधी- साखरेच्या वाढत्या किमती आणि कमी होत असलेल्या साठ्यावरून देशातील राजकारण चांगलेच तापले आहे. मात्र आता सण-ऊत्सवांच्या काळात साखरेचे

वाढते दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने कच्च्या साखरेच्या आयातीबाबतच्या नियमांमध्ये सुधारणा करून कठोर पावले उचलली आहेत. सुधारित नियमांनुसार साखरेचा होणारा मोठा साठा रोखण्यासाठी आयात केलेली कच्ची साखर दोन महिन्यांच्या आत शुद्ध करून विकणे अनिवार्य करण्यात आले आहे.साखरेच्या दरातील वाढीच्या पार्श्वभूमीवर सरकारने सोमवारी (२४ ऑगस्ट) आयातीच्या अटींमध्ये बदल केले आहेत. आता टॅरिफ रेट कोटा अंतर्गत आयात केलेली कच्ची साखर पांढ-या किंवा शुद्ध साखरेमध्ये रूपांतरित करून दोन महिन्यांच्या आत देशांतर्गत बाजारात विकणे बंधनकारक आहे. यापूर्वी, आयात केलेली कच्ची साखर ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देशांतर्गत बाजारात विकता यावी, यासाठी त्यावर वाजवी कालावधीत आणि बऱ्याच आधी प्रक्रिया करणे आवश्यक होते. आता मात्र, सुधारित नियमांनुसार प्रक्रिया आणि विक्रीसाठी दोन महिन्यांची कडक मुदत निश्चित करण्यात आली आहे.

साठेबाजीवर आळा घालण्यासाठी सरकारचे पाउल-सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखर आयात करण्यास परवानगी दिली आहे आणि शीतपेये व आइस्क्रीम उत्पादक, तसेच संबंधित व्यापारी व मोठ्या प्रमाणात साखर वापरणा-यांसाठी साठवणुकीच्या मर्यादा निश्चित केल्या आहेत. मात्र साखरेचा साठा करून ठेवणे आणि काळा बाजार यांविरुद्ध कारवाई करावी, अशी विनंती देशभरातील राज्यांनी केंद्राकडे केली होती. त्यानुसार आता साखर आयात नियमांमधील बदलाबाबतची अधिसूचना वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जारी केली आहे.

गेल्या महिन्यात साखरेच्या दरात मोठी वाढ- सरकारी आकडेवारीनुसार, एका महिन्यापूर्वी साखरेची किंमत प्रति किलो ४८.७३ रुपये होती, मात्र सोमवारी साखरेची अखिल भारतीय सरासरी किरकोळ किंमत प्रति किलो ६३.०५ रुपये एवढी वाढली आहे. म्हणजेच त्यात २९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. साखरेची कमाल किरकोळ किंमत प्रति किलो ७५ रुपयांपर्यंत पोहोचली होती.

ग्राहकांची पळापळ; बाजारात प्रतिव्यक्ती 1 किलोच साखर

साखरेचे दर वाढल्याने अनेकांचा चहा फिका झालाय. त्यातही काही मालमध्ये प्रतिव्यक्ती फक्त१ किलो साखर मिळणार असे फलक झळकल्याने ग्राहकांची चिंता वाढली आहे. महागाईच्या वणव्यात ऐन सणासुदीला साखर कडू झाल्याने गृहीणींचं बजेट कोलमडलंय. सोलापूरच्या सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याबाहेर झुंबड उडालीय. कारखान्याकडून प्रत्येक सभासद शेतकऱ्याला ५० किलो साखर दिली जाते. अचानक साखर वाटप सुरू झाल्याची माहिती मिळताच रांगा लागल्या.

देशातील 8.7 कोटी तरुण काम, शिक्षण आणि प्रशिक्षणापासून वंचित

नवी दिल्ली /वृत्तसंस्था- देशातील तब्बल ८.७ कोटींहून अधिक तरुणांबाबत नीती आयोगाचा एक धक्कादायक अहवाल आहे. या तरुणांना रोजगार, शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण मिळालेले नाही. १५ ते २९ वयोगटातील अंदाजे ८.७ कोटी भारतीय तरुण या श्रेणीत येतात. नीती आयोगाच्या एका अहवालानुसार, १५ ते २९ वयोगटातील ११ टक्के तरुण ना शिक्षण घेत आहेत, ना नोकरी करत आहेत. तर, पदवीधरांपैकी फक्त ८.२५ टक्के तरुणांनाच पात्रतेशी सुसंगत नोकरी मिळाली आहे. १५ ते २९ वयोगटातील ८८ टक्के तरुण घरगुती कामात गुंतलेले आहेत.अहवालात राज्याच्या महास्वयम योजनेचे कौतुक करण्यात आले आहे.

नीती आयोगाच्या ताज्या हवालानुसार, २०१४-१५ पासून आतापर्यंत देशात ७.६७ कोटींहून अधिक व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात आले. ही गती कायम राखण्यासाठी केंद्र सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात विविध मंत्रालयांच्या माध्यमातून कौशल्य विकासाशी संबंधित खर्चासाठी ३४ हजार कोटींची तरतूद केली. महाराष्ट्राच्या महास्वयम यांसारख्या राज्यस्तरीय योजनांनीही या प्रयत्नांमध्ये पूरक भूमिका बजावली आहे. महिलांच्या बाबतीत हा अहवाल अत्यंत काळजी वाढवणारा आहे. देशात फक्त ३ टक्के महिला औपचारिक नोक-यांमध्ये कार्यरत आहेत. सुमारे ७१ टक्के महिला एक तर अनौपचारिक कामांमध्ये आहेत किंवा शिक्षण आणि रोजगारापासून पूर्णपणे दूर आहेत. घरगुती जबाबदा-या, सुरक्षितता आणि प्रवासाच्या अडचणींमुळे महिलांना घराबाहेर पडून प्रशिक्षण घेणे कठीण होते. त्यामुळे ६८ टक्के महिला अर्धवेळ अभ्यासक्रमांना प्राधान्य देतात.` तरुण नवीन गोष्टी किंवा कौशल्ये का शिकू शकत नाहीत, याची काही कारणे अहवालात दिली आहेत. त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे कुटुंबाची गरिबी आणि आधीच्या शिक्षणावर झालेला मोठा खर्च. तसेच, प्रशिक्षण घेताना चालू असलेले काम सोडावे लागल्यास घर चालवणे अवघड होते. तर, पूर्णवेळ किंवा कडक वेळेचे कोर्सेस करणे अनेकांना शक्य होत नाही. देशाला २०४७ पर्यंत विकसित देश बनवायचे असेल, तर या तरुण शक्तीचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. त्यासाठी आयोगाने काही ऊपायही सुचवले आहेत. तरुणांना अत्यंत कमी खर्चात किंवा सबसिडीवर कौशल्य प्रशिक्षण ऊपलब्ध करून देण्यात येउ शकते. तसेच, शिकत असतानाच कमावण्याची सुविधा देण्यात येउ शकते, जेणेकरून शिक्षणासोबत पैशांची अडचण येणार नाही. स्थानिक उद्योग आणि बाजारातील मागणीनुसार प्रशिक्षण कोर्सेस तयार करण्यात येउ शकतात.

राहुल-खरगेंचे मोदींना पत्र- जात जनगणनेचे प्रश्न बदला:

म्हटले- यात मागासवर्गीय शब्द नाही; बिहार-तेलंगणासारखी प्रक्रिया अवलंबण्याची मागणी

नवी दिल्ली- काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांनी जात जनगणनेत जातींची नावे नोंदवण्याच्या आणि डेटा गोळा करण्याच्या पद्धतीला विरोध केला आहे.त्यांनी पंतप्रधान मोदींना पत्र लिहून जनगणनेत विचारले जाणारे प्रश्न बदलण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले की, हे तयार करण्यापूर्वी राजकीय पक्ष, तज्ञ आणि जनतेचा सल्ला घेतला पाहिजे.जनगणनेच्या प्रश्नांमध्ये 'मागास प्रवर्ग' हा शब्द नसल्याबद्दलही त्यांनी आक्षेप घेतला. त्यांनी म्हटले की, यामुळे देशातील ओबीसी लोकसंख्येचा अचूक आकडा समोर येण्यास अडचण येउ शकते. तेलंगणा आणि बिहारसारखी प्रक्रिया अवलंबण्याची मागणी केली आहे.जातीचे नाव विचारण्यासाठी प्रश्न विचारल्यास, एकच जात वेगवेगळ्या नावांनी किंवा ऊपजातींच्या नावांनी नोंदवली जाउ शकते. यामुळे जातींची अचूक संख्या शोधणे आणि आकडेवारीची तुलना करणे कठीण होईल.जर एकच जात अनेक नावांनी नोंदवली गेली, तर तिच्या लोकसंख्येची आकडेवारी चुकीची असू शकते. याचा परिणाम मागासलेल्या, अतिमागासलेल्या आणि इतर वंचित समुदायांसाठी तयार केलेल्या योजनांवर होईल.

जातींची ओळख आणि संख्या नोंदवण्याची प्रक्रिया एकसारखी असावी, जेणेकरून देशातील सामाजिक-आर्थिक स्थितीची अचूक आकडेवारी मिळू शकेल. जातींची नावे नोंदवण्यासाठी निश्चित यादी किंवा ड्राप-डाऊन पर्याय देण्याची मागणी केली आहे. यात सरकारी जातींच्या याद्या आणि भारतीय मानवशास्त्र सर्वेक्षणानुसार नावे समाविष्ट केली जाउ शकतात. तेलंगणा आणि बिहारमधील जात सर्वेक्षणांमध्येही अशा याद्यांचा वापर करण्यात आला होता.

जनगणनेत ४० प्रश्न विचारले जातील-१४ ऑगस्ट रोजी जनगणना-२०२७ मध्ये विचारल्या जाणा-या ४० प्रश्नांची यादी जारी करण्यात आली होती. लोकांना SC, ST किंवा इतर जातीबद्दल विचारले जाईल.स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच सर्व समुदायांच्या जातीची माहिती जनगणनेत नोंदवली जाईल.यापूर्वी २०११ च्या जनगणनेच्या फार्ममध्ये २९ प्रश्न होते. यात जातीशी संबंधित माहितीसाठी फक्त SC/ST चा पर्याय होता.जनगणना-२०२७ च्या प्रश्नांच्या यादीत जातीशी संबंधित प्रश्न क्रमांक १० वर आहे, ज्यात SC/ST सोबत 'जात' हा शब्दही जोडला गेला आहे.विशेष म्हणजे, लोकांना कोविड लस कुठे घेतली होती, हा प्रश्नही विचारला जाईल. यासोबतच मोबाईल नंबर, आधार, मतदार ओळखपत्र (व्होटर आयडी) आणि बँक खात्याशी संबंधित प्रश्नही असतील.

जनगणनेत OBC प्रवर्ग का नाही?

केंद्र सरकारकडून जनगणनेच्या दुस-या टप्प्याची सुरूवात झालीये. मात्र, या जनगणनेवरून राजकारण तापलंय. काँग्रेसनं सरकारच्या जणगणना प्रक्रियेवर आक्षेप घेतल्यानं नवा वाद होण्याची शक्यता आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जणगणनेसंदर्भात थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून मोठी मागणी केलीये. एव्हंढच नव्हे तर जात जनगणनेत एससी-एसटींसारखा ओबीसींच्या गणनेसाठी स्वतंत्र कालम न ठेवण्यानं राहुल गांधींनी गंभीर प्रश्न ऊपस्थित केलेत...तर दुसरीकडे, सकल ओबीसी समाजाकडून राज्यस्तरीय ओबीसी संघटनांची बैठक मुंबईत पार पडलीये. जात जनगणनेत ग्रएक समाजासाठी स्वतंत्र कालम देण्याची मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांनी केलीये.

अलाहाबाद HC म्हणाले- शाळेत हिजाब घालण्याची परवानगी नाही

धर्मनिरपेक्षतेसाठी गणवेश आवश्यक; अल्पवयीन विद्यार्थिनीची याचिका फेटाळली

प्रयागराज-अलाहाबाद ऊच्च न्यायालयाने शाळांमध्ये हिजाब घालण्याची परवानगी देण्यास नकार दिला आहे. न्यायालयाने सोमवारी सांगितले की, शाळेत गणवेशाच्या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे मुलांमध्ये समानतेची भावना राहते. शाळेची स्वत?ची ओळखही निर्माण होते. ऊच्च न्यायालयाने म्हटले की, गणवेशामुळे कोणताही धार्मिक भेदभाव नसलेले वातावरण टिकून राहते. त्यामुळे कोणताही विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी शाळेने ठरवलेला ड्रेस कोड बदलण्याचा आग्रह करू शकत नाही.

न्यायालय म्हणाले- शाळेत वैयक्तिक आधारावर हिजाब घालण्याची परवानगी दिली जाउ शकत नाही. हे गणवेशाच्या संकल्पनेच्या विरोधात असेल. यामुळे शाळेतील शिस्त ठरवण्याचा अधिकार संस्थेऐवजी वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या हातात जाईल. न्यायमूर्ती जे.जे. मुनीर आणि न्यायमूर्ती इंद्रजीत शुक्ला यांच्या खंडपीठाने यासोबतच एका अल्पवयीन विद्यार्थिनीची याचिका फेटाळून लावली. या याचिकेद्वारे शाळेने ठरवलेल्या ड्रेस कोडसोबत हिजाब घालून वर्गात बसण्याची परवानगी मागण्यात आली होती. पुढे आपण संपूर्ण प्रकरण सविस्तरपणे जाणून घेउ, पण त्याआधी दिव्य मराठी न?लेज मध्ये जाणून घ्या की शाळांमध्ये हिजाब वाद कुठून सुरू झाला, सर्वोच्च न्यायालयाचा काय निर्णय होता आणि इस्लाममध्ये हिजाबचा ऊल्लेख कुठून आला.कर्नाटकच्या उडुपी येथील एका सरकारी कालेजमध्ये जानेवारी २०२२ मध्ये हिजाबचा पहिला वाद झाला. काही मुस्लिम विद्यार्थिनींनी हिजाब घालून वर्गात बसण्याची मागणी केली. क?लेज प्रशासनाने ही मागणी गणवेश नियमांच्या विरोधात असल्याचे सांगितले. यानंतर हा विरोध इतर क?लेजेसपर्यंत पोहोचला. काही ठिकाणी भगव्या शाली परिधान करून त्याचा विरोध करण्यात आला. १५ मार्च २०२२ रोजी कर्नाटक ऊच्च न्यायालयाने विद्यार्थिनींची याचिका फेटाळताना म्हटले की, हिजाब ही इस्लामची अनिवार्य धार्मिक प्रथा नाही. त्यामुळे शाळेच्या निश्चित गणवेश संहितेचे (ड्रेस कोड) पालन केले पाहिजे.

सुप्रीम कोर्टात हिजाब प्रकरण अजूनही प्रलंबित-हिजाब वादावर १३ ऑक्टोबर २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा निर्णय एकमताने नव्हता. दोन्ही न्यायाधीशांचे मत भिन्न होते.न्यायमूर्ती हेमंत गुप्ता यांनी कर्नाटक ऊच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. त्यांच्या मते, शाळेचा गणवेश संहिता (ड्रेस कोड) सर्व विद्यार्थ्यांवर समान रीतीने लागू होतो आणि हिजाब ही इस्लामची अनिवार्य धार्मिक प्रथा असल्याचे सिद्ध झाले नाही.तर न्यायमूर्ती सुधांशु धुलिया यांनी म्हटले की, या प्रकरणात हे ठरवणे आवश्यकच नाही की हिजाब अनिवार्य धार्मिक प्रथा आहे की नाही.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

हिंदू राष्ट्राच्या पाठीशी...

नेपाळ हा भारताचा शेजारी देश असून येथे आता 'जेन झी'ने (तरुण पिढीने) पुन्हा एकदा देशाला हिंदू राष्ट्र बनवण्याची मागणी केली आहे आणि त्यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. नेपाळमध्ये हिंदू राष्ट्र की धर्मनिरपेक्ष राष्ट्र या द्वंद्वात देश अडकला आहे. नेपाळमध्ये हिंदू राष्ट्राच्या मागणीला पाठिंबा मिळण्याचे कारण आहे; परंतु नेपाळमध्ये इस्लामिक शक्ती, युरोपियन शक्ती आणि चीनची ताकद हिंदू राष्ट्राच्या विरोधात आहेत. नेपाळ अशांत आहे आणि आता जेन झीने समाजमाध्यमांच्या द्वारे मोहीम आणखी तीव्र केली आहे. अर्थात, नेपाळमध्ये लोक या आंदोलनाला पाठिंबा देत आहेत, याचे एक कारण म्हणजे नेपाळमध्ये राजकीय अस्थिरता आणि भ्रष्टाचार प्रचंड आहे. देशाच्या नेतृत्वाला आपल्या दैन्यावस्थेसाठी जबाबदार धरले पाहिजे, अशी भावना त्यांची झाली आहे. आणि याच्या जोडीला आहे ते आर्थिक सुधारणांचा संथ वेग. ते शेजारी भारताकडे पाहतात तेव्हा त्यांना दिसते की भारताने प्रगत देश म्हणून वेगाने वाटचाल केली आहे आणि आता तर तो विकसित देश म्हणून २०२४ ते २०४७ च्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. नेपाळी तरुण पिढी आपल्या उद्दिष्टात सफल होते की नाही, तो वेगळा मुद्दा आहे. पण एक बाब मात्र स्पष्ट आहे की नेपाळच्या तरुण पिढीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एक निश्चित आहे की हा विषय इतक्या सहजी साध्य होणारा नाही आणि त्यावर दीर्घकालीन मंथन बाकी आहे. पण व्यापक दृष्टीने पाहिले असता नेपाळी सर्वसाधारण युवक हा तेथील भ्रष्टाचाराने आणि आर्थिक असमानतेने तसेच भाईभतीजावादाने पोळलेला आहे. त्याला यातून सुटका हवी आहे. नेपाळ हे २०१५ पर्यंत सेक्युलर राष्ट्र होते आणि त्यामुळे कोणत्याही धर्माला तेथे विशेष प्रेमाचे स्थान नव्हते. पण चार ते पाच वर्षांत स्थिती नाट्यमयरीत्या बदलली आहे आणि जेन झेडही हिंदू राष्ट्राच्या पाठीशी उभी आहे आणि ही मागणी घेऊन नेपाळी युवक-युवतींनी सह्यांची मोहीम राबवली आहे. तिला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. हिंदू शक्तींच्या या मुसंडीने बालेन सरकार बॅकफुटवर ढकलले गेले आहे. नेपाळी युवा आता 'गर्व से कहो हम हिंदू है' अशा घोषणा देत आहेत. नेपाळी पंतप्रधान बालेन शहा यांनी या मुद्द्यावर मौन पाळले आहे आणि त्यांच्या या पवित्र्यामुळे विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करत आहे. इतकेच नव्हे तर नेपाळी काँग्रेस या मुद्द्यावर दोन गटांत विभागली गेली आहे. अर्थात, भारत या मुद्द्यावर तटस्थता आणि अन्य देशात हस्तक्षेप न करण्याची अधिकृत भूमिका घेऊन आहे. पण नेपाळी जेन झेड मात्र भारताकडे आशेने पाहत आहे. नेपाळला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करण्याच्या मागणीसाठी सहा पक्ष एक झाले आहेत आणि त्यांनी ही मागणी उचलून धरली आहे. त्यातच माजी पंतप्रधान शेरबहादुर देऊवा यांनी या मागणीला समर्थन दिल्यामुळे वातावरण आणखीच खराब झाले आहे. भांडवलशाही आणि साम्यवाद यावर आधारित कोणतेही शासन चालू शकत नाही, याची खात्री लोकांची पटली आहे. त्यामुळे लोक हिंदू राष्ट्राला पाठिंबा देत आहेत, हे वास्तव आहे. भारतातील काँग्रेसचे उदित राज यांनी भारतातील आणि नेपाळमधील स्थिती एकच असल्याचे स्पष्ट केले आहे. पण काँग्रेसची ही नेहमीचीच खेळी राहिली आहे आणि काँग्रेसचा नेहमीचाच आवडता युक्तिवाद राहिला आहे की नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंकेला जेन झेडच्या माध्यमातून लोकांना भडकवायचे आणि येथे सत्तापालट करायचा. या एकाही विरोधी पक्षात मोदींना हटवण्याची ताकद नाही. अर्थात, नेपाळमधील आंदोलनामागे जॉर्ज सोरोस यांची भूमिका महत्त्वाची आहे. सरकार पाडण्यामागे त्यांची भूमिका एखाद्या डीप स्टेटप्रमाणे काम करत आहे. नेपाळमधील सध्याची स्थिती ही गुंतागुंतीची डायनॅमिक्सची आहे. नेपाळचे राजकारण आणि सामाजिक चळवळी यामागे अनेक घटक काम करत आहेत. नेपाळमध्ये सनातन धर्माला राष्ट्रीय ओळख देण्याची मागणी केली जात आहे आणि त्याला जेन झेडचा पाठिंबा आहे. नेपाळचे माजी पंतप्रधान शेरबहादूर देऊवा यांनी आपल्या नेतृत्वाखाली नेपाळी काँग्रेसच्या संमेलनात या मागणीला पाठिंबा दिल्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यामुळे नेपाळला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित केले जाईल किंवा केले जाणार नाही, पण यावर सध्या विचार तरी चालू झाला आहे, हे निश्चितच महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे हा प्रस्ताव केवळ हिंदू धर्मापुरताच मर्यादित नाही, तर त्यात बौद्ध, किरात यांचे संरक्षण करण्याचीही हमी दिली आहे. याचा अर्थ नेपाळला पारंपरिक ओळख देण्यासोबतच सर्व धर्म आणि समुदायांचे धार्मिक स्वातंत्र्य राखण्याची आणि सामाजिक सद्भाव ठेवण्याची चर्चा केली आहे. नेपाळमध्ये बरीच वर्षे राजेशाही होती. २००१ मध्ये प्रिन्स ज्ञानेंद्र याने गोळीबार करून एका दुर्दैवी घटनेत संपूर्ण राजकुटुंबाला संपवले. तेथपासून नेपाळ जो राजकीय अस्थिरतेत गटांगळ्या खात आहे, तो अजूनही थांबलेला नाही. राजे वीरेंद्र आणि राणी ऐश्वर्या यांना त्यात मरण आले, त्यानंतर कम्युनिस्ट पक्षाने या घटनेचा उपयोग करून नेपाळमधील राजेशाही संपवली, पण आज नेपाळी कम्युनिस्ट पक्षाचे नाममात्र अस्तित्व आहे. पण जेन झेडच्या नव्या आंदोलनामुळे पुन्हा एकदा हिंदू राष्ट्र म्हणून उदयाला येण्याची आशा निर्माण झाली आहे. नेपाळमध्ये हिंदूंचे एकमेव राष्ट्र म्हणून अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न होत आहे. नेपाळला राजेशाहीच्या जंजाळातून बाहेर काढून हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी काठमांडूच्या राजकीय दाऱ्यातून निघून सर्व देशभर पसरली आहे. नेपाळमध्ये भारतातून अनेक वस्तूंची निर्यात होते पण तसेच हिंदुत्वाचा प्रसारही धोकादायकरीत्या होत आहे, असे काहींचे मत आहे. पण हाच न्याय ते अन्य धर्मीयांना लागू करत नाहीत. नेपाळी तरुण राजकारण्यांच्या भाईभतीजावादाला आणि भ्रष्टाचाराला कंटाळला आहे आणि त्याने नवा मार्ग निवडला आहे. त्यामुळे ही व्यवस्था केव्हा अंमलात येईल आणि किती काळ राहील, हे सांगता येत नाही. पण तरुण पिढीने नवा मार्ग निवडला आहे.

कष्ट शेतकऱ्यांचे, नफा इतरांचा

ऊस उत्पादक शेतकऱ्याला आपल्या उत्पादनाची किंमत ठरवण्याचा अधिकार नाही. तो ऊस पिकवतो; पण त्याचा भाव सरकार जाहीर करते, ऊस कोणत्या कारखान्याला द्यायचा हे व्यवस्थेतील बंधने ठरवतात आणि त्याचे पैसे कधी मिळणार हे कारखानदाराच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहते.

'ऊस कडू झाला, साखर गोड झाली; कष्ट शेतकऱ्यांचे, नफा इतरांचा' हे केवळ भावनिक घोषवाक्य नाही, तर भारतीय शेतीव्यवस्थेतील एका गंभीर आर्थिक विसंगतीचे जळजळीत वास्तव आहे. शेतकरी आपल्या जमिनीत ऊस पिकवतो, वर्षभर निगा राखतो, निसर्गाच्या संकटांचा सामना करतो आणि स्वतःचे भांडवल धोक्यात घालतो. परंतु त्याच्या ऊसापासून तयार होणारी साखर, मळी, इथेनॉल, वीज व गॅस, प्रेसमड आणि इतर उपपदार्थांमधून मोठी आर्थिक उलाढाल होत असताना त्या मूल्यवृद्धीचा न्याय्य वाटा ऊस उत्पादकाला मिळत नाही. शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या या शोषणाचे मूळ स्पष्टपणे मांडले. त्यांच्या मते, शेतकऱ्याची गरिबी ही त्याच्या आळशीपणामुळे, अज्ञानामुळे किंवा शेतीतील मागासलेपणामुळे निर्माण झालेली नाही. त्याच्या श्रमाचे आणि मालाचे मूल्य जाणीवपूर्वक कमी ठेवणाऱ्या सरकारी आर्थिक धोरणांमुळे तो गरीब राहिला आहे. ऊस उत्पादकांची अवस्था पाहिली तर शरद जोशींचा हा विचार किती अचूक होता, याची पुन्हा एकदा खात्री पटते.

'भारत' आणि 'इंडिया' मधील संघर्ष

शरद जोशी यांनी देशातील आर्थिक विषमता समजावून सांगताना, 'भारत विरुद्ध इंडिया' ही संकल्पना मांडली. शेतीवर अवलंबून असणारा ग्रामीण समाज म्हणजे 'भारत', तर नोकरशाही, राजकीय सत्ता, संघटित उद्योग, शहरी ग्राहक आणि सरकारी संरक्षणाचा फायदा घेणारी व्यवस्था म्हणज 'इंडिया', 'इंडिया'चा विकास स्वस्त अन्नधान्य, स्वस्त कच्चा माल आणि स्वस्त श्रम यांच्या आधारावर करण्यात आला. या विकासाची किंमत 'भारताने', म्हणजेच शेतकऱ्यांनी चुकवली. साखर गोड राहावी, शहरी ग्राहकाला ती तुलनेने स्वस्त मिळावी, साखर उद्योगाला कच्चा माल उपलब्ध व्हावा आणि राजकीय व्यवस्थेच्या नियंत्रणाखाली सहकारी संस्था टिकून राहाव्यात, यासाठी ऊस उत्पादकाच्या मालाची किंमत नियंत्रित करण्यात आली. साखर, इथेनॉल आणि इतर उत्पादनांच्या बाजारातून अनेक घटकांना उत्पन्न मिळते. परंतु या उद्योगाचा पाया असलेल्या शेतकऱ्याला स्वतःच्या उसाचा भाव, खरेदीदार आणि पैसे मिळण्याचीवेळ ठरवण्याचेही स्वातंत्र्य नसते. शरद जोशींच्या भाषेत ही बाजारपेठ नसून शेतकऱ्याला जखडून ठेवणारी नियंत्रित व्यवस्था आहे.

वर्षभराचे श्रम, पण भाव दुसऱ्यांच्या हातात

ऊस हे वर्षभर शेतात राहणारे पीक आहे. जमीन तयार करणे, बेणे खरेदी, लागवड, खते, औषधे, तणनियंत्रण, सिंचन, वीज, मजुरी, तोडणी, वाहतूक आणि कर्जावरील व्याज अशा अनेक खर्चाचा भार शेतकऱ्यावर असतो. अनियमित वीजपुरवठा, वाढती मजुरी, खते व कीटकनाशकांच्या वाढलेल्या किमती, पाण्याची कमतरता, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर, रोगराई आणि हवामान बदल यांचा धोकाही तोच स्वीकारतो. एखाद्या उद्योगपतीला आपल्या उत्पादनाचा खर्च मोजून त्यावर नफा जोडण्याचे स्वातंत्र्य असते. मात्र ऊस उत्पादकाला उत्पादनाची किंमत ठरवण्याचा अधिकार नाही. तो ऊस पिकवतो; पण त्याचा भाव सरकार जाहीर करते, ऊस कोणत्या कारखान्याला द्यायचा हे व्यवस्थेतील बंधने ठरवतात आणि त्याचे पैसे कधी मिळणार हे कारखानदाराच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहते. शरद जोशींचा मूलभूत प्रश्न हाच होता, शेतकऱ्याने स्वतःच्या मालाची किंमत ठरवू नये. स्वतःचा ग्राहक निवडू नये आणि खुल्या बाजारात माल विकू नये, असे का? देशातील इतर प्रत्येक उत्पादकाला असलेले आर्थिक स्वातंत्र्य शेतकऱ्याला नाकारणे हीच त्याच्या शोषणाची सुरुवात आहे.

रास्त भाव म्हणजे सरकारी कृपा नव्हे

ऊसासाठी एफआरपी किंवा काही राज्यांमध्ये राज्यनिहाय दर जाहीर केले जातात. या व्यवस्थेमुळे एक किमान आधार मिळत असल्याचे सांगितले जाते. परंतु केवळ दर जाहीर करणे, म्हणजे शेतकऱ्याला न्याय मिळणे नव्हे. शरद जोशी यांच्या विचारांनुसार शेतमालाचा रास्त भाव हा सरकारने दिलेला पुरस्कार, अनुदान किंवा दान नाही. शेतकऱ्याने निर्माण केलेल्या संपत्तीचा तो न्याय्य मोबदला आहे. 'भीक नको, घामाचे दाम' ही भूमिका याच आर्थिक न्यायातून निर्माण झाली. शेतकऱ्याला कमी भाव देऊन नंतर अनुदाने, कर्जमाफी, वीज सवलत किंवा इतर योजनांच्या नावाने उपकार दाखवणे, हे शेतकऱ्याला कायम परावलंबी ठेवण्याचे धोरण आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग सहकाराच्या पायावर उभा राहिला. सहकारी साखर कारखाने हे मूळतः ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालकीचे आणि त्यांच्या हितासाठी काम करणारे असायला हवे होते. परंतु अनेक ठिकाणी सहकाराचे रूपांतर राजकीय सत्ता निर्माण करण्याच्या साधनात झाले.

शेतकरी कागदोपत्री कारखान्याचा सभासद आणि मालक असला, तरी प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत त्याचा प्रभाव अत्यल्प राहिला. कारखान्याचे व्यवस्थापन, खर्च, कर्ज, साखर विक्री, उपपदार्थांचे उत्पन्न, नोकरभरती आणि इतर व्यवहार याबाबत सामान्य सभासदाला पुरेशी माहिती मिळत नाही. कारखाना नफ्यात असेल, तर त्याचा किती लाभ शेतक-याला मिळतो आणि तोट्यात असेल तर त्याची किंमत उत्पादक का चुकवायची, याचे स्पष्ट उत्तर दिले जात नाही.

उसापासून केवळ साखर तयार होत नाही

कारखान्यात उसाचे गाळप झाल्याने केवल साखरच तयार होत नाही. मळीपासून इथेनॉल आणि विविध रसायने, बगॅसपासून वीज व इतर उत्पादने, प्रेसमडपासून सेंद्रिय खत आणि जैवऊर्जा निर्माण होऊ शकते. भविष्यात हरित ऊर्जा, जैवइंधन आणि कार्बन बाजाराशी संबंधित पक्षाच्या उत्पन्नाच्या नव्या संधीही उपलब्ध होऊ शकतात. मात्र ऊस उत्पादकाता बहुतांश वेळा फक्त ऊसाच्या मूळ किमतीपुरते मर्यादित ठेवले जाते. उपपदार्थामधून मिळणा-या उत्पनाचा हिशेब त्याच्यासमोर पारदर्शकपणे ठेवला जात नाही. उद्योग तोट्यात असल्यास शेतकऱ्याला कमी दर स्वीकारण्याचा सल्ला दिला जातो; परंतु उद्योगाला इथेनॉल, वीज किंवा इतर उपपदार्थांमधून अतिरिक्त नफा मिळाल्यास त्याचा वाटा शेतकऱ्याला मिळेलच, अशी ठोस व्यवस्था नाही. शरद जोशीच्या विचारांशी सुसंगत व्यवस्था उभी करायची असेल, तर उसाच्या संपूर्ण मूल्यसाखळीतील उत्पन्न विचारात घेतले पाहिजे. साखर, इथेनॉल, मळी, बगॅस, वीज, प्रेसमड आणि इतर उत्पादनांमधून मिळणाऱ्या एकूण महसुलाचा पारदर्शक हिशेब करून त्यातील ठरावीक न्याय हिस्सा ऊस उत्पादकांना मिळाला पाहिजे. कष्ट आणि जोखीम शेतकऱ्याची असेल, तर नफ्यातील वाटाही त्याचा असलाच पाहिजे. (पूर्वार्ध)

विलास ताथोड
७०२०५८५२६१

जागतिक बाजारातील तेजी व रूपयाच्या अवमुल्यनामुळे

यंदा कापसाचे मुहुर्ताचे भाव दहा हजार रुपये प्रती क्विंटल राहण्याची शक्यता

इराण अमेरिका युद्धा सोबतच 'एल निनो' मुळे दुष्काळाचे सावट गडद होत आहे. त्यासोबतच रुपयाचे अवमुल्यन होवून ९५ ते ९६ रुपये प्रती डॉलरचा विनिमय दर झाला आहे. कच्च्या तेलाचे फुड ऑईलचे भाव ८५ ते ९५ डॉलर प्रती बॅरल आहेत. यामुळे मानव निर्मीत धाग्याचे (man made Fiber) भाव वाढते आहेत. याचाच परिणाम सुती धाग्याची मागणी वाढली आहे. रुईच्या गाठींचे भाव वाढल्याचे हेही एक कारण आहे.

आजचा कॉटलूक-A चा अमेरीकेतीत रूईचा एक पौण्डचा भाव ९८.२० सेंट आहे. २.२ पौण्ड म्हणजे एक किलो. म्हणजेच 982 X २.२=२.१६०४ डॉलर एक किलो रुईचा भाव रूपयात हा भाव २.१६०४X९५=२०५ रुपये प्रती किलो. अमेरिकेची रूईची खंडणी (गाठ) ३५४ किलोची असते म्हणजेच खंडीचा भाव २०५ ३५ ७२,५७० रु. होतो.

म्हणजेच एक खण्डी रूई ७२,००० रु. पेक्षा कमी असणार नाही. आपल्या १० क्विंटल कापसातून ही रूई मिळते. म्हणजेच एक क्विंटल कापसाची फक्त रूईमुळे ७२०० रु. होतील व ६४ किलो सरकीचे ४२ रू किलो प्रमाणे २,६८८ होतील. म्हणजेच एक क्विंटल कापसाचे ७२००+२६८=९८८८रू होता. दुष्काळी परिस्थिती तीव्र झाली तर खाद्य तेलाच्या व सरकी ढेपीच्या किंमती वाढू शकतात.

मागच्या वर्षी ८०टक्के शेतक-यांनी कापसाची हमी किंमत ८,११० रू असून सुद्धा ७००० ते ७५००रू. भावानेचे कापूस विकाला होता. यंदा कापसाची हमी किंमत ८२०० ते ८७०० रु आहे. म्हणजेच यावर्षी दिवाळी नंतर हमी किंमती पेक्षा जास्त भावात कापसाची विक्री होण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभुमीवर कापसाचा मुहुर्ताचा भाव १० हजार रूपये (Ten thousand) प्रती क्विंटल राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने ११ टक्के रद्द केलेला आयात कर लावून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कमी उत्पादनामुळे संरक्षण दिल्यास फारच मदतीचे ठरेल. तुर्तास एवढेच.

विजय जावंधिया
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

व्हीआयपी कल्चर!

दरम्यान १२ ऑगस्ट रोजी, कर्नाटकच्या मंड्या जिल्ह्यातील श्रीरंगपट्टण येथील आरती उक्कडा मंदिरात, भीमा अमावस्येच्या उत्सवादरम्यान एक घटना घडली. तिचे सीसीटीव्ही फुटेज काल व्हायरल झाल्यानंतर व्यक्त होण्यापासून रोखू शकलो नाही! ऐश्वर्या सुरेश ह्या आपल्या मुलांसोबत मंदिरात आल्या होत्या. त्यांनी रांगेत उभे राहण्याऐवजी मंदिराच्या गर्भगृहात थेट प्रवेशाची मागणी केली. विशेष गर्दी नियंत्रण कर्तव्यावर तैनात असलेल्या पीएसआय सविता पाटील यांनी, उत्सवातील प्रचंड गर्दीमुळे तिला तात्काळ व्हीआयपी प्रवेश नाकारला आणि रांगेत थांबण्याची विनंती केली.

आपल्याला ही किरकोळ बाई नकार देते याच्या त्यांना मिरच्या झोंबल्या. एका जोरदार शाब्दिक वादानंतर, ऐश्वर्याने तिच्या वडिलांच्या राजकीय पदाचा उल्लेख केला आणि दमदाटी करत त्या महिला पीएसआयला थोबाडीत मारली! कर्तव्यावर असलेल्या महिला पोलिसाला थप्पड मारण्यापूर्वी कॅमेऱ्यात तिने फोनचा वापर केल्याचे दिसते!

पीएसआय सविता पाटील यांचे मला विलक्षण कौतुक वाटते. त्यांनी तत्काळ हिशोब चुकता केला. त्यांनी प्रत्युत्तर देत ऐश्वर्याला कचकून थप्पड मारली, त्यानंतर जवळच्या भक्तांनी आणि उपस्थित लोकांनी हस्तक्षेप करून त्यांना वेगळे केले. आता ऐश्वर्याला इतका माज कशाचा असेल ओळखा पाहू? तुम्ही अचूक ओळखलेय. तुमकुरचे भाजप आमदार बी. सुरेश यांची ती मुलगी आहे. साहजिकच पैसा, सत्ता, ताकद यांचा

तिला माज असणार! असो..

या निमित्ताने एक गोष्ट पुन्हा चर्चेत आलीय ती म्हणजे व्हीआयपी कल्चर! ज्या प्रार्थनास्थळांत सामान्य भक्त आणि व्हीआयपी भक्त असा भेद आपल्या डोळ्यासमोर केला जात असेल तर तिथे जायचे मी टाळतो. मग ते कोणतेही मंदिर असले तरी दर्शन घेण्याची इच्छा उरत नाही. आपल्याकडे व्हीआयपी कल्चर इतके बोकाळलेय की प्रत्येक गोष्टीत त्यांना प्राधान्य हवे असते, सोय हवी असते, इतरांपेक्षा आपण सुपेरियर आहोत हे दिसले पाहिजे अशा सर्व सुविधा त्यांना हव्या असतात. मग त्यासाठी थोडे पैसे जास्त आकारले गेले तरी त्यांची हरकत नसते. उलट वाट्टेल तितके पैसे फेकून आपले व्हीआयपी कल्चर टिकवण्याकडे त्यांचा कल असतो.

आपल्याकडे लालबागचा राजा मंडळाच्या गणपती दर्शनात ही दृश्ये नित्य दृष्टीस पडतात. कोणत्याही मंदिरात गेलात तरी थोड्या मोठ्या बुडाच्या माणसाला पाहिले की तिथले व्यवस्थापन आणि मंदिरातले लोक लाळ गाळायला सुरुवात करतात! लोक तासंतास रांगेत उभे असतात आणि हे काही मिनिटात येऊन दर्शन करुन जातात, जाताना यांच्या तोंडांवरचे माजोरडे भाव पाहण्यासारखे असतात! एरव्ही सामान्य भक्तांना बखोटास धरून हाकलून देणारे मंदिरातले पुजारी, पुरोहित आदी मंडळी अशा मोठ्या धेंडांचे काय चाटू आणि काय नको असे करत असतात!

मी आस्तिक आहे. मात्र ही सर्व दृश्ये पाहिली की वाईट वाटते. 'देव गरिबांचा नसतो, त्याच्या दरातला न्यायदेखील समान नसतो' हे वाक्य पुन्हा पुन्हा कानी पडत राहते. ह्या सर्व साठमारीत बदल होईल याची पुसटशी देखील शक्यता माझ्या मनात नाही. मी सोलापूरचा आहे. पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर आदी तीर्थक्षेत्रासाठी इथे भाविक नित्य येतात, ह्या सर्व ठिकाणी स्पेशल भक्त लोकांना मागचे पुढचे मधले खालचे वरचे असे विविध गुप्तदारे असतात तिथून त्यांना बिनदिक्कत आत सोडले जाते. बाकी पब्लिक आशाळभूतासारखे त्यांच्याकडे पाहत राहते! हे दृश्य सर्व देवस्थानात कमीअधिक प्रमाणात दिसते. सबब जेव्हा शून्य गर्दी असते तेव्हाच तिथे जावे वाटते, अन्यथा घरी बसूनही ईशचिंतन होतेच की! या बाबतीत तुम्हाला काय वाटते?

समीर गायकवाड

अमेरिकेचा आर्थिक दहशतवाद!

अमेरिकेने इराणवर नवीन निर्बंध लादण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याचा इराणने कडक शब्दांत निषेध केला आहे. या निर्बंधांमुळे आधीच डबघाईला आलेल्या इराणच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा गंभीर परिणाम होणार आहे. इराणने इशारा दिला आहे की, इराणवर असे निर्बंध लादण्याच्या प्रक्रियेत जे देश सामील होतील, त्यांना इराणचे शत्रू समजले जाईल. आजवरच्या इतिहासा मधील सर्वात कडक निर्बंध, असे त्याचे वर्णन अमेरिकेकडून करण्यात आले आहे. निर्बंधांचा परिणाम प्रामुख्याने इराणचा व्यापारातील सर्वात मोठा भागिदार असलेल्या चीनवर होऊ शकेल. इराणकडून समुद्रमार्गे जी एकूण तेल वाहतूक केली जाते, त्यातील ८० टक्के तेल हे एकट्या चीनकडून खरेदी केले जात असल्याने, अमेरिकेच्या इराणवरील निर्बंधांचा परिणाम, चीनवर सर्वात जास्त प्रमाणात होण्याची शक्यता आहे.

अमेरिकेच्या या आर्थिक दहशतवादाला उत्तर देताना इराणने असे म्हटले आहे की अमेरिकेच्या अशा वागण्यामुळे इराणला अण्वस्त्र निर्मिती न करण्याच्या आपल्या भूमिकेवर पुनर्विचार करावा लागेल. इराणने स्पष्ट केले आहे की इराण हा 'न्युक्लिअर नॉनप्रॉलिफरेशन ट्रिटीचा (एनपीटी) आणि इंटरनॅशनल ॲटोमिक एनर्जी एजन्सीचा (आयएइए) सदस्य आहे. इराण, न्युक्लिअर रेग्युलरेशनचे पालन करत आहे. त्यामुळे जगाला प्रश्न पडला आहे की अशा देशावर (इराण) अमेरिका आणि इस्त्रायल का

हल्ला करत आहेत.

इराणचा अणू विषयक कार्यक्रम हा केवळ नागरी उद्दिष्टांसाठी आहे. इराणला युद्ध नको आहे. इराणला युद्ध हवे असते तर इराण, अमेरिके बरोबर वाटाघाटी करता बसला असता का? असा प्रश्न इराणने विचारला आहे. हे जरी खरे असले तरी इराण अमेरिकेसमोर शरणा गती पत्करणार नाही. इराणच्या लष्कर प्रमुखांनी स्पष्ट केले आहे की अमेरिकेन आक्रमणाला आम्ही जशासतसे उत्तर देऊ. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी असा इशारा दिला आहे की जो देश इराणला कोणत्याही प्रकारची लाईफ लाईन पुरवेल, त्याच्यावर अमेरिकेकडून कडक आर्थिक निर्बंध लादले जातील.

अमेरिकेने इराणच्या बंदरांची नाकेबंदी केली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी इराणने बंद केल्यामुळे तेथून वाहतूक करणाऱ्या तेलवाहू जहाजांची मोठ्या प्रमाणात कोंडी झाली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासून, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण प्रस्थापित केले असून, सामुद्रधुनीतून वाहतूक करणाऱ्या जहाजांना इराणची परवानगी घ्यावी लागत आहे तसेच त्यांना ट्रान्झिट फी भरावी लागत आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात युद्ध सुरू होण्यापूर्वी जगाला तेल आणि गॅसचा २० टक्के पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनी मधून वाहतूक करणाऱ्या जहाजांमार्फत होत होता.

अमेरिकेकडून असा दावा करण्यात आला आहे की अमेरिकेच्या लष्कराने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दिवसाला आठ मिलियन बॅरल्स तेल वाहतूक करण्यास मदत केली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध सुरू होण्यापूर्वी होर्मुझ सामुद्रधुनीतुन वीस मिलियन बॅरल्स तेलाची वाहतूक होत होती. अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे इराणची अर्थव्यवस्था पूर्ण पुणे कोलमडली आहे. तसेच इराणच्या नौदलाचे आणि हवाई दलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तरीसुध्दा इराणकडे मोठ्या प्रमाणात मिसाईल्स आणि ड्रोन्सचा साठा असून त्याचा वापर इराणकडून, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाहतूक करणाऱ्या तेलवाहू जहाजांवर आणि आखातातील देशांवर हल्ले करण्यासाठी केला जात आहे. सहा महिन्यांपूर्वी अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर आक्रमण केले तेव्हा, त्यांच्या समोर जी उद्दिष्टे होती, त्या पैकी एकही उद्दिष्ट साध्य झालेले नाही. त्यांना इराणचा अणू विषयक कार्यक्रम नष्ट करता आलेला नाही. त्यांना इराण मधील जुलमी राजवट बदलता आलेली नाही. त्यांना होर्मुझच्या सामुद्रधुनीवर प्रभुत्व मिळवता आलेले नाही. महत्वाचे म्हणजे ज्या निर्धाराने इराण कडून त्यांना प्रत्युत्तर देण्यात आले, ते त्यांना अपेक्षित नव्हते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची तर जगभरात नाचक्की झाली आहे. अमेरिकेच्या सुपर पॉवर इमेजला तडा गेला आहे.

ट्रंप यांची अमेरिकेतील लोकप्रियता झपाट्याने घसरली आहे. ट्रंप यांच्या धरसोड वृत्तीमुळे त्यांची विश्वासार्हता रसातळाला गेली आहे. ट्रंप यांच्या चुकीच्या धोरणांमुळे नोव्हेंबरमध्ये अमेरिकेत होऊ घातलेल्या मध्यावधी निवडणुकांत त्याचा फटका ट्रंप यांच्या पक्षाला बसण्याची दाट शक्यता आहे. इराणवर युद्ध लादणाऱ्या, अमेरिकेच्या पदरात त्यामुळे काहीही पडलेले नाही आणि त्यासाठी डोनाल्ड ट्रंप हेच सर्वस्वी जबाबदार आहेत.

अभय गोखले

बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

‘गावाचा पैसा, गावकऱ्यांसमोर हिशेब द्या!

ग्रामपंचायत सदस्य विशाल चव्हाण यांचे सात दिवसापासून आमरण उपोषण सुरू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २५ : दिग्रस तालुक्यातील साखरा ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता आणावी आणि मागील पाच वर्षांच्या निधीचा पाई-पाईचा हिशेब ग्रामस्थांसमोर मांडावा, या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्य विशाल हिरासिंग चव्हाण यांनी १९ ऑगस्टपासून वसंत चौक, साखरा येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून जनतेला विकासकामांचा आणि निधीच्या वापराचा संपूर्ण हिशेब मिळायलाच हवा, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली आहे.

ग्रामपंचायतीला विविध शासकीय योजनांमधून दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होतो. हा निधी कोणत्या कामासाठी मंजूर झाला, किती खर्च झाला आणि किती निधी शिल्लक आहे, याची माहिती ग्रामस्थांना मिळणे हा त्यांचा अधिकार असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे. मागील पाच वर्षांतील योजना निहाय निधी व खर्चाचा लेखाजोखा ग्रामसभेत सादर करण्याची प्रमुख मागणी आहे. यासोबतच ग्रामपंचायतीचे कॅशबुक, बँक स्टेटमेंट, बिले-वाउचर, मागील पाच वर्षांतील साहित्य खरेदीच्या फाईल्स, विकासकामे करणाऱ्या ठेकेदारांची यादी व ऑडिट रिपोर्ट जनतेसमोर ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. गावातील गटार नाल्यांची कामे, त्यासाठी झालेला खर्च व अपूर्ण कामांची माहितीही ग्रामसभेत मांडावी, अशी मागणी आहे. एलईडी व सौरपथक दिवे, पथदिवे, जिल्हा परिषद शाळेतील साहित्य व रंगरंगोटी तसेच इतर विकासकामांची संपूर्ण माहिती जनतेसमोर आणण्याची मागणी करण्यात आली आहे. गाव नमुना क्रमांक १ ते २२ मधील सर्व अभिलेखही ग्रामस्थांना उपलब्ध करून द्यावेत, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.हक्कासाठी लढा आमचा अन्यायापुढे झुकणार नाही. न्याय मिळेपर्यंत आमची जिद्द थांबणार नाही,” असा निर्धार व्यक्त करत चव्हाण यांनी सात दिवसापासून उपोषण सुरू ठेवले आहे. त्यामुळे साखरा ग्रामपंचायतीच्या कारभाराचा हिशेब आता ग्रामसभेच्या कठड्यावर येणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

कावडशी शाळेची इमारत धोकादायक विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला..!

भाग कोसळूनही प्रशासनाचे दुर्लक्ष २३ विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

वणी, दि. २५ : तालुक्यातील कावडशी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत विद्यार्थ्यांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. इयत्ता पहिली ते पाचवीचे वर्ग ज्या इमारतीत भरतात, त्या वर्गखोलीचा काही भाग नुकताच कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र उर्वरित इमारतही धोकादायक अवस्थेत असल्याने २३ विद्यार्थ्यांचा जीव अक्षरशः टांगणीला लागला आहे.

इमारतीचा काही भाग कोसळल्यानंतरही विद्यार्थ्यांना सुरक्षित पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. धोकादायक वर्गखोल्या तातडीने पाडून नवीन वर्गखोल्यांना मंजुरी द्यावी तसेच तोपर्यंत विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित तात्पुरते शेड उभारावे, अशी मागणी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीने प्रशासनाकडे केली आहे. कावडशी हे कोळसा खाणबाधित क्षेत्रात येत असून, गावाला खनिज विकास निधीतून अपेक्षित भरपाई मिळत नसल्याचीही तक्रार आहे. निधीअभावी विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू राहणार का, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाने दुर्घटनेची वाट न पाहता तातडीने शाळेची पाहणी करून सुरक्षित व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

हातात तलवार घेऊन दहशत पसरविणाऱ्या तरुणाला अटक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. २५ : हातात धारदार तलवार घेऊन रस्त्यावर ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला उमरखेड पोलिसांच्या डी.बी. पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. ही कारवाई २५ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे एक वाजताच्या सुमारास चुरमुरा फाटा ते चुरमुरा रोडवरील अंबोना तलावाजवळ करण्यात आली.

सय्यद शहानुर सय्यद नुर (वय २५, रा. जामा मशीद वॉर्ड, उमरखेड) असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, चुरमुरा फाटा ते चुरमुरा गावाकडे जाणाऱ्या मार्गावर एक इसम हातात धारदार तलवार घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची ठाणेदार पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांना माहिती देण्यात आली. त्यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे व डी.बी. पथकाने पंचांसह घटनास्थळी रवाना होत सापळा रचला. पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ३६ इंच लांब व सुमारे १.५ इंच रुंद, बाशिंगी मुठ असलेली दुधारी धारदार लोखंडी तलवार आढळून आली. पोलिसांनी पंचनामा करून ही तलवार जप्त केली आहे. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते व ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकट गंगलवाड, डी.बी. पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे, पोलीस हवालदार चंदन जाधव, पोलीस कॉन्स्टेबल दिगंबर गिते, संघशील टेंबरे, विष्णू राठोड व चालक पोलीस कॉन्स्टेबल नागनाथ वॉस्टर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

पांढरकवड्यात ‘न समजलेले आई-बाप’चा ऐतिहासिक महासंवाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. २५ : पांढरकवड्यात सोमवारी (दि. २४ ऑगस्ट) ‘न समजलेले आई-बाप’ या समाजप्रबोधनात्मक पालक-विद्यार्थी महासंवादाला १० हजारांहून अधिक पालक, विद्यार्थी व नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. युवा टायगर फोर्सच्या पुढाकाराने माऊली सेलिब्रेशन हॉल येथे आयोजित या कार्यक्रमाने शहराच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात वेगळी छाप पाडली.

सुप्रसिद्ध समाजप्रबोधक प्रा. वसंत हंकारे यांनी पालक-विद्यार्थी नातेसंबंध, संस्कार, शिक्षण, करिअर, सोशल मीडिया, चुकीची संगत आणि आई-वडिलांच्या त्यागावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या हृदयस्पर्शी संवादामुळे अनेक पालक व विद्यार्थ्यांच्या भावना अनावर झाल्या. पालकांनी मुलांवर केवळ अपेक्षांचे ओझे न टाकता मित्रत्वाने संवाद साधावा, तर विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे कष्ट, प्रेम व त्याग समजून घ्यावा, असे आवाहन प्रा. हंकारे यांनी केले. सोशल मीडिया, मोबाईलचा अतिवापर आणि चुकीच्या संगतीपासून विद्यार्थ्यांनी सावध राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला. कार्यक्रमाला पांढरकवडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार लहु तावरे, पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी राजू मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. महासंवादानंतर शिक्षकांसाठी ‘आनंदमय शिक्षक प्रशिक्षण वर्ग’ घेण्यात आला. विद्यार्थ्यांची मानसिकता समजून घेणे, प्रभावी अध्यापन आणि विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधण्याबाबत प्रा. हंकारे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य संयोजक अंकित नैताम यांच्यासह युवा टायगर फोर्सच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. बैठक व्यवस्था, वाहतूक, सुरक्षा व स्वयंसेवकांचे नियोजन करण्यात आले होते. या महासंवादामुळे पालक-विद्यार्थी संवाद, संस्कार आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचला.

जामणीचा ‘आपला दवाखाना’ हलविण्याचा घाट ! नागरिकांचा तीव्र एल्गार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी-जामणी, दि. २५ : झरी-जामणी तालुक्यातील जामणी येथे सुरू असलेला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ‘आपला दवाखाना’ मुकुटबन येथे स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव तातडीने रद्द करावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा जामणी व परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत जामणी येथे सुरू करण्यात आलेल्या ‘आपला दवाखाना’मुळे जामणी सह आजूबाजूच्या अनेक गावांतील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा सहज उपलब्ध होत आहे. दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांसाठी हा दवाखाना मोठा आधार ठरला आहे. मात्र, हा दवाखाना जामणी पासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावरील मुकुटबन येथे हलविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, दवाखाना स्थलांतरित झाल्यास जामणी परिसरातील रुग्ण, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना उपचारासाठी अनावश्यक प्रवास करावा लागेल. त्यामुळे शासनाच्या ‘आरोग्य सेवा गावागावात’ या उद्दिष्टालाच हरताळ फासला जाईल. या निर्णयाविरोधात नागरिकांनी मुकुटबनचे आरोग्य अधिकारी जीवन कुडमेथे, तालुका वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन देऊन दवाखाना जामणी येथेच कायम ठेवण्याची मागणी केली आहे. नागरिकांनी स्पष्ट भूमिका घेत आरोग्य सेवा हिरावून घेणारा निर्णय मान्य नाही. जामणीचा ‘आपला दवाखाना’ जामणीमध्येच कायम राहिला पाहिजे, अशी ठाम मागणी केली आहे.

१७ संवर्गांचा हिशेब द्या, मगच उपोषण मागे!

पेसा-नॉन पेसा भरतीतील बिंदूनामावलीच्या घोळाचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २५ : आदिवासी विद्यार्थी व बेरोजगार युवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेले बेमुदत उपोषण अद्यापही कायम आहे. २३ ऑगस्ट रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात शिष्टमंडळासोबत बैठक झाली. मात्र, बैठकीनंतरही ठोस तोडगा न निघाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. बैठकीदरम्यान आदिवासी क्षेत्रातील १७ संवर्गांची पदभरती तसेच पेसा व नॉन-पेसा शिक्षक भरतीच्या बिंदूनामावली तयार करताना मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. त्यामुळे प्रत्यक्षात किती पदे भरली, किती पदे रिक्त आहेत आणि आदिवासी उमेदवारांसाठी किती जागा उपलब्ध आहेत, याबाबत प्रशासनाने पारदर्शक माहिती जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. “प्रशासनाने १७ संवर्गांचा संपूर्ण आराखडा द्यावा. प्रत्येक संवर्गात किती पदे मंजूर आहेत, किती भरली आहेत आणि किती पदे अद्याप शिल्लक आहेत, याचा स्पष्ट हिशेब मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही,” असा ठाम इशारा आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी दिला आहे. दरम्यान, आमदार राजू तोडसाम यांनीही आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मागण्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. मात्र, केवळ आश्वासनांवर समाधान न मानता प्रत्यक्ष निर्णय व त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. पेसा भरती, शिक्षक भरती, वसतिगृहातील प्रश्न, DBT योजना, TRTIची वयोमर्यादा आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसह विविध मागण्यांवर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आहे.आता आश्वासन नको, आकडेवारीसह लेखी आराखडा हवा अन्यथा उपोषण अधिक तीव्र स्वरूपात छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला असून, जिल्हा परिषद यवतमाळ परिसरातील आंदोलनाकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

गोपाल मृत्यू प्रकरणात नरबळीच्या संशयाने खळबळ

तिघांवर हत्येचा आरोप, पोलिसांच्या भूमिकेवर ही प्रश्नचिन्ह, सीआयडी चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २५ : गावातील रहिवासी गोपाल राजू प्रसाळकर यांच्या संशयास्पद मृत्यूच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी करण्यात आली आहे. गोपाल यांना २८ जुलै रोजी रात्री काही व्यक्ती जंगलात घेऊन गेल्यानंतर ते बेपत्ता झाले. त्यानंतर जंगल परिसरात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने प्रकरण अधिकच गूढ बनले आहे.

दरम्यान, गावकऱ्यांमध्ये हा प्रकार नरबळीशी संबंधित असल्याची चर्चा असल्याचा दावा करण्यात आला आहे. याप्रकरणी शोभा सोनू आत्राम, सरपंच मूळ गव्हाण ग्रामपंचायत तथा अध्यक्ष, आदिवासी संविधान अमल कृती समिती यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ येथील स्थानिक विश्रामगृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी गोपाल यांच्या पत्नी संगीता यांनी सुरुवातीपासूनच संशय व्यक्त केलेल्या लेतू सिताराम टेकाम, राजू फुलाजी आत्राम आणि सुनील चंपत टेकाम या तिघांची चौकशी करून त्यांना तातडीने ताब्यात घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनानुसार, गोपाल यांना २८ जुलै रोजी रात्री संबंधित तिघे जंगलात घेऊन गेले होते. दुसऱ्या दिवशी ते घरी न परतल्याने पत्नीने चौकशी केली असता समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचा आरोप आहे. पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यास विलंब झाला आणि अखेर गोपाल बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली, असा समितीचा आरोप आहे. त्यानंतर संशयित व्यक्तींनी पोलिसांना जंगलात नेले असता अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडल्याचेही निवेदनात नमूद आहे. या संपूर्ण तपासावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत ठाणेदार सरकटे यांचे निलंबन करून चौकशी करावी, तिघांना तातडीने अटक करावी, गोपाल यांच्या मृत्यूची हत्या म्हणून तपासणी करावी तसेच गरज भासल्यास तपास सीआयडीकडे सोपवावा, अशी मागणी करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने मृताच्या गावाला भेट देऊन वस्तुस्थिती जाणून घ्यावी, अशीही मागणी आहे. पत्रकार परिषदेला मुकेश गेडाम, किसन वाघमारे, संदीप कोवे, सुधाकर चांदेकर, दिलीप मलांडे, सुरेश कुंबरे यांच्यासह पीडित कुटुंबीय उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत पुष्टी तपास यंत्रणेकडून होणे बाकी असून, दोष निश्चित करण्यासाठी निष्पक्ष तपास अत्यावश्यक आहे.

थोडक्यात

ईद-ए-मिलादुन्नबीवर १४ जोडप्यांचा इज्तेमाई विवाह!

पुसद : ईद-ए-मिलादुन्नबीच्या पवित्र मुहूर्तावर पुसद येथे नूर बहुउद्देशीय संस्थेच्या पुढाकारातून गरजू व गरीब कुटुंबातील १४ जोडप्यांचा इज्तेमाई विवाह सोहळा साधेपणाने पार पडला. फिजूल खर्च, दिखावा आणि डीजे संस्कृतीला आळा घालत समाजातील गरजू घटकांना आधार देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ. मोहम्मद नदीम होते. उद्घाटन नवनियुक्त अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार साजित खान पठाण यांच्या हस्ते झाले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मानसिंग मोहिते, मौलाना युनूस बुखारी, शहर काझी काझी सदरिद्दीन, अब्दुल जब्बार ठेकेदार, ताहेर इराणी, जावेद भाई ठेकेदार, युनूस मकरानी यांची प्रमुख उपस्थिती होती.

विवाहासाठी जोडपी शोधणे व त्यांना मार्गदर्शन करून सहभागी करून घेण्यासाठी प्रदेश अल्पसंख्याक महासचिव सैय्यद इश्तियाक यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. आदिल मिर्झा व झिया शेख यांनी केले. तहेसीन खान यांनी आभार मानले. सामाजिक कार्यकर्ते व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

राहत सोसायटीची दहावी आमसभा उत्साहात..! आर्थिक शिस्तीचा सभासदांना संदेश

पुसद : राहत को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, पुसदची दहावी वार्षिक आमसभा रविवार, २३ ऑगस्ट रोजी संस्थेच्या फारुकी हॉल येथे उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष काझीम दाद खान होते, तर मायक्रो फायनान्स कमिटी, जमाते इस्लामी हिंद महाराष्ट्रचे सदस्य इद्रीस खान प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संचालक अब्दुल हकीम शेख यांच्या कुरआन पठण व प्रवचनाने झाली. उपाध्यक्ष शेख नईम यांनी प्रास्ताविकातून संस्थेचा वार्षिक अहवाल मांडत वाढते कर्ज, व्याजाचा बोजा आणि आर्थिक ताणाच्या दुष्परिणामांवर भाष्य केले. प्रमुख अतिथी इद्रीस खान यांनी आर्थिक शिस्त, सहकार क्षेत्रातील संस्थांची भूमिका आणि सभासदांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्ष काझीम दाद खान यांनी सभासदांनी अधिकाधिक ठेवी जमा करून संस्थेला आर्थिकदृष्ट्या बळकट करावे तसेच कर्जाचे हप्ते वेळेवर भरावेत, असे आवाहन केले. आमसभेत संस्थेच्या विविध योजना, कामकाज व आगामी वाटचालीचा आढावा घेण्यात आला. संचालक शेख मुख्तार यांनी सूत्रसंचालन केले. संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, फिग्मी एजंट्स व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या तालुका अध्यक्षपदी अंकुश पाटील यांची निवड.

महागाव : २२ ऑगस्ट रोजी तालुका शाखा महागाव च्या शिक्षक

कार्यकारणीची सभा जिल्हा कार्याध्यक्ष मधुकरजी मोरझडे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या महत्त्वपूर्ण सभेत अंकुश पाटील सर यांची (तालुका अध्यक्ष पदी) नितीन व्यवहारे सर यांची तालुका सचिवपदी, सुनील वाघमोडे सर कार्याध्यक्ष पदी, ओमकार तिवडकर सर कोषाध्यक्ष पदी, म्हणून एकमताने निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा देण्यासाठी समितीचे मोठ्या संख्येने सर्व सदस्य उपस्थित होते. नियमक सभेच्या यशस्वीतेसाठी माजी अध्यक्ष संभाजी निंबाळकर सर, मेघराज सूर्यवंशी सर, माजी सचिव, दत्तात्रेय जंगमवाड सर, राहुलजी लंबे सर , शंकरांना नरवाड सर, श्याम भाऊ पांचाळ सर, कपिल तडखेले सर व समस्त कार्यकारणी शाखा महागाव च्या वतीने सहकार्य करण्यात आले. या सभेचे सूत्रसंचालन सुरेश पांचाळ सर यांनी पार पाडले तर आभार प्रदर्शन मेघराजजी सूर्यवंशी यांनी केले.नूतन कार्यकारिणीचे मनःपूर्वक अभिनंदन व भावी वाटचाली करीता शुभेच्छा देण्यात आल्या.

कोटांबा येथे ३३ केव्ही उपकेंद्राला डीपीसीतून हिरवा कंदील

बाभूळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभूळगाव, दि. २५ : तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दीर्घकाळापासूनच्या वीज समस्येवर तोडगा काढण्याच्या दृष्टीने कोटांबा येथे ३३ केव्ही क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारण्यास डीपीसीच्या बैठकीत आवश्यक आदेश व निर्देश देण्यात आले.

आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या पुढाकारामुळे हा निर्णय झाल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या वीज वितरण व्यवस्थेवरील वाढता भार आणि अनियमित पुरवठ्यामुळे कृषीपंपधारक शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नवीन उपकेंद्रामुळे वितरण क्षमता वाढून कृषीपंपांना अधिक स्थिर वीजपुरवठा मिळण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, विरखेडे येथे २२० किलोवॅट क्षमतेचे सबस्टेशन प्रस्तावित असून त्याची टेंडर प्रक्रिया सुरू आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे तालुक्याच्या वीज व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे. निर्णयाबद्दल शेतकरी बांधवांनी मंत्री उईके यांचे आभार मानले आहेत.

ईद-ए-मिलाद: सावळी सदोबा येथे पोलीस पथसंचलन

सावळी सदोबा, दि. २५ : ईद-ए-मिलादुन्नबी सण शांततेत व उत्साहात साजरा व्हावा यासाठी पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली आज सावळी सदोबा येथे पथसंचलन काढण्यात आले. या पथसंचलनात पोलीस वाहनासह पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड जवानांनी सहभाग घेत मुख्य बाजारपेठ, बस स्थानक व संवेदनशील भागातून संचलन केले. नागरिकांनी सण काळात शांतता व सलोखा राखावा व अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन ठाणेदारांनी यावेळी केले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पारवा पोलिसांनी केलेल्या या पथसंचलनाकडे नागरिकाचे लक्ष केंद्रित झाले होते .नागरिकांकडून सर्व स्तरावरून स्वागत होत आहे.

२२ गाळ्यांचा व्यापाऱ्यांना ताबा मिळण्याचा मार्ग मोकळा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि. २५ : संत गाडगे बाबा व्यापारी संकुलातील तब्बल २२ गाळे दीर्घकाळ वापराविना पडून असल्याने व्यापारी आणि युवक उद्योजकांचे नुकसान होत होते. या प्रलंबित प्रश्नावर भाजपने आक्रमक भूमिका घेत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी गिरीश पारेकर यांना निवेदन देत तातडीने कार्यवाहीची मागणी केली.

संकुलाच्या कामासाठी स्थलांतरित करण्यात आलेल्या व्यापाऱ्यांचे पुनर्वसन करून त्यांना गाळे देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, वर्षानुवर्षे प्रश्न रखडल्याने व्यापाऱ्यांमध्ये नाराजी होती. गाळ्यांचा पारदर्शक पद्धतीने योग्य दरात लिलाव करावा आणि पुनर्वसनासाठी पात्र व्यापाऱ्यांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी भाजपने केली. दरम्यान, मुख्याधिकारी पारेकर यांनी गाळे हस्तांतरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होण्याचे संकेत दिले. यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला असून, आवश्यक मंजुरीनंतर व्यापाऱ्यांना गाळे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे राळेगावच्या व्यापारी क्षेत्राला पुन्हा चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अंजनगाव सुर्जी पंचायत समितीतील

घरकुल अभियंत्यावर कारवाईची टांगती तलवार

१ लाख २० हजारांचे अनुदान बांधकाम न करताच अदा केल्याचा ठपका;चौकशी समितीच्या प्राथमिक अहवालात दोषी

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेले घरकुल अभियंता जीवन आठवले यांच्यावर कारवाईची टांगती तलवार कायम आहे. कुंभारगाव येथील एका घरकुल लाभार्थ्याला प्रत्यक्ष घराचे बांधकाम न करताच १ लाख २० हजार रुपयांचे अनुदान अदा केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत गावातील काही जागरूक नागरिकांनी पंचायत समिती प्रशासनाकडे लेखी तक्रार करून अभियंता आठवले यांची चौकशी करण्याची मागणी केली

होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत पंचायत समिती प्रशासनाने चौकशी समिती नेमली होती.या चौकशी समितीमध्ये व्ही. पी. कोकाटे (विस्तार अधिकारी कृषी), डी. एस. भुस्कुट (विस्तार अधिकारी कृषी) आणि रविंद्र सरोदे (कनिष्ठ अभियंता) यांचा समावेश होता. या समितीने केलेल्या प्राथमिक चौकशीत घरकुल अभियंता जीवन आठवले दोषी आढळले असल्याचे समजते. समितीने आपला प्राथमिक चौकशी अहवाल जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पुढील कारवाईसाठी पाठविला आहे. त्यामुळे आता वरिष्ठ स्तरावरून काय कारवाई होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अभियंता जीवन आठवले यांच्याकडे तालुक्यातील ९ गावांमधील घरकुल योजनेची जबाबदारी होती. या ९ गावांमध्येही घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याची चर्चा असून, अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे बांधकाम, अपूर्ण घरांना पूर्ण दाखवून अनुदान लाटल्याचे प्रकार घडल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.यापूर्वीही जीवन आठवले हे घरकुल लाभार्थ्यांकडून काम करण्यासाठी पैसे घेत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे केवळ कुंभारगावच नव्हे, तर त्यांच्याकडे असलेल्या सर्व ९ गावांतील घरकुल योजनेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत अभियंता आठवले यांनी मोठ्या प्रमाणात स्थावर मालमत्ता खरेदी केली आहे. शासकीय पगारातून एवढ्या मोठ्या प्रमाणात मालमत्ता कशी खरेदी केली, याबाबतही चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.शासनाची महत्त्वाकांक्षी असलेली प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल योजना) ही गरीब व गरजू लोकांसाठी आहे. मात्र, शासनातच काम करणारे कर्मचारी अशा प्रकारे भ्रष्टाचार करत असतील तर या योजनेलाच गालबोट लागते. या प्रकरणात कठोर कारवाई झाल्यास शासकीय योजनांमध्ये काम करणाऱ्या भ्रष्ट प्रवृत्तीला आळा बसेल.दरम्यान, जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ कार्यालयाकडून या अहवालावर काय निर्णय घेतला जातो आणि अभियंता आठवले यांच्यावर निलंबन किंवा बडतर्फी सारखी कारवाई होते का, याकडे अंजनगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दर्यापूरकरांचा आवाज मंत्रालयात पोहोचविण्यासाठी

ओम राणे यांची सायकल यात्रा

दर्यापूर/वार्ताहर

तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते ओम राणे लवकरच सायकल यात्रेचे आयोजन करणार आहेत. या यात्रेच्या माध्यमातून ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांच्या मूलभूत समस्यांचा आवाज मंत्रालयाच्या दारी पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद व शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दर्यापूरचे सामान्य नागरिक ओम राणे यांनी पुढाकार घेतला आहे. दर्यापूर ते मुंबई मंत्रालय सायकल यात्रा काढून तालुक्यातील सरकारी शाळांच्या समस्या थेट शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. दर्यापूर तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद व सरकारी शाळांमध्ये इमारतींची दुरावस्था,अपुऱ्या वर्गखोल्या, स्वच्छतागृहांचा अभाव, पिण्याच्या पाण्याची समस्या,वीज,पंखे,लाईटची कमतरता, संरक्षण भिंतीचा अभाव तसेच शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था अशा विविध समस्या असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर 'एका गावाचा नव्हे!, तर संपूर्ण दर्यापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न' म्हणून हा विषय शासनापर्यंत नेण्याचा संकल्प ओम राणे यांनी केला आहे.

दरम्यान, तालुक्यात वाढत असलेल्या अपघातांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणीही या सायकल यात्रेद्वारे करण्यात येणार आहे. अपघातग्रस्तांना वेळेत व दर्जेदार उपचार मिळण्यासाठी रुग्णालयाची क्षमता वाढविणे गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. शहरातील प्रमुख ठिकाणी डिव्हायडरवर स्ट्रीट लाईट नसणे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, तसेच शहरातील विविध प्रलंबित नागरी प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार आहेत.तालुक्यातील ग्रामीण भागातील ज्या शाळांना मूलभूत सुविधांचा अभाव आहे किंवा विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना ज्या रस्त्यांमुळे अडचणींचा सामना करावा लागतो, अशा समस्यांची माहिती नागरिकांनी पाठवावी, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते ओम राणे यांनी केले आहे.समस्येसोबत गावाचे नाव, शाळेचे नाव, समस्येचे स्वरूप तसेच शक्य असल्यास फोटो किंवा व्हिडिओ पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सदर माहिती व्हाट्सअप : मो.९५०३५०७४१२वर पाठवावी.

कॅटिंगवरील चहा महागला;आता मोजावे लागणार १५ रुपये

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

साखरेच्या दरात झालेल्या भरमसाट वाढीमुळे अंजनगाव सुर्जी शहरातील चहा कॅटिंग व्यावसायिकांनी आजपासून चहाच्या दरात वाढ केली आहे. शहरातील प्रसिद्ध असलेल्या शाम चहा कॅटिंगचे संचालक शाम बर्वे यांनी १० रुपये असलेला चहा थेट १५ रुपये केला आहे.

साखर ६० रुपये किलोवरून वाढली असून चहा पत्तीच्या दरातही किलो मागे मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे १० रुपयांत चहा विकणे परवडत नसल्याने नाईलाजाने ही दरवाढ करावी लागत असल्याचे चहा विक्रेते शाम बर्वे यांनी सांगितले.शाम बर्वे यांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या तीन-चार महिन्यांत चहा व्यवसायासाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तूच्या दरात सातत्याने वाढ होत आहे.साखर तीन महिन्यांपूर्वी ४५ रुपये किलो होती, ती आता ८० रुपये किलो झाली आहे. चहा पत्ती २८० रुपये किलोवरून ४०० रुपये किलो झाली आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडर १५०० रुपयांवरून थेट २९०० रुपयांवर गेला आहे. दूध ५० रुपये लिटर असलेले दूध आता ७० रुपये लिटर झाले असून २० रुपयांची वाढ झाली आहे. वेलची ४६०० रुपये किलोवरून ५६०० रुपये किलो झाली आहे. आले (अद्रक) ४० रुपये किलोवरून थेट २८० रुपये किलो झाले आहे. त्यामुळे आम्हाला दरवाढ करणे गरजेचे होते. आमची इच्छा दरवाढ करण्याची अजिबात नाही. मात्र सतत होणाऱ्या दरवाढीमुळे व्यवसाय करणे अशक्य झाले आहे. १० रुपयांत चहा देणे आता तोट्याचे होत आहे. त्यामुळे १५ रुपये दर करावा लागला, असे शाम बर्वे म्हणाले.दरवाढीमुळे चहा पिणाऱ्यांना चांगलीच झळ बसत आहे. अनेकांना दिवसभर कामातील थकवा घालवण्यासाठी दिवसातून ३ ते ४ वेळा चहा लागतो. मात्र आता दर वाढल्यामुळे अनेकांवर दिवसातून दोन वेळाच चहा पिण्याची वेळ आली आहे, अशी प्रतिक्रिया चहाप्रेमींनी दिली आहे.तर दुसरीकडे अचानक केलेल्या ५ रुपयांच्या वाढीमुळे ग्राहक संख्या कमी होऊन व्यवसायावर परिणाम होण्याची भीतीही विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

आझाद हिंद मंडळाच्या ९९ व्या वर्षानिमित्त विशेष रील स्पर्धा

अमरावती/का.प्र.

बुधवारा येथील आझाद हिंद मंडळाच्या ९९ व्या वर्षानिमित्त तसेच 'गणेश उत्सव २०२६'च्या पर्वावर मंडळाच्या वतीने विशेष रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. बाप्पाच्या आगमनानिमित्त आणि मंडळाच्या स्थापना दिवसाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेतून परिसरातील तरुणांच्या कलागुणांना व सृजनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी ११,०००, द्वितीय क्रमांकासाठी ५,०००, तर तृतीय क्रमांकासाठी ३,००० असे बक्षिसांचे स्वरूप आहे.स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ९९ रु. असून, स्पर्धेचे आयोजन १४ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात येणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी १० सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.तरुणांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कलागुणांना व कल्पकतेला वाव द्यावा, असे आवाहन आझाद हिंद मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी खालील Google Form लिंकवर जाऊन आपली नोंदणी करावी.

विजेचा लपंडावमुळे नागरिक त्रस्त

अचलपूर- शहरात अनियमित वीजपुरवठ्यामुळे घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू,फ्रीज, टीव्ही खराब होण्याचा धोका आहे.या समस्येबाबत नागरिकांनी अनेकवेळा महावितरणच्या कार्यालयात तक्रार केली मात्र त्याची दखल घेण्यात आलेली नाही.एकीकडे शहरातील वीज पुरवठा संदर्भात नागरिकांना तक्रारी करण्यासाठी विदर्भ मील परिसरातील पॉवर स्टेशन येथील महावितरण चे केंद्र क्रमांक १ कार्यालयात जावे लागते.यामुळे हे कार्यालय अचलपूर शहरात स्थापित करण्याची मागणी आजही प्रलंबित आहे.या कार्यालयात अभियंता पद रिक्त असल्याने याचा पदभार कोणाकडे दिला आहे? याची माहिती सुद्धा नागरिकांना नाही.यामुळे या कार्यालयात अभियंता पद रिक्त असल्याने तत्काळ ते पद भरण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.दुसरीकडे महावितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर ची सक्ती होत आहे.

बदलत्या शैक्षणिक परिस्थितीनुसार प्राध्यापकांनीही बदलावे-प्रा.लवांडे

नुटा बुलेटिनचा सुवर्णमहोत्सव उत्साहात, हजारो प्राध्यापकांची उपस्थिती

अमरावती/का.प्र.

वाढोरोनानांतर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची वाढलेली अनुपस्थिती चिंताजनक असून पारंपरिक घोकमपट्टीऐवजी अध्यापनात आधुनिक बदल स्वीकारण्याची गरज आहे. परीक्षा पद्धतीतील शिथिलता आणि विना-अनुदानित संस्थांचा वाढता प्रभाव यांमुळे शिक्षण क्षेत्रासमोर मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. या बदलत्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व प्राध्यापक वर्ग व संघटनांनी संघटित राहून प्रामाणिक आत्मपरीक्षण करावे, असे आवाहन प्रा.एस.पी.लवांडे यांनी केले.

नागपूर विद्यापीठ टिचर्स असोसिएशन(नुटा)च्या नुटा बुलेटिनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात नुटाच्या पाच दशकांच्या संघर्षमय आणि वैचारिक वाटचालीचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष प्रा. एस. पी. लवांडे होते. प्रमुख वक्ते अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे माजी महासचिव प्रा. अशोक बर्मन, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा, एमफुक्टोचे सरचिटणीस डॉ.

आर. के. चव्हाण, नुटाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण रघुवंशी व सरचिटणीस डॉ. नितीन कोंगरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगेबाबा व प्रा. बी. टी. देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाला भावनिक स्वरूप प्राप्त झाले. नुटा बुलेटिनचा जन्म आणीबाणीच्या काळातील संघर्षातून झाला असून १९७६ मध्ये हस्तलिखित स्वरूपात त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्या काळातील सेन्सॉरशिप, संघटनेचे संघर्ष आणि प्राध्यापकांच्या हक्कांसाठी झालेल्या आंदोलनांची माहिती यावेळी देण्यात आली. नुटा बुलेटिनने केवळ संघटनेचे मुखपत्र म्हणून नव्हे, तर प्राध्यापकांपर्यंत माहिती पोहोचविणारे, त्यांच्या हक्कांविषयी जागृती निर्माण करणारे आणि न्यायालयीन लढ्यांमध्ये महत्त्वपूर्ण दस्तऐवज म्हणून काम केले असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. १९७६ ते २०२५ या कालावधीत बुलेटिनच्या अंकांची हजारो पाने प्रकाशित झाल्याची माहिती देण्यात आली. नुटाच्या संकेतस्थळालाही मोठा प्रतिसाद मिळाला असून लाखो वाचकांनी त्याचा उपयोग केल्याचे नमूद करण्यात आले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी नुटा बुलेटिनने विदर्भातील प्राध्यापकांमध्ये संवाद, जागृती आणि संघटन मजबूत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे सांगितले. यावेळी सातवा वेतन आयोग, ७१ दिवसांचा थकीत वेतनाचा लढा, शिक्षकांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीचा प्रश्न तसेच स्टॅच्युट ५३ च्या माध्यमातून शिक्षकांना मिळालेले संरक्षण यांसाठी प्रा. बी. टी. देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या संघर्षाचे स्मरण उपस्थितांना करवून दिले. या कार्यक्रमात नुटा बुलेटिनच्या सुवर्णमहोत्सवी विशेषांकाचे, तसेच प्रा. बी. टी. देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रकाशित 'संघर्ष यात्रेतील दीपस्तंभ' या विशेषांकाचे विमोचन करण्यात आले. डॉ. किशोर फुले यांनी लिहिलेल्या प्रा.बि.टी.देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वावर लिहिलेल्या लेखांचे 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती' या पुस्तकाचेही प्रकाशन झाले. नुटा बुलेटिनच्या दीर्घ प्रवासात योगदान देणाऱ्या नानासाहेब बोके, अविनाश देशमुख व सूरज डिके यांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

एमफुक्टोचे सरचिटणीस डॉ. आर. के. चव्हाण यांनी नव्या पिढीने नुटा बुलेटिनचे अंक वाचून शिक्षकांच्या हक्कांसाठी झालेला संघर्ष समजून घ्यावा, असे सांगितले. वेतन वितरण व्यवस्था, स्टॅच्युट ५३, वैद्यकीय प्रतिपूर्ती, जुनी पेन्शन योजना आदी प्रश्नांसाठी झालेल्या संघर्षाचा बुलेटिन हा महत्त्वपूर्ण दस्तऐवज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाकडून माहिती मिळविण्यासाठी विधिमंडळातील प्रश्न, दप्तर दिरंगाईविरोधी कायदा आणि माहितीच्या अधिकाराचा प्रभावी वापर करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा यांनी नुटा बुलेटिन हे केवळ माहिती देणारे माध्यम नसून माहितीचे ज्ञानात रूपांतर करणारे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना प्रा. अशोक बर्मन यांनी शिक्षक चळवळीचा इतिहास, संघटित संघर्ष आणि प्रा. बी. टी. देशमुख यांच्या नेतृत्वाचे स्मरण करताना नव्या पिढीने या संघर्षाचा इतिहास जाणून घेण्याचे आवाहन केले. पुढील काळातही नुटा बुलेटिनचा प्रवास अखंड सुरू ठेवण्यासाठी एक व्यक्ती नव्हे, तर समूहाने नेतृत्व करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या समारोपाकडे जाताना शिक्षकांनी संघटित राहण्याचा संकल्प करावा, नव्या पिढीला संघटनेचा इतिहास समजावून सांगावा आणि बदलत्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना शिक्षणाशी जोडण्यासाठी अध्यापनाच्या पद्धतीतही बदल करावा, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाची भुमिका स्पष्ट करताना नुटाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण रघुवंशी यांनी बुलेटिनच्या पाच दशकांच्या प्रवासाचा आढावा घेताना बी. टी. देशमुख यांनी निर्माण केलेला वैचारिक वारसा पुढे नेण्याची जबाबदारी नव्या पिढीवर असल्याचे सांगितले. बुलेटिनला अधिक सक्षम करण्यासाठी शिक्षकांमधून संशोधक, लेखक आणि साहित्यिक निर्माण होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बी. टी. देशमुख यांच्या विचारांचा आणि लेखणीचा प्रभाव नुटा बुलेटिनच्या पुढील वाटचालीतही कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला विदर्भ तसेच राज्यभरातून हजारोंच्या संख्येने प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी तसेच पदवीधर उपस्थित होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. के.जी.देशमुख सभागृहात भरगच्च उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी सभागृहाबाहेर देखील हा कार्यक्रम ऑनलाईन बघण्याची व्यवस्था करण्यात आली होती.संचालन डॉ. रविंद्र मुंद्रे तर आभार प्रदर्शन डॉ. नितीन कोंगरे यांनी केले. तसेच डॉ. श्रुती इंगोले, डॉ. वैशाली देशमुख, डॉ.राखी बनकर, डॉ.सोनल मुंदडा, डॉ. अपर्णा सरोदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

संक्षिप्त

श्रावण मासानिमित्त थिलोरीत महाकावड यात्रा

खल्लार-श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही थिलोरी ग्रामस्थांच्या वतीने भव्य महाकावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हर हर महादेवच्या जयघोषात आणि भक्तीमय वातावरणात ही यात्रा ऋणमोचन ते थिलोरी पर्यंत पायी काढण्यात आली.या महाकावड यात्रेपूर्वी भगवान महादेवाच्या पिंडीचे विधिवत पूजन करून यात्रेला प्रारंभ करण्यात आला. यात्रेमध्ये थिलोरी गावातील सर्व जाती-धर्मातील तरुण बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक एकतेचा संदेश दिला.यात्रेदरम्यान आमला येथे बाळासाहेब वानखडे मित्रपरिवाराच्या वतीने सर्व कावड भक्तांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. तसेच कळमगव्हाण येथे सरपंच निलिमा राजू वानखडे यांच्या वतीने कावडीची पूजा करून सर्व भक्तांसाठी अल्पोपहार व चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.याशिवाय हेमंत होले, मुन्ना होले, विष्णू राणे आणि गोपाल सुरपाटणे यांनीही कावड यात्रेतील भक्तांसाठी फळवाटप करून सेवाभाव जपला. कावड यात्रेसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच कावड यात्रेसाठी टी-शर्ट उपलब्ध करून देणारे अंकुश वाकपांजर, युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर, युवक काँग्रेस नेते नितेश वानखडे आणि डॉ. अविनाश ठाकरे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि सायकल वाटप

अंजनगाव सुर्जी-अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेने आता शाळा सुधारणेचा विडा उचलला आहे. नगराध्यक्ष अविनाश गायगोले, मुख्याधिकारी विजय लोहकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नगरपरिषद शाळा प्रगतीपथावर

नेण्याचा आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा निर्धार केला आहे.या उपक्रमांतर्गत सर्वात प्रथम नगरपरिषदेने रिक्त असलेल्या शिक्षकांची पदे भरण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. पात्र आणि अनुभवी शिक्षकांची नियुक्ती केल्यामुळे विद्यार्थ्यांना आता उच्च प्रतीचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू लागले आहे. याचा थेट सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर आणि निकालावर दिसून येत असल्याचे चित्र आहे.नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच एक स्तुत्य आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. नगरपरिषद शाळेतील अत्यंत गरजू आणि हुशार अशा १० विद्यार्थ्यांना एका खाजगी कंपनीच्या सहकार्याने प्रत्येकी २५०० रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. तर लांबून पायी शाळेत येणाऱ्या ८ गरजू विद्यार्थ्यांना शहरातील अनेक दानशूर व्यक्तीकडून सायकलचे वाटप करण्यात आले.शिष्यवृत्ती आणि सायकल मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

'हर घर तिरंगा' रॅलीतून देशभक्तीचा जागर

अमरावती -स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत उत्साहपूर्ण जनजागृती रॅली काढण्यात आली. हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर घोषणांनी परिसर दणाणून सोडत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.प्राचार्य डॉ. आर. एस. दाळू यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. रॅलीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष खराते व प्रा. पुष्पजा सौदागर आणि सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पराग आकर्ते यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. या रॅलीला महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभिनव उपक्रमाकरिता मंडाळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, प्रा. रवींद्र खांडेकर, प्रा. प्रणव चेंडके यांचेसह सर्व पदाधिकाऱ्यांनी श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

डॉ.शोण देशमुख व डॉ.कौस्तुभ पाटील

अंजनगाव सुर्जी-मराठा सेवा संघ अंजनगाव सुर्जी तालुका

अध्यक्षपदी डॉ. शोण देशमुख यांची निवड झाली असून डॉ.कौस्तुभ पाटील यांची सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.अमरावती येथे झालेल्या मराठा सेवा संघाच्या बैठकीत या दोघांची निवड झाली असून त्यांना मराठा सेवा संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि.नवनाथ घाडगे, मुंबई यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.डॉ.शोण देशमुख व्यवसायाने डॉक्टर असून सामाजिक क्षेत्रात त्यांचा चांगला नावलौकिक आहे.त्यांच्या समाजशील कार्याची दखल घेऊन त्यांना तालुकाध्यक्षपदी नियुक्ती देण्यात आली.या प्रसंगी मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अरविंद गावंडे, प्रदेश कोषाध्यक्ष अशोक पटोकार,जिजाऊ ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष सीमा बोके, जिजाऊ अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष अश्विन चौधरी,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र आडे, म.से.स.सचिव संजय ठाकरे, मनोहर कडू,चंद्रकांत मोहिते,प्रफुल्ल गुडधे,प्रकाश राऊत,प्रमोद तलवारे,गजानन टाले, मनीष पाटील,प्रेमकुमार बोके,डॉ.विशाल देशमुख,डॉ.संजय साबळे,डॉ.अमोल ब्राह्मणकर, हेमंत टाले,गणेश गहुकर आणि जिल्ह्यातील मराठा सेवा संघ व जिजाऊ ब्रिगेडचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.डॉ. शोण देशमुख व डॉ.कौस्तुभ पाटील यांच्या निवडीबद्दल तालुक्यात सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

आपली व्यवस्था मृत्यूनंतर जागी होते?

दुर्घटना होते.मग चौकशीचे आदेश.मग अधिकारी येतात.मग बैठका होतात.मग आश्वासने दिली जातात.दोषी शोधण्याची भाषा होते.आणि काही दिवसांनी दुसरी बातमी येते.पण त्या आईसाठी बातमी संपत नाही.तिच्या घरातील पाळणा शांत होतो. तिच्या हातात बाळ नसते. तिच्या अंगणात बाळाचे पाऊल पडत नाही. तिच्या कानाला 'आई' म्हणणारा आवाज कधीच ऐकू येत नाही.व्यवस्थेची फाईल बंद होऊ शकते; पण आईचे दुःख कधीच बंद होत नाही.म्हणूनच जर चौकशीत निष्काळजीपणा, गंभीर सुरक्षा त्रुटी, कर्तव्यातील कसूर किंवा व्यवस्थापनाची हलगर्जीपणा सिद्ध झाला, तर त्याकडे केवळ 'दुर्दैवी घटना' म्हणून पाहून चालणार नाही. जबाबदारी निश्चित झाली पाहिजे आणि दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण एखाद्या निष्पाप जीवाचा मृत्यू हा फक्त आकडा नाही. तो व्यवस्थेच्या अपयशाचा परिणाम असेल, तर त्या अपयशाचा हिशेब घेतलाच पाहिजे.रुग्णालय प्रशासनाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे.ज्या जीवांची स्वतःचा बचाव करण्याची ताकद नव्हती, त्यांच्यासाठी आपण शेवटपर्यंत जागे होतो का?

सरकारी रुग्णालय म्हणजे गरीब माणसाचा शेवटचा आधार. ज्याच्याकडे खासगी रुग्णालयाची लाखो रुपयांची फी भरण्याची क्षमता नाही, तो सरकारी दवाखान्यावर विश्वास ठेवतो. तो विश्वास स्वस्त नाही. तो गरीबाचा असला म्हणून त्याची किंमत कमी होत नाही.मग डिजिटल सुशासनाच्या गप्पा मारण्यापूर्वी एक साधा प्रश्न सरकारने स्वतःला विचारावा..सरकारी दवाखान्यातील नवजात बाळ सुरक्षित आहे का?मोठमोठे डिजिटल प्रकल्प, ऑनलाइन सेवा, ॲप्स,उद्घाटने आणि जाहिराती यांना विकासाचे प्रमाणपत्र समजणे सोपे आहे.पण खरा सुशासनाचा कस तिथे लागतो, जिथे एखादी गरीब आई आपले बाळ सरकारी रुग्णालयाच्या हवाली करते आणि मनात म्हणते..'इथे माझं बाळ सुरक्षित आहे.'

✍ ॲड. धनंजय देशमुख

हा विश्वास जर आपण जपू शकत नसू,तर डिजिटल सुशासनाच्या घोषणा कशासाठी?

गप्पा नकोत..सरकारी दवाखाने सुसज्ज करून दाखवा.प्रत्येक च्ष्ळ सुरक्षित करा. प्रत्येक घ्ळ ची अग्निसुरक्षा तपासा. प्रत्येक कर्मचाऱ्याला आपत्कालीन प्रशिक्षण द्या. विद्युत यंत्रणेचे स्वतंत्र ऑडिट करा. अग्निशमन यंत्रणा कागदावर नव्हे, प्रत्यक्ष कार्यरत ठेवा.आणि सर्वात महत्त्वाचे जबाबदारी फक्त खालच्या कर्मचाऱ्यावर ढकलून थांबू नका; व्यवस्थापनाच्या निर्णयांचीही चौकशी झाली पाहिजे.कारण फक्त एखादा कर्मचारी दोषी आहे म्हणून संपूर्ण व्यवस्था निर्दोष ठरत नाही.जिथे सुरक्षा व्यवस्था अस्तित्वात असणे आवश्यक होते, तिथे ती का नव्हती? जिथे प्रशिक्षण आवश्यक होते, तिथे प्रशिक्षण का नव्हते? जिथे उपकरणे असणे आवश्यक होते,ती कार्यरत का नव्हती? जिथे सतर्कता आवश्यक होती, तिथे निष्काळजीपणा का झाला?

या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर हवे.आणि उत्तर नसेल, तर जबाबदार व्यक्तींवर कारवाई हवी. कारण पुढची आग लागल्यानंतर पुन्हा 'चौकशीचे आदेश' वाचत बसणे म्हणजे आजच्या मृत्यूतून काहीही न शिकणे होय.त्या ३६ चिमुकल्या श्वासांनी आपल्याला एक प्रश्न विचारला आहे..'आम्ही वाचलो असतो, जर तुम्ही आधी जागे असताष्ठ आता तरी जागे होणार आहात का?'या प्रश्नाचे उत्तर भाषणात नको. पत्रकार परिषदेत नको.आश्वासनांच्या कागदावर नको. ते सरकारी रुग्णालयांच्या सुरक्षित भिंतींमध्ये दिसले पाहिजे. ते तपासणीच्या अहवालात दिसले पाहिजे.ते जबाबदारी निश्चित करण्यात दिसले पाहिजे. ते दोषींवर झालेल्या कठोर कारवाईत दिसले पाहिजे.

आणि सर्वात महत्त्वाचे..पुन्हा कोणत्याही आईला आपल्या बाळासाठी अश्रूंमध्ये शोधाशोध करावी लागू नये, यात दिसले पाहिजे.कारण नवजात बालकाचा जीव हा व्यवस्थेतील एक आकडा नाही. तो फाईलमधील एक क्रमांक नाही. तो सरकारी अहवालातील एक ओळ नाही. तो कुणाच्या आयुष्याचा संपूर्ण अर्थ असतो.आग कदाचित विझली असेल. धूर कदाचित विरळ झाला असेल. रुग्णालय पुन्हा सुरू झाले असेल. फाईली कदाचित फिरू लागल्या असतील.पण त्या आईच्या डोळ्यांतला धूर? तो कधीच विझणार नाही.आणि म्हणूनच आज प्रश्न त्या आईचा आहे, त्या चिमुकल्यांचा आहे आणि प्रत्येक गरीब पालकाचा आहे..'डिजिटल सुशासनाच्या गप्पा नंतर करा आधी सरकारी दवाखाने माणसाच्या जीवासाठी सुरक्षित कधी करणार?'

मो.९२८४३८२१०२

निष्पाप जीवांचे मृत्यू..आणि व्यवस्थेला जागे करणारे प्रश्न

अमरावतीमध्ये घडलेली अत्यंत दुर्दैवी आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना मनाला अस्वस्थ करून गेली. ज्या चिमुकल्या जीवांच्या आयुष्याची साधी सुरुवातही झालेली नव्हती, ज्या डोळ्यांनी अजून या जगाचे रंगही पाहिले नव्हते, त्या निष्पाप जीवांचा आगीत होरपळून झालेला करुण अंत हा केवळ एक अपघात नाही; तो आपल्या संवेदनशीलतेला आणि आपल्या व्यवस्थेला अंतर्मुख करणारा प्रश्न आहे. ही घटना दुर्दैवाने घडली असेल किंवा व्यवस्थेच्या निष्काळजीपणामुळे घडली असेल, यावर आपण अनेक मत प्रवाह मांडू शकतो.दोष कोणाचा, चूक कुठे झाली, जबाबदार कोण..या प्रश्नांची उत्तरे तपासातून निश्चित होतील.

संबंधितांवर कारवाईही होईल. मात्र, ज्यांचे जीव गेले आहेत,त्यांना आपण पुन्हा परत आणू शकत नाही. त्यांच्या कुटुंबीयांच्या डोळ्यांतील अश्रू आपण पुसू शकतो; पण त्यांच्या आयुष्यात निर्माण झालेली पोकळी कधीच भरून काढू शकणार नाही. अशाच प्रकारे गेल्या काही दिवसांत गडचिरोली जिल्ह्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थिनींचा सर्पदंशामुळे झालेला दुर्दैवी मृत्यूही महाराष्ट्राच्या मनाला चटका लावून गेला.

एकीकडे चिमुकले जीव आगीच्या दुर्घटनेत जातात, तर दुसरीकडे विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण आणि आवश्यक सुविधा मिळत नसल्याने जीव गमवावा लागतो. प्रश्न असा पडतो की, निष्पाप जीवांना अशा पद्धतीने आपले जीवन गमवावे लागत असेल, तर आपण नेमके कोणाला दोषी ठरवणार?मृत्यू झाल्यानंतर मदत करण्यापेक्षा मृत्यू होऊ नये यासाठी व्यवस्था उभी करणे आज अधिक महत्त्वाचे नाही का..?

आज आपण 'विकसित भारत २०४७'चे स्वप्न पाहत आहोत.पण मनात एक प्रश्न सतत निर्माण होतो... की खरंच होईल का हो आपला भारत विकसित.....?

आज अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येथे येतात. जिल्हा स्त्री रुग्णालयाची परिस्थितीही वेगळी नाही. रुग्णांची संख्या मोठी आणि उपलब्ध सुविधा मर्यादित..अशा परिस्थितीत आरोग्यसेवेवर प्रचंड ताण निर्माण होतो. कधी कधी उपलब्ध खाटांपेक्षा रुग्णांची संख्या अधिक असल्याने एकाच खाटेवर दोन रुग्णांवर उपचार करण्याची वेळ येते, ही वस्तुस्थिती आपल्या आरोग्यव्यवस्थेसाठी नक्कीच आत्मपरीक्षणाची बाब आहे.पण केवळ 'व्यवस्था जबाबदार आहे' असे म्हणून आपण हात झटकून मोकळे होऊ शकत नाही.म्हणूनच आज एक वेगळा विचार करण्याची आपल्याला गरज आहे.अमरावतीत वैद्यकीय सेवेसाठी आपण एखादी लोकचळवळ उभी करू शकतो का?लोकसेवेतून आणि लोक वर्गणीतून गरजू नागरिकांना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणारे एखादे प्रभावी व्यासपीठ उभे करता येईल का?यासाठी समाजातील राजकीय लोकप्रतिनिधी, डॉक्टर, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक संस्था, उद्योजक, दानशूर व्यक्ती आणि सामान्य नागरिक यांना एकत्र आणता येईल का? या प्रश्नांची उत्तरे आपण शोधली पाहिजेत.अमरावतीला अधिक सुरक्षित, अधिक संवेदनशील आणि अधिक सक्षम आरोग्यव्यवस्था देण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊया.दुर्घटनेनंतर जागे होणारा समाज आपल्याला नको, तर दुर्घटना घडूच नये यासाठी सज्ज असलेला समाज हवा आहे.भावपूर्ण श्रद्धांजली..

✍ श्रीकृष्ण पखाले

अमरावती
मो.९४२०४०५६०७

मनुस्मृती...

मनुस्मृती हे पुस्तक नाही. विचार आहे. मनुस्मृती घरात नसते, डोक्यात असते. पिरीआडिक लेबर फ़ोर्स च्या आकडेवारी नुसार शहरी भारतातील रोजगारक्षम वयातील १०० स्त्रियापैकी ७१ स्त्रिया कोणत्याही आर्थिक मोबदला मिळवून देणाऱ्या कामाशी जोडलेल्या नाहीत. त्या फक्त घर सांभाळतात. पुरुषामध्ये हे प्रमाण नगण्य आहे. ह्या स्त्रिया शिकलेल्या, घराबाहेर च्या जगात ताकतीने वावरायला सक्षम असलेल्या स्त्रिया आहेत. पण त्या घरात चूल-मुल सांभाळत आहेत.घराबाहेर पडलेल्या स्त्रियांना सुद्धा घरात तेवढीच कामे करावी लागतात.ह्यात स्त्रिया किती शिकलेल्या आहेत, कोणत्या सामाजिक आर्थिक स्थरातून येतात ह्याचा संबंध नाही. कोल्हापुरी चपला बनविणाऱ्या गरीब चर्मकार घरातील अशिक्षित स्त्रिया पुरुषांच्या जोडीने श्रम करतात. त्यांची कलाकुसर थोडी जास्तच असते. पण अजून त्यांना कोणी स्वतंत्र कारागीर म्हणून ओळख देत नाही, त्यांच्या श्रमाचे स्वतंत्र मूल्य मिळणे दूरच. काल कोल्हापूरात कोल्हापुरी चपलांच्या कारागिरांची स्पर्धा होती. काही महिला कारागीर आल्या होत्या, पण लेडीज़ चप्पल ची स्वतंत्र केटेगरी नव्हती. ज्या चपला ना पारितोषिक मिळाले त्या सगळ्या पुरुष कारागीराच्या नावाच्या जेंट्स चपला होत्या, पण ज्या कारणासाठी त्यांना बक्षीस मिळाले त्यात त्यांच्या घरच्या महिलांचे श्रम आणि कौशल्य किती आहे हे मला माहीत आहे. चर्मकार घरात मनुस्मृती नसली तरी डोक्यात असतेच.

✍ नीरज हातेकर

हीच बाब उच्चशिक्षित, तथाकथित कर्तृत्ववान स्त्रियांच्या बाबतीत सुद्धा खरी आहे. इंद्रा नुयी पेप्सिको च्या जागतिक अध्यक्ष झाल्या. घरी आईने सांगितले ' तू अध्यक्ष वगैरे घरच्या बाहेर..घरात भांडी आहेत पडलेली धुवायला घे..'अजूनही कोणतीही स्त्री एखाद्या क्षेत्रात यशस्वी झाली की तिच्या चारित्र्यावर बोलणे सुरू होते. विशेषतः ती राजकारणात असेल तर. कोणत्याही धर्माच्या मूलतत्व वाद्याना पहिल्यांदा स्त्रियाच दिसतात नियम लावायला.

बलात्काऱ्यांची शिक्षा कमी केली ह्याचे स्वागत करणारा माणूस ह्या देशाचा शिक्षण मंत्री होऊ शकतो. कितीही विज्ञान वादी असले तरी सुद्धा शत्रूच्या स्त्रियांवर बलात्कार करण्याचे समर्थन करणारे सावरकर कित्येकांचे आइकॉन आहेत.

बलात्कारी बाबा राम रहीम इतका प्रभावशाली आहे की सरकार त्याला निवडणुकीच्या वेळी मोकळे सोडून मते मिळविण्या साठी बिनधास्त वापरून घेते.त्यामुळे आता आमच्या घरात मनुस्मृती नाही, मुली आता शिकतात, आधुनिक पेहराव करतात म्हणजे मनुस्मृती नाही वगैरे भंकस बंद करा.

'आता कोणी जातीभेद करत नाही, आता स्त्रियांना सामना वागणूक मिळते' वगैरे सांगत फिरणारे मनुस्मृतीचे वाहक आहेत.तुमच्या डोक्यात मनुस्मृती, किंवा तुम्ही ज्या धर्माचे आहात त्याचा धर्मग्रंथ, अजून भक्कम आहे हे लक्षात घ्या.

तुमच्या शरीराचे ऐका...

आरोग्य रक्षण

'डॉक्टर, माझे सर्व रिपोर्ट नॉर्मल आहेत..मग मला सतत थकवा का येतो?'रिपोर्ट सामान्य असूनही आरोग्य चांगले वाटत नसेल, तर त्यामागची कारणे समजून घेऊया.

काही दिवसांपूर्वी माझ्या दवाखान्यात एक तरुण महिला आली. वय साधारण ३२ वर्षे. चेहऱ्यावर थकवा स्पष्ट दिसत होता.बसताक्षणी ती म्हणाली,'डॉक्टर, माझ्या सगळ्या तपासण्या नॉर्मल आहेत.तरी मला दिवसभर थकवा येतो.सकाळी उठल्यावरही ताजेतवाने वाटत नाही. कामात लक्ष लागत नाही. नेमके माझे चुकते कुठे?'हा प्रश्न केवळ तिचाच नाही.

आज असंख्य लोक हा प्रश्न विचारतात.रक्त तपासण्या सामान्य असतात.साखर नियंत्र णात असते. हिमोग्लोबिन ठीक असते. तरी शरीर पूर्वीसारखे साथ देत नाही.असे का होते?'नॉर्मल' म्हणजे नेहमीच 'पूर्णपणे निरोगी' असा अर्थ नसतो.सर्वप्रथम एक गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे.

रक्त तपासण्या अत्यंत महत्त्वाच्या असतात. त्या अनेक गंभीर आजारांचे निदान करण्यासाठी आणि उपचारांचे नियोजन करण्यासाठी आवश्यक असतात.परंतु कोणतीही तपासणी ही संपूर्ण व्यक्तीची जागा घेऊ शकत नाही.रिपोर्ट हा आरोग्याचा एक भाग आहे.पूर्ण चित्र नाही.

जर एखाद्या व्यक्तीला सतत थकवा, झोपेच्या समस्या, ताण, पचनाचे त्रास किंवा अशक्तपणा जाणवत असेल, तर डॉक्टर त्याचा वैद्यकीय इतिहास, जीवनशैली, औषधे, आहार, झोप, मानसिक आरोग्य आणि आवश्यक असल्यास पुढील तपासण्या यांचाही विचार करतात.

थकवा म्हणजे नेमकें काय?

दिवसभर काम केल्यानंतर थकवा येणे स्वाभाविक आहे.पण.. सकाळी उठल्यावरच थकवा जाणवणे, दिवसभर ऊर्जा नसणे, कामात लक्ष न लागणे, सतत झोप येणे, अगदी लहान कामानंतरही दमल्यासारखे वाटणे, ही लक्षणे वारंवार जाणवत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.

थकव्यामागील कारणे

थकवा हा स्वतः एक आजार नसून अनेक कारणांचे लक्षण असू शकतो.अपुरी किंवा खंडित झोप, सततचा मानसिक ताण, शारीरिक हालचालींचा अभाव, असंतुलित आहार, पुरेसे प्रथिने किंवा इतर आवश्यक पोषक घटक न मिळणे, काही औषधांचे दुष्परिणाम, नैराश्य किंवा चिंतेसारख्या मानसिक आरोग्याच्या समस्या, थायरॉईड, रक्ताल्पता, मधुमेह किंवा इतर वैद्यकीय कारणे.म्हणूनच प्रत्येक व्यक्तीचे मूल्यमापन वेगळे असते.

झोप ही शरीराची 'रिपेअर सिस्टीम' आहे.आज अनेक जण ५-६ तास झोपूनही स्वतःला 'ठीक' समजतात.परंतु प्रौढ व्यक्तींना साधारणतः ७ ते ९ तास गुणवत्तापूर्ण झोप आवश्यक असल्याचे अनेक वैज्ञानिक अभ्यास सुचवतात.झोप अपुरी राहिल्यास लक्ष कमी लागणे, चिडचिड, भूक वाढणे, निर्णयक्षमता कमी होणे आणि दिवसभर थकवा जाणवू शकतो.

ताण शरीरावरही परिणाम करतो

ताण हा केवळ मनाचा विषय नाही.दीर्घकाळ चालणारा ताण झोप, भूक, व्यायामाची सवय, एकाग्रता आणि जीवनमानावर परिणाम करू शकतो.म्हणूनच आरोग्याचा विचार करताना मानसिक आरोग्यालाही तितकेच महत्त्व द्यावे लागते.

आपल्या दैनंदिन सवयींचा विचार करा

मी रोज किती वेळ चालतो? माझी झोप नियमित आहे का? मी प्रत्येक जेवणात पुरेसे प्रथिने घेतो का?मी दिवसभर पुरेसे पाणी पितो का?मी दिवसभर फक्त स्क्रीनसमोर बसतो का?मला स्वतःसाठी शांत वेळ मिळतो का?कधी कधी याच प्रश्नांमध्ये पुढचा मार्ग सापडतो.?

डॉक्टरकडे कधी जावे?

जर थकवा काही आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकत असेल, वजनात अनपेक्षित बदल होत असतील, ताप, श्वास लागणे, छातीत दुखणे, तीव्र अशक्तपणा किंवा इतर गंभीर लक्षणे असतील, तर स्वतः अंदाज न लावता डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.काही वेळा पुढील तपासण्या किंवा तज्ज्ञांचा सल्ला आवश्यक असू शकतो.

आरोग्य हे केवळ रिपोर्टमध्ये दिसणाऱ्या आकड्यांचे नाव नाही.ते आपल्या ऊर्जेचे, झोपेचे, हालचालींचे, मनःस्थितीचे, काम करण्याच्या क्षमतेचे आणि जीवन जगण्याच्या आनंदाचेही नाव आहे.म्हणूनच प्रत्येक तपासणीचा आदर करा.पण आपल्या शरीराच्या संकेतांकडेही तितकेच लक्ष द्या.रिपोर्ट महत्त्वाचे आहेत. पण तुमची कहाणीही तितकीच महत्त्वाची आहे. शरीराचे ऐका.गरज वाटल्यास योग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

डॉ. ऋतुजा देशमुख
MBBS ~ MD (Pathology)
M.Sc. (Food& Nutrition)
Functional Medicine
Practitioner ~ Nutrigenetics
Expert
मो.८२३७१९१६६२

नागद्वार यात्रा :जिथे पाऊलवाट संपते ,तिथे श्रद्धेची वाट ...

'नागद्वारला जाणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण!' लहानपणी मोठ्यांकडून ऐकलेले हे शब्द आजही आठवतात. मध्यप्रदेशातील सातपुड्याच्या घनदाट जंगलात, उंचच उंच पर्वतरांगांच्या कुशीत आणि खोल दऱ्यांच्या सान्निध्यात वसलेल्या नागद्वारची यात्रा म्हणजे धाडसी माणसांचेच काम, अशीच त्यावेळी धारणा होती.निरोपाच्या वेळी डोळ्यांत पाणी आणि मनात काळजी असायची.पण यंदा या खडतर यात्रेचा अनुभव स्वतः घेण्याची संधी मिळाली आणि जाणवले.नागद्वारची वाट नक्कीच कठीण आहे; मात्र या वाटेवर श्रद्धा असेल तर प्रत्येक पाऊल आनंद देत जाते.

नागद्वार हे केवळ तीर्थक्षेत्र नाही,तर श्रद्धा, साहस, निसर्ग आणि माणुसकी यांचा अनोखा संगम आहे.नागद्वारच्या वाटेवर मात्र अनोळखी यात्रेकरूही आपला वाटतो. कोणी चढताना अडखळले तर हात पुढे होतो, उतरताना पाय घसरला तर आधार मिळतो.सगळेच एकमेकांचे 'भगत-भगतीन' बनून या खडतर वाटेवर सोबत चालत राहतात.

१५ ऑगस्टला मारुती मंदिरात दर्शन घेऊन आम्ही प्रवासाला सुरुवात केली.आम्ही सात जण नागपूरहून ट्रॅव्हल्सने निघालो.मटकुली येथे ट्रॅव्हल्स थांबली. तेथून सौसर पार करताच घाटाचा प्रवास सुरू झाला. वळणावळणाचे रस्ते, डोंगरांच्या कुशीतून जाणारा प्रवास आणि खिडकीबाहेर दिसणारा हिरवाईने नटलेला निसर्ग मनाला वेगळाच आनंद देत होता. पंचमढी जवळ येताच सातपुड्याचे सौंदर्य अधिक खुलत गेले.

समुद्रसपाटीपासून सुमारे ११०० मीटर उंचीवर असलेले पंचमढी म्हणजे निसर्गाने मुक्तहस्ताने उधळलेले सौंदर्य! हिरव्यागार पर्वतरांगा, चांदीसारखे चमकणारे झरे, उंच कड्यांवरून फवाऱ्यासारखे कोसळणारे धबधबे आणि क्षणाक्षणाला बदलणारे पावसाळी वातावरण... पाऊस कधी सुरू झाला आणि कधी थांबला, हेही कळत नव्हते.पण पंचमढी मागे पडली आणि नागद्वारची खरी परीक्षा सुरू झाली. येथे फुलझाडे नाहीत, बागा नाहीत, घरे नाहीत. ओबडधोबड पायवाटा, दगडधोंडे आणि त्यांच्या शेजारी खोल दऱ्या! काही ठिकाणी तर वाट अवघी दीड-दोन फूट रुंद. एका चुकीच्या पावलाने खाली किती खोल जाऊ, याची कल्पनाही करवत नाही. तरीही श्रद्धेच्या बळावर हजारो यात्रेकरू याच वाटेने पुढे जात असतात. दुसऱ्या दिवशी आम्ही पंचमढीतून नागद्वारच्या दिशेने निघालो. सुमारे सहा किलोमीटरवर असलेल्या धूपगडाच्या प्रथमद्वाराशी पोहोचलो. सातपुड्यातील सर्वोच्च शिखर असलेल्या धूपगडाची उंची सुमारे ४४३० फूट आहे. तेथे दर्शन घेतल्यानंतर पायदळ यात्रेला सुरुवात झाली.काजळी, श्रावणबाळ मंदिर, गणेशद्वार, नागद्वार, पद्मशेषगुफा, पश्चिमद्वार, अग्निद्वार, स्वर्णद्वार, निमपहाडी, आमकी पहाडी, चिंतामणी, गंगावन शेष, चित्रशाला माता, दत्तगिरी, दादाजी धुनीवाले बाबा, नंदीगड, नागिणी, पद्मिनी, राजगिरी, गुलालशेष, चंदनशेष, हळदीशेष... अशी अनेक ठिकाणे पार करत सुमारे २० किलोमीटरची पायपीट करायची होती.मध्ये-मध्ये पावसाच्या सरी कोसळत होत्या. सोबत आणलेले सामान भिजले. वाटेत 'भजेगिरी' येथे गरमागरम मक्याचे भज्यांचा आस्वाद घेतला आणि पुन्हा पायवाट धरली.

काजळी येथे पोहोचल्यानंतर श्रावणबाळ मंदिराचे दर्शन घेतल्यावर श्रावण बाळाच्या छोट्याशा आश्रमात मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सहा वाजताच पुन्हा मार्गस्थ झालो. जंगलातील पायवाट सुरू झाली. एक डोंगर चढायचा, दुसरा उतरायचा आणि पुन्हा तिसरा चढायचा... सपाट रस्ता नावालाही नव्हता.मात्र या खडतर वाटेवर सतत जाणवत होती..माणुसकी!वाटेत ठिकठिकाणी अन्नदानाचे भंडारे होते.जंगलाच्या मध्यभागी सुरू असलेली ही अन्नसेवा पाहताना जाणवले की, श्रद्धा केवळ देवळात नसते; ती माणसाच्या सेवेतही असते.

नागपंचमीच्या दिवशी सकाळी आठच्या सुमारास अखेर नागद्वारचे दर्शन झाले. दोन उंच पहाडांच्या मधोमध असलेल्या अरुंद कपारीत पद्मशेष बाबांची छोटीशी मूर्ती आहे. तेथे गाणी, आरती आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने वातावरण भारावून गेले होते.एका बाजूला तुळशी वृंदावन आणि दुसऱ्या बाजूला आकाशाला भिडणारे उंच पर्वतत्या क्षणी निसर्ग आणि अध्यात्म जणू एकरूप झाले होते.पद्मशेषद्वार येथे अन्नदानाचा अनेक ठिकाणी भंडारा घेऊन आम्ही पश्चिमद्वारच्या दिशेने निघालो.काही ठिकाणी आधारासाठी लोखंडी साखळ्यांची व्यवस्था होती. दगडधोंड्यांतून वाट काढताना एका बाजूला डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी..प्रत्येक पाऊल जपून टाकावे लागत होते.

✍ मयुरी बारी

नागद्वार स्वामींचे दर्शन घेतले आणि पुन्हा काजळीच्या दिशेने निघालो.मनात निशाणगड चढण्याची उत्सुकता निर्माण झाली.चढण सरळ आणि काही ठिकाणी धोकादायक कड्यांवरून जाणारी होती. तरीही मी आणि माझा भाऊ 'हर हर महादेव'चा जयघोष करत गड चढायला सुरुवात केली. प्रत्येक पावलागणिक दम लागत होता, पण उत्साह कमी होत नव्हता. अखेर गडमाथ्यावर पोहोचलो बाण, त्रिशूळ, महादेवाची पिंड आणि अगदी जवळून सरकणारे ढग जणू आकाशच हाताच्या अंतरावर आले होते!रात्री दहाच्या सुमारास जीपने जंगलातील वाटेने पंचमढीकडे निघालो. रस्त्यावर राई, आवळा, आंब्याचे झाडें आणि आमच्या जीपसीला नीलगाई आडव्या झाले व जंगल पार करत रात्री अकराच्या सुमारास पंचमढीत पोहोचलो.दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता चौरागडच्या दिशेने निघालो. समुद्रसपाटीपासून सुमारे ४३१५ फूट उंचीवर असलेल्या चौरागडावर जाण्यासाठी सुमारे बाराशे पायऱ्या चढाव्या लागतात. प्रत्येक पायरीसोबत देव आठवत होता. शरीर थकले होते; पण मनात दर्शनाची ओढ होती.शिवमंदिर दिसले आणि थकलेल्या चेहऱ्यावर आपोआप हास्य फुलले.वाटेत काकडी आणि मक्याच्या भाकरीची दुकाने होती. येथे अनेक भाविक नवस फेडण्यासाठी खांद्यावर त्रिशूळ घेऊन येथे येतात.

चौरेश्वराचे दर्शन घेतल्यानंतर आम्ही पंचमढीत परतलो. त्यानंतर जटाशंकर आणि गुप्त महादेवाचे दर्शन घेतले.तीन दिवसांच्या सततच्या पायपिटीने शरीर अक्षरशः थकून गेले होते. त्यामुळे पंचमढीतील अनेक सुंदर स्थळे पाहता आली नाहीत. पंचमढीत सुमारे ४८ प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यापैकी अनेक ठिकाणे अजूनही माझ्या पाहण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या प्रवासाचा शेवट करताना मनात एकच विचार आहे— 'पंचमढी, पुन्हा नक्की यायचे!'

नागद्वारची यात्रा पूर्ण करून परतीच्या वाटेवर असताना जाणवले की, हा केवळ डोंगर-दऱ्या पार करण्याचा प्रवास नव्हता. ही होती श्रद्धेची परीक्षा, शरीराच्या क्षमतेची कसोटी, निसर्गाची अनुभूती आणि माणुसकीचा प्रत्यक्ष साक्षात्कार आहे.

अमरावती
मो.७०६६२२७२८७

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोटमध्ये 'बाईक चोर' टोळीचा पर्दाफाश ; दोन जण जेरबंद

८ मोटारसायकलींसह इंजिन, चेसीस व स्पेअर पार्ट असा ६.०५ लाखांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहर आणि परिसरातून मोटारसायकली गायब होण्याच्या घटनांचा छडा लावत अकोट शहर पोलिसांनी वाहनचोरीच्या रॅकेटवर मोठी कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत दोन संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून ८ चोरीच्या मोटारसायकली, दोन इंजिन, एक चेसीस आणि विविध स्पेअर पार्ट असा तब्बल ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अकोट शहरातील नंदीपेठ परिसरातील रहिवासी शिवराज मोहन हाडोळे यांनी त्यांची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल घरासमोर उभी केली होती. १६ ऑगस्टच्या पहाटे घराबाहेर पाहिले असता मोटारसायकल गायब असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अकोट शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६८४/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

मोटारसायकल चोरीचा तपास सुरू असतानाच पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीने तपासाला दिशा मिळाली. पोलिसांनी गजानन प्रभुदास रायबोले (२३) आणि अब्दुल जावेद अब्दुल जमील जमादार (३०),

दोघेही रा. इंदिरानगर, येवदा, ता. दर्यापूर, जि. अमरावती यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी अकोट शहर व परिसरात मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

यानंतर पोलिसांनी आरोपींच्या घरांची झडती घेतली. या झडतीत चोरीच्या मोटारसायकलींचा अक्षरशः साठाच आढळून आला. शाईन, स्प्लेंडर प्लस आणि पॅशन प्लस अशा विविध मोटारसायकली पोलिसांनी जप्त केल्या. याशिवाय दोन मोटारसायकल इंजिन, एक चेसीस आणि विविध स्पेअर पार्टही पोलिसांच्या हाती लागले. जप्त मुद्देमालामध्ये आठ मोटारसायकलींची किंमत सुमारे ५ लाख १५ हजार रुपये, दोन इंजिन ७० हजार रुपये, चेसीस १० हजार रुपये आणि स्पेअर पार्ट १० हजार रुपये असा एकूण ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, जप्त करण्यात आलेल्या वाहनांपैकी काही वाहने अकोट शहर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ६८४/२०२६ आणि ७१५/२०२६ मधील असल्याचे तपासात समोर आले आहे. उर्वरित वाहनांच्या मालकीबाबत आणि त्यांच्या चोरीच्या घटनांबाबत संबंधित पोलिस ठाण्यांकडून तपास सुरू आहे. त्यामुळे या दोघांच्या माध्यमातून वाहनचोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

चोरीच्या बाईकचे सुटे भागही विक्रीसाठी?

दोन इंजिन, चेसीस आणि मोठ्या प्रमाणात स्पेअर पार्ट सापडल्याने चोरीच्या वाहनांची विल्हेवाट नेमकी कशी लावली जात होती, याचा तपासही आता महत्त्वाचा ठरणार आहे. चोरीच्या मोटारसायकलींचे भाग वेगळे करून त्यांची विक्री केली जात होती का, याचा शोध पोलिस घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. गुन्हे शोध पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, पोहेकॉ नरेंद्र जाधव, रामेश्वर भगत, कपिल राठोड, नितेश सोळंके आणि सुबोध खंडारे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

बनावट लग्न करून चार लाखांची फसवणूक उरळ पोलिसांकडून दोघांना अटक

■ प्रतिनिधी | अकोला ■

बनावट लग्नाचे आमिष दाखवून एका व्यक्तीकडून तब्बल चार लाख रुपये उकळून फसवणूक केल्याप्रकरणी उरळ पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे बनावट विवाहाच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचे धागेदोरे उलगडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याप्रकरणी अखानी, पोस्ट खेड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर येथील भाउसाहेब मच्छिंद्र बनसोडे (३५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून उरळ पोलिस ठाण्यात १५ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३(५) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तारफेल, जि. अकोला येथील शिल्पा मिलिंद अहिर (३०) हिने फिर्यादीसोबत बनावट लग्न केले. त्यानंतर शिल्पा अहिर व तिच्या

साथीदारांनी संगनमत करून फिर्यादीकडून चार लाख रुपये घेतले आणि त्यांची फसवणूक केली, असा आरोप आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच पोलिसांनी महिला आरोपी शिल्पा अहिर हिला अटक केली. त्यानंतर तिचा साथीदार विनायक किसनराव गवई (५६), रा. खांबोरा, ता. जि. अकोला यालाही २२ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींकडून फसवणुकीच्या या प्रकारामागील इतर बाबींचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक अचिंत चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली उरळचे ठाणेदार सहायक पोलिस निरीक्षक जनार्धन खंडेराव, पोलिस उपनिरीक्षक परमेश्वर केंद्रे, सफौ राजू जोंधरकर, पोलिस हवालदार विजय चव्हाण, रघुनाथ नेमाडे, पोलिस कॉन्स्टेबल विकास राठोड, उमेश वाकोडे, महिला पोलिस कॉन्स्टेबल रुक्मिण घोडके व पल्लवी काळे यांच्या पथकाने केली.

जि. प. उर्दू शाळेच्या स्वयंपाकगृहासमोरच कचऱ्याचे साम्राज्य

खेट्रीतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील स्वयंपाकगृह आणि वर्गखोल्यांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वयंपाकगृहासमोरच घाण-कचरा साचल्याने दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले असून, याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या शाळेतील स्वयंपाकगृहात विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार तयार केला जातो. त्यानंतर विद्यार्थ्यांना याच परिसरात पोषण आहाराचे वाटप केले जाते. मात्र, स्वयंपाकगृह आणि वर्गखोल्यांच्या परिसरातच कचरा व घाण साचलेली असल्याने विद्यार्थ्यांना अस्वच्छ वातावरणातच वावरावे लागत आहे. त्यामुळे पोषण आहाराची स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून ही परिस्थिती कायम असून, स्थानिक प्रशासनाला याबाबत वारंवार माहिती देण्यात आली. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे. शाळेच्या परिसरात स्वच्छता राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असतानाही विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

'अन्यथा विद्यार्थ्यांसह ठिय्या आंदोलन'

'गेल्या काही महिन्यांपासून जि. प. उर्दू शाळेतील स्वयंपाकगृह आणि वर्गखोल्यांसमोर अस्वच्छता पसरली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत स्थानिक प्रशासनाला वारंवार माहिती देऊनही दखल घेतली जात नाही. प्रशासनाने तातडीने परिसराची स्वच्छता करून कचऱ्याची विल्हेवाट लावावी; अन्यथा विद्यार्थ्यांसह त्याच ठिकाणी ठिय्या आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा ग्रामपंचायत सदस्य शेख साजीद यांनी दिला आहे.

पत्रकारांना सभेच्या प्रवेशबंदीविरोधात काँग्रेसचे धरणे

भाजपने लोकशाहीची हत्या केली : निखीलेश दिवेकर

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेशबंदी केल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्या वतीने मनपाच्या समोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. पत्रकारांना सभागृहात प्रत्यक्ष उपस्थित राहून वृत्तसंकलन करण्याचा अधिकार असताना सत्ताधाऱ्यांकडून जागेअभावी प्रवेशबंदीचे कारण पुढे केले जात असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी उपमहापौर तथा आंदोलनाचे आयोजक निखीलेश दिवेकर यांनी केला.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय घेतले जातात. त्यामुळे सभेतील कामकाज जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी

प्रसारमाध्यमांची उपस्थिती महत्त्वाची आहे. मात्र, भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी जागेअभावी पत्रकारांना सभागृहात प्रवेश नाकारल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

'जागेचा प्रश्न असेल तर मनपाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृह किंवा आकाशवाणीसमोरील जिल्हा परिषदेचा नवीन सभागृह भाड्याने घेऊन सभा घेता येऊ शकते. मात्र, सत्ताधाऱ्यांना आपल्या कारभाराचे सत्य जनतेसमोर येऊ द्यायचे नसल्याने पत्रकारांना सभेपासून दूर ठेवले जात आहे,' असा आरोप निखीलेश दिवेकर यांनी केला. पत्रकारांना सभेच्या प्रवेशबंदीविरोधात काँग्रेसचे धरणे

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, सभेतील निर्णय व चर्चेची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे हे माध्यमांचे कर्तव्य आहे. पत्रकारांनाच सभेपासून दूर ठेवणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेवरच आघात असल्याची टीका काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली. पत्रकारांना प्रवेशबंदीचा निर्णय मागे घेऊन सभेच्या कामकाजात माध्यमांना पूर्वीप्रमाणे प्रवेश द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. धरणे आंदोलनादरम्यान काँग्रेसच्या विविध पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करत सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर टीका केली. यावेळी विरोधी पक्षनेते झिशान हुसेन, नगरसेवक आजाद खान, नगरसेविका निलोफर खान, प्रशांत गावंडे, माजी जिल्हाध्यक्ष अशोक अमाणकर, प्रदेश पदाधिकारी अक्षय राऊत, मनीष मिश्रा, यशोदा गायकवाड, विजय तिवारी, तश्वर पटेल, सुगत भटकर, आक्रोश सायखेडे, अतुल अमाणकर, सत्यप्रकाश घाटोळे, सोहेल खान, सुरेश ढाकोळकर, दत्ता आमले, जनार्दन बुटे, अस्लम शहा, अनिस सौदागर, महादेव मेहेंगे आदी उपस्थित होते.

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी

अकोला : राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळांतील प्रवेशित विद्यार्थ्यांमधील ॲनिमिया (रक्तक्षय) ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विभागामार्फत सध्या राज्यभरात 'ॲनिमिया निवारण कार्यक्रम' युद्धपातळीवर राबविण्यात येत असून, या मोहिमेअंतर्गत राज्यात अवघ्या दीड महिन्यात २०४ शाळांमधील ७९,६२४ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण करण्यात आली.

झरंडीच्या विकासाला सरपंच प्रीती जाधव यांच्या नेतृत्वाची गती

रस्ते, पाणी, शिक्षणासह सुरक्षा व सौंदर्यीकरणाच्या कामांना प्राधान्य

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर तालुक्यातील डोंगराळ भागातील झरंडी गावाच्या विकासाला गेल्या दोन वर्षांत चांगलीच गती मिळाली आहे. सरपंच प्रीती समाधान जाधव यांच्या पुढाकारातून २०२४ ते २०२६ या कालावधीत गावातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, सुरक्षा आणि सौंदर्यीकरणाच्या विविध कामांना प्राधान्य देण्यात आले आहे.

जुन्या झरंडी भागातील सिमेंट रस्त्यासाठी सुमारे सहा लाख रुपये खर्च करण्यात आले. रोजगार हमी योजनेतून सुमारे १५ लाख रुपयांची विविध विकासकामे करण्यात आली असून, जिल्हा परिषद शाळेच्या संरक्षण भिंतीसाठी सात लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शाळेच्या परिसरातही सुधारणा झाली आहे. गावातील पाणीपुरवठ्याची समस्या दूर करण्यासाठी जलशुद्धीकरण प्रकल्पाची दुरुस्ती करून तो पुन्हा कार्यान्वित करण्यात आला. तसेच पाणीपुरवठ्याची पाइपलाइन दुरुस्त करण्यात आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. गावाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही ग्रामपंचायतीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सुमारे चार लाख रुपये खर्चून गावातील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे गावातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत झाली आहे.

'झरंडी गावाचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास आहे. ग्रामस्थांचा विश्वास आणि सहकार्य हीच माझी ताकद आहे. भविष्यातही गाव अधिक सुंदर, स्वच्छ, सुरक्षित आणि सक्षम करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करत राहणार आहे.'

प्रीती समाधान जाधव,
सरपंच, झरंडी

दरम्यान, स्वच्छता व सौंदर्यीकरणासाठीही विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. गावातील विविध भागांत स्वखर्चातून तसेच लोकवर्गणीतून स्वच्छता आणि सौंदर्यीकरणाची कामे करण्यात आली. ग्रामस्थांच्या गरजा लक्षात घेऊन रखडलेली विकासकामे मार्गी लावण्यावर भर देण्यात येत असून, उपलब्ध शासकीय निधीसोबतच गरजेनुसार स्वखर्चातून योगदान देण्याची भूमिका सरपंच प्रीती जाधव यांनी घेतली आहे.

ग्रामस्थांचा सहभाग ठरतोय महत्त्वाचा

गावाच्या विकासासाठी केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता ग्रामस्थांचा सहभाग आणि लोकवर्गणीच्या माध्यमातूनही कामे पुढे नेण्यात येत असल्याने झरंडीच्या विकासाला नवी दिशा मिळत असल्याचे चित्र आहे. रस्ते, पाणी, शिक्षण आणि सुरक्षेबरोबरच स्वच्छ व सुंदर गावाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या प्रयत्नांचे ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त होत आहे.

अकोला महानगरपालिका, अकोला
सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला

निविदा सुचना क्र. ०७, (०८-२०२६)

आयुक्त, महानगरपालिका, अकोला, सार्वजनिक बांधकाम व्दारे महानगरपालिका क्षेत्रात, आमदार निधी अंतर्गत एका कामाकरीता ई निविदा मागविण्यात येत आहे.

करीता विस्तृत माहितीसाठी खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी

Portal https://mahatenders.gov.In

(अजय गुजर)
कार्यकारी अभियंता
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/४०९/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला दिनांक : २५/०८/२०२६

अकोला महानगरपालिका, अकोला
पाणी पुरवठा विभाग

निविदा सुचना क्र. १२, २०२६-२७

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि. २५/०८/२६ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(संपर्क- ७७०९०४९३५१)

संकेतस्थळ: amcakola.in

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/२०५/२०२६, पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला दिनांक : २५/०८/२०२६

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १३९२/२०२६ प्रोसेस नं.१०७४८/२०२६
चौ.ता. ०१/१०/२०२६ दिनांक : २१/०८/२०२६

अर्जदार : १. रजनी विठ्ठल म्हैसने २. अनिल विठ्ठलराव म्हैसने ३. सुनिल विठ्ठल म्हैसने ४. प्रविण विठ्ठल म्हैसने सर्व रा. मु. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : विठ्ठल सदाशिव म्हैसने
पत्ता :- रा. मु. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विठ्ठल सदाशिव म्हैसने यांचे दि. २५/०२/२०२६ रोजी केअर हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४१०/२०२६ प्रोसेस नं.१०६७०/२०२६
चौ.ता. १२/१०/२०२६ दिनांक : १९/०८/२०२६

अर्जदार : १. मंदा विश्वनाथ तायडे २. अक्षय विश्वनाथ तायडे ३. लिलाबाई मारोती तायडे रा. वाशिंबा, ता. जि. अकोला. ४. वृशाली सतिष देउळकर रा. जैन मंदिर जवळ, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला. ५. वैशाली सचिन आवटे रा. पातूर, ता. पातूर, जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : विश्वनाथ मारोती तायडे
पत्ता :- रा. वाशिंबा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विश्वनाथ मारोती तायडे यांचे दि. १३/०३/२०२६ रोजी वाशिंबा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १३८६/२०२६ प्रोसेस नं.१०३५४/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ दिनांक : ११/०८/२०२६

अर्जदार : १. श्रीमती. स्मिता अनंत पांडे २. अथर्व अनंत पांडे दोघेही रा. शिवचरण पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : अनंत मुरलीधर पांडे
पत्ता :- रा. शिवचरण मंदीर जवळ, क्षीरसागर यांचे घर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अनंत मुरलीधर पांडे यांचे दि. १४/०५/२०२६ रोजी श्री लक्ष्मी हॉस्पिटल खराडी पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

या जाहिर नोटीस व्दारे सर्वत्र लोकांना कळवीण्यात व सुचीत करण्यात येते की आमचे पक्षकार बुलडाणा अर्बन को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा यांनी विठ्ठल पुरुषोत्तम सरप रा अकोला यांचे सोबत खालील वर्णनाचा फ्लॅट विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे-

मिळकतचे वर्णन - मौजे उमरी प्रगणे अकोला ता जि अकोला कसबे अकोला महानगर पालीका अकोलाच्या हद्दीतील किर्ती नगर येथील शेत सर्व्हे ३३/१ मधील वि. एस. डी. ओ. साहेब अकोला यांच्या फाईल वरील रे. के. नं. एन.ए. पी-३४/ उमरी प्रजणे अकोला / ६ / १९८४-८५ नि. ता १२/०३/१९८५ नुसार पास झालेल्या ले-आऊट नकाश्यातील लेआऊट फ्लॅट क्र ५ नझुल शिट नं. ८१ व नझुल प्लॉट नं. ९ / ३२ / ५-५ आहे व ज्याचे प्लॉट क्षेत्रफळ २४४.३८ चौ मीटर असुन त्यावर बांधलेल्या राज्वी टेरेस अपार्टमेंट मधील पाचव्या मळ्यावरील फ्लॅट नं ५ ज्याचे कारपेट बांधकाम क्षेत्रफळ ८३.५९ चौ मीटर असुन जमिनीतील अविभाजीत १५ टक्के हिस्सासह असून ज्याची चर्तुसिमा पुर्वेस - प्लॉट नं. ०६ पश्चिमेस प्लॉट नं. ०४ उत्तरेस बाजेरीया ले-आऊट व दक्षिणेस ९ मीटर रोड येणे प्रमाणे वर्णन आहे.

वरील फ्लॅटबाबत बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था किंवा इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा कसलाही हक्क, संबंध, बोजा, गहाण, दान, वारसहक्क, ताबा किंवा अन्य अधिकार इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी कागदपत्रे व पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क साधावा व आपला लेखी आक्षेप नोंदवावा अन्यथा माझे वरील पक्षकार वरील फ्लॅटचे खरेदी करून घेतील व त्यांनतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा कसलाही उजर तथा हक्क चालणार नाही याची नोंद घ्यावी करीता ही जाहिर नोटीस.

अकोला
दि. २५/०८/२०२६

(पक्षकाराकरीता वकील)
ॲड. विजय भांबेरे
Office – S-28, Second Floor, Shakambari Square (S-2)
Durga Chowk, Akola Tq and Dist Akola
Mobile No 9657356020

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४२६/२०२६ प्रोसेस नं.१०८१८/२०२६
चौ.ता. ०७/१०२०२६ दिनांक : २४/०८/२०२६

अर्जदार : १. जाईबाई राजकुमार मोरे रा. न्यू अशोक वाटिका नगर जवळ, बियानी मंडळ शिवनी, ता. जि. अकोला. मो. क्र. ९७६४६०१५७२ २. शितल राजकुमार मोरे (लग्नाआधीचे नाव) शितल सतिश राउत (लग्नानंतरचे नाव) रा. न्यु अशोक वाटिका, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. वैशाली राजकुमार मोरे (लग्नाआधीचे नाव) वैशाली संजय मुरळ (लग्नानंतरचे नाव) रा. न्यू अशोक वाटिका, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला. ४. मिनाक्षी राजकुमार मोरे (लग्नाआधीचे नाव) मिनाक्षी श्रीकृष्ण मोहाडे (लग्नानंतरचे नाव) रा. रमाबाई आंबेडकर नगर, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : मयत सतिश राजकुमार मोरे यांचे वारस १. संघमित्रा सतिश मोरे रा. रमाबाई आंबेडकर नगर, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ८६९८५१३०५७२. आयुष सतिश मोरे रा. न्यू अशोक वाटिका, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. समिक्षा सतिश मोरे रा. गैरअर्जदार के. २ व ३ तर्फे अ. पा. क. गैरअर्जदार क्र. १ आई रमाबाई आंबेडकर नगर, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला.
मयताचा पत्ता :- मयत : राजकुमार भगवान मोरे
पत्ता :- रा. न्यू अशोक वाटिका नगर जवळ, बियानी मंडळ समोर, शिवनी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजकुमार भगवान मोरे यांचे दि. ०१/ ०२/ २०२६ रोजी न्यु अशोक वाटिका, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

बांधकाम कामगारांच्या योजनांना कात्री; शैक्षणिक लाभ पूर्ववत करण्याची मागणी

वर्धा / जनमाध्यम

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून नोंदणी कृत बांधकाम कामगार आणि त्यांच्या पाल्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व कल्याणकारी योजना शासनाने बंद केल्याने कामगारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बंद केलेल्या योजना पूर्ववत सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र. इबांक-०५२६/प्र.क्र.७१(३)/काम-७, १३ जुलै २०२६ तसेच मंडळाच्या ठरावानुसार विविध शैक्षणिक लाभांच्या योजना बंद करण्यात आल्या आहेत. आधीच रोजगाराच्या अनिश्चिततेमुळे बांधकाम कामगार आर्थिक अडचणीत आहेत. त्यात शैक्षणिक सहाय्य बंद झाल्याने त्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणाचा खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

आ. रोहित पवार यांना कामगार संघटनांचे निवेदन

या पार्श्वभूमीवर प्रा. नितेश कराळे यांच्या प्रयत्नातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ.रोहित पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले.

बंद केलेल्या योजना पूर्ववत सुरू करण्याचा प्रश्न विधिमंडळात मांडून शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.यावेळी संघर्ष बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष राहुल नगराळे, युवक काँग्रेस प्रदेश सचिव अंकुश मुंजेवार, विशाल नगराळे, रमेश धोबे, मिलिंद ब्रम्हणकर, पांडुरंग डफरे, निलेश वाघ यांच्यासह विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते..

गुन्हे वृत्त

दोन भावंडांवर तलवारीने वार

वर्धा - जुना वाद उफाळून आल्याने दोन भावंडांवर तलवारीने वार करून त्यांना जखमी केल्याची घटना आनंदनगर परिसरात घडली. निशांत बढेल (२५) व सुजल बढेल अशी जखमी भावंडांची नावे आहेत. याप्रकरणी निशांत बढेल यांच्या तक्रारीवरून मनीष ताराचंदी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर मनीष ताराचंदी यानेही निशांत व सुजल बढेल यांनी तलवारीने मारहाण केल्याची तक्रार केली. त्यावरून दोन्ही भावंडांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.निशांत व मनीष यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाला होता. त्यामुळे दोघांमध्ये बोलणे बंद होते. घटनेच्या रात्री निशांत जेवणानंतर फिरत असताना मनीषने शिवीगाळ करीत वाद घातला. त्यानंतर तलवारीने वार केला. भाऊ सुजल वाद सोडविण्यास आला असता मनीषच्या दोन साथीदारांनी त्याच्यावरही तलवारीने वार केल्याचा आरोप आहे. आरडाओरड झाल्याने नागरिक जमा होताच आरोपी पसार झाले. शहर पोलिस तपास करीत आहेत.

बंद घरातून ४२ हजारांचे दागिने लंपास

गिरड - घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी दागिन्यांवर डल्ला मारत ४२ हजार ५३० रुपयांचा ऐवज लंपास केला. आसोला येथे ही चोरी उघडकीस आली. याप्रकरणी गिरड पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आसोला येथील हनुमान श्रीरामे (७१) हे चंद्रपूर जिल्ह्यातील सालोरी येथे वडिलोपार्जित शेतात धान लागवडीसाठी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. चोरीची माहिती श्रीरामे यांना त्यांचे साळे पुरुषोत्तम गजभे यांनी दिली. त्यानंतर घरी परत येऊन पाहणी केली असता घरातील ३० हजार ५३० रुपयांचे पदक व मणी, ११ हजार रुपयांच्या जीवती तसेच एक हजार रुपयांचे चांदीचे कडे असा एकूण ४२ हजार ५३० रुपयांचा ऐवज गायब असल्याचे आढळले. गिरड पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

चोरीच्या उद्देशाने अंधारात दबा

वर्धा : शहर परिसरात चोरीच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या तरुणाला शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. धंतोली चौक परिसरात पहाटेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. विजय बंडीलाल ब्राम्हणे (३८, रा. पाचपावली, नागपूर) असे ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.शहर पोलिसांचे पथक रात्रीच्या वेळी परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी धंतोली परिसरात एक युवक अंधारात लपून बसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्याला आवाज देताच त्याने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. चौकशीदरम्यान त्याने आपली ओळख सांगितली; मात्र अंधारात लपून बसण्याचे समाधानकारक कारण त्याला देता आले नाही. त्यामुळे चोरी किंवा अन्य गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो परिसरात दबा धरून बसला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला. याप्रकरणी शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अल्पवयीन मुलाच्या हाती दुचाकी; वडिलांवर गुन्हा दाखल

हिंगणघाट - अवघ्या १५ वर्षीय मुलाला दुचाकी चालविण्यास दिल्याप्रकरणी त्याच्या वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. बिडकर कॉलेज परिसरात वाहतूक पोलिसांकडून वाहन तपासणी सुरू असताना ही बाब उघडकीस आली.वाहतूक शाखेचे पोलिस बिडकर कॉलेज परिसरात नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करीत होते. त्यावेळी एमएच ४० एएस ६०७१ क्रमांकाची दुचाकी पोलिसांनी अडविली. चालकाने आपले नाव क्रीश रघाटाटे (१५) असे सांगितले. त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. दुचाकी कोणाच्या मालकीची असून ती चालविण्यास कोणी दिली, अशी विचारणा केली असता वाहन वडील जितेंद्र रघाटाटे यांच्या नावावर असल्याचे समोर आले. तसेच त्यांनीच दुचाकी चालविण्यास दिल्याचे मुलाने सांगितले. पोलिस कर्मचारी नितीन भोयर यांनी दुचाकी ताब्यात घेत जितेंद्र रघाटाटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

हातात चाकू घेऊन दहशत शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा

पुलगाव : हातात चाकू घेऊन परिसरात फिरत नागरिकांना शिवीगाळ करीत दहशत निर्माण करणाऱ्या इसमाविरुद्ध पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गांधी नगरातील विश्रामभवन परिसरात ही कारवाई करण्यात आली. लिलाधर माथने (५६) असे आरोपीचे नाव आहे.पोलिस कर्मचारी संदीप बोरबन हे पोलिस ठाण्यात हजर असताना विश्रामभवन परिसरात एक इसम हातात धारदार शस्त्र घेऊन नागरिकांना शिवीगाळ करीत दहशत निर्माण करीत असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी लिलाधर माथने हा हातात चाकू घेऊन नागरिकांना शिवीगाळ करीत असल्याचे पोलिसांना आढळून आले. पोलिसांनी त्याला तातडीने ताब्यात घेत चाकू जप्त केला. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या प्रकारामुळे पोलिसांनी आरोपीविरुद्ध पुलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ **अंक** - २६९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

शिवनामाच्या गजराने रामनगर दुमदुमणार

श्रावणमास उत्सवाची भक्तिमय पर्वणी

वर्धा / जनमाध्यम

श्रावण महिन्याच्या पावन पर्वात शिवभक्तांना भक्तीचा आनंद देण्यासाठी वीरशैव सेवा मंडळाच्या वतीने रामनगर येथील शिवमंदिरात १८ ऑगस्ट ते १२ सप्टेंबरदरम्यान श्रावणमास उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या काळात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून, शिवनामाच्या गजराने रामनगर परिसर भक्तिमय होणार आहे.

उत्सवादरम्यान दररोज भगवान शिवाची अभिषेक पूजा, आरती तसेच लघुरुद्र अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच गणपती अथर्वशीर्ष पठण, महिला मंडळाचे भजन, परायण आणि पुरुष मंडळाच्या भजनाचे कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे पहाटेपासून मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

श्रावणमास उत्सवाच्या निमित्ताने गुणवंत, गरीब व होतकरू विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. धार्मिक उपासनेसोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे विशेष महत्त्व आहे. उत्सवादरम्यान भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.शनिवार १२ सप्टेंबर रोजी विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत सयाजी महाराज राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, नगर परिषद उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर, हभप मयूर महाराज, नगरसेवक पवन राऊत, पाणीपुरवठा सभापती शुभांगी कोलते आणि नगरसेविका वंदना भुते उपस्थित राहणार आहेत.श्रावणातील या पवित्र उत्सवात शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन वीरशैव सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी हमसफरची वेळ बदला

परतीची गाडी पहाटेऐवजी रात्री १० वाजता सोडण्याची मागणी; उमेश अग्निहोत्री यांचे रेल्वेमंत्र्यांना निवेदन

वर्धा / जनमाध्यम

माता वैष्णोदेवीच्या दर्शना साठी जम्मू-कटरा येथे जाणाऱ्या विदर्भातील हजारो भाविकांच्या सोयीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागपूर-जम्मू हमसफर एक्स्प्रेसच्या सध्याच्या वेळापत्रकामुळे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांना त्याच गाडीचा लाभ घेता येत नसल्याने मोठी गैरसोय होत आहे. ही अडचण दूर करण्यासाठी हमसफर एक्स्प्रेसची परतीची वेळ बदलून शुक्रवारी रात्री १० वाजता जम्मूहून गाडी सोडावी, अशी मागणी स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी केली आहे.

याबाबत अग्निहोत्री यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार व निवेदन सादर करून प्रवाशांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात हमसफर एक्स्प्रेसच्या वेळापत्रकाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गुरुवारी सायंकाळी हमसफर जम्मूला पोहोचल्यानंतर भाविक कटरा येथे मुक्काम करतात. शुक्रवारी सकाळी वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी निघाल्यानंतर दर्शन पूर्ण करून सायंकाळी जम्मूला परतणे शक्य होते. मात्र, परतीची हमसफर पहाटेच सुटत असल्याने भाविकांना ही गाडी पकडता येत नाही. त्यामुळे दुसरी रेल्वे, बस किंवा खासगी वाहनाचा आधार घ्यावा लागतो. परिणामी प्रवासाचा खर्च वाढतो आणि अतिरिक्त मुक्कामाचा भार पडतो.

परतीची गाडी रात्री १० वाजता सोडल्यास भाविकांना सकाळी दर्शन घेऊन त्याच दिवशी जम्मूला परतता येईल. याशिवाय हमसफर सेवा थेट श्री माता वैष्णोदेवी कटरा स्थानकापर्यंत वाढवावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.विदर्भातील भाविकांच्या धार्मिक प्रवासासोबतच त्यांच्या वेळेची आणि पैशांची बचत लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने या तक्रारीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

साहूर येथे नशामुक्तीचा जागर

विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन

साहूर/ जनमाध्यम

हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय, साहूर येथे नशामुक्त भारत अभियानांतर्गत नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही. आर. धारणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस उपनिरीक्षक नगरकर आणि वाहतूक नियंत्रण केंद्राचे केंद्रे उपस्थित होते.

अमली पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. तरुणांनी व्यसनाच्या

आहारी जाऊ नये, यासाठी समाजात व्यापक जनजागृती होणे आवश्यक असल्याचे उपस्थितांनी सांगितले. सुरुवातीला विद्यार्थ्यांना मोबाईलचा अनावश्यक वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

पोलिस उपनिरीक्षक नगरकर यांनी शाळा परिसरात अमली पदार्थांची विक्री व सेवन रोखण्यासाठी घ्यावयाची खबरदारी तसेच शिक्षकांची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. केंद्रे यांनी व्यसनामुळे होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक दुष्परिणामांवर प्रकाश टाकला.

मुख्याध्यापक विशाल धारणे यांनी विद्यार्थी सशक्त आणि व्यसनमुक्त असेल तर त्याला प्रगतीची मोठी संधी मिळते. त्यामुळे व्यसनाला आळा घालण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक राहून कुटुंबातील व्यक्तींनाही व्यसनाच्या दुष्परिणामांची माहिती द्यावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन सुनील इखार यांनी केले, तर आभार विद्या पाटील यांनी मानले. यावेळी शिक्षक पचारे, मडावी, उईके, शिक्षकेतर कर्मचारी शिरभाते, पंकज वरकड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बचत गटांच्या प्रश्नावर वातावरण तापले

वर्धा / जनमाध्यम

वर्धा नगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या महिला बचत गट संघातील कथित गैरव्यवहाराबाबत दैनिक जनमाध्यमच्या मंगळवारच्या अंकात प्रकाशित झालेल्या वृत्तानंतर शहरातील वातावरण तापले आहे. या वृत्तावर संघाच्या अध्यक्षांनी भूमिका स्पष्ट करताना, संघात कोणताही घोळ केलेला नाही, असा दावा केला आहे.महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने बचत गटांची चळवळ उभी राहिली आहे. मात्र, महिलांना पुढे नेण्याऐवजी त्यांना डावलण्याचे काम सभापतींकडून केले जात असल्याचा आरोप संघ अध्यक्षांनी केला. त्यामुळे बचत गटांच्या कारभारावरून सुरू झालेला वाद आता महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्याशी जोडला गेला आहे.

महिलांच्या नावावर राजकारण करण्यापेक्षा त्यांच्या प्रगतीला प्राधान्य द्यावे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन संघ अध्यक्षांनी केले.

अंधश्रद्धेचा अंधार दूर करा, विज्ञानाचा प्रकाश स्वीकारा -सुरकार

वर्धा/ जनमाध्यम

अंधश्रद्धा माणसाच्या विवेकावर पडलेला अंधार आहे, तर विज्ञान हा सत्याचा आणि विचारांचा प्रकाश आहे. श्रद्धा आणि उपासनेचे स्वातंत्र्य संविधानाने दिले असले तरी धर्म, पूजा, कर्मकांड किंवा प्रथा यांच्या नावाखाली महिलांचे लैंगिक व आर्थिक शोषण, भीती दाखवून फसवणूक अथवा लुबाडणूक होत असेल तर त्याला विरोध केला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त जगजीवनराम माध्यमिक विद्यालय व नवभारत अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन व चमत्कार सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुरकार विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते.कार्यक्रमाला मुख्याध्यापक पी.डी.उईके, मून, शालेय विवेक वाहिनीचे जिल्हा कार्यवाह दिलीप गुळघाणे, शहर शाखा प्रधान सचिव कल्पना सातव, कार्यकर्ते राजेश कांबळे आदी उपस्थित होते.

प्रश्न विचारण्याची वृत्तीच विज्ञानाचा पाया

मानव हा जिज्ञासू प्राणी आहे. एखाद्या घटनेमागील कारण शोधणे, प्रश्न विचारणे, प्रयोग करणे आणि त्यातून सत्यापर्यंत पोहोचणे ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची प्रक्रिया आहे. आर्यभट्ट यांनी पृथ्वी गोल असल्याचे आणि ती फिरत असल्याचे सांगितले. भास्कराचार्यांसह अनेक भारतीय वैज्ञानिकांनी ज्ञानाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले. युरोपातही ब्रूनो,

वैज्ञानिक दृष्टिकोनातूनच समाजाची प्रगती; विद्यार्थ्यांसमोर चमत्कारांचा पर्दाफाश

सॉक्रेटीस आणि गॅलिलिओ यांसारख्या विचारवंतांनी प्रस्थापित समजुतींना प्रश्न विचारले आणि त्यासाठी त्यांना मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागले, असे सुरकार यांनी सांगितले.

आजचा माणूस मोबाईल, संगणक, मोटार, विमान, फ्रिज, एसी यांसारख्या विज्ञान-तंत्रज्ञानाचा सहज वापर करतो. मात्र त्याचवेळी भूत-प्रेत, करणी, जादूटोणा, भानामती, चकवा, ज्योतिष, ग्रह-तारे यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो, अशा अवैज्ञानिक समजुतींवर विश्वास ठेवला जातो. विज्ञानाचा वापर करणाऱ्या समाजाने अंधश्रद्धेपासूनही मुक्त होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चमत्कार नाही, त्यामागे विज्ञान

कार्यक्रमात विविध चमत्कारांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यामागील वैज्ञानिक कारणे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. एखाद्या वस्तूला आपोआप आग लागणे, हातचलाखीने वस्तू गायब करणे किंवा दैवी शक्तीच्या नावाखाली केले जाणारे प्रयोग यामागे तंत्र-मंत्र नसून रसायने, हातचलाखी आणि वैज्ञानिक प्रक्रिया असू शकतात, हे प्रात्यक्षिकांतून स्पष्ट करण्यात आले.

चमत्कार पाहून घाबरण्या ऐवजी त्यामागील कार्यकारणभाव शोधण्याची सवय विद्यार्थ्यांनी लावून घ्यावी. कोणतीही घटना डोळसपणे तपासून पाहणे आणि पुरावा मिळाल्याशिवाय त्यावर विश्वास न ठेवणे, हाच वैज्ञानिक दृष्टिकोन असल्याचे सुरकार यांनी सांगितले.

दाभोळकरांच्या विचारांना कृतीची जोड

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आयुष्यभर प्रबोधन केले. त्यांच्या हत्येनंतर २० ऑगस्ट हा दिवस वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारासाठी विविध संघटनांकडून जनजागृतीचा दिवस म्हणून पाळला जातो.

त्यांच्या विचारांना पुढे नेण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पी. डी. उईके यांनी केले.

संचालन व आभार मून यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी ते साठी माटे, सोनावणे, सारोटे, राऊत तसेच चरडे आणि बाळसराफ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना आठवड्यातून केवळ तीनच दिवस!

-कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करा

नांदगाव पेठ/प्रतिनिधीः- नांदगाव पेठ येथील राज्यस्तरीय श्रेणी-१चा पशुवैद्यकीय दवाखाना आठवड्यातून केवळ तीनच दिवस सुरू राहत असल्याने परिसरातील पशुपालकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. या दवाखान्यावर नांदगाव पेठसह आजूबाजूच्या तब्बल दहा ते बारा गावांतील पशुपालक अवलंबून आहेत. परिसरात दुधाळ जनावरांची संख्या मोठी असताना पशुवैद्यकीय सेवा मात्र आठवड्यातील निम्मे दिवस उपलब्ध असल्याने पशुपालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या ठिकाणी नियुक्त असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. डी.एन.हटकर यांनी पशुरुग्णालयाचा कारभार हातात घेतल्यापासून याठिकाणी नांदगाव पेठ परिसरासह तिवसा, नांदगाव खंडेश्वर यांसारख्या तालुक्यामधून पशुपालक जनवारांना योग्य उपचार व जटील शस्त्रक्रियेसाठी नांदगाव पेठ येथील रुग्णालयात दाखल करतात. आजूबाजूच्या बारा गावातील जनवारांच्या उपचारसाठी एकमेव पशुरुग्णालय असून येथील कायमस्वरूपी डॉ. हटकर हे आठवड्यातील तीन दिवस नांदगाव पेठ येथे, तर उर्वरित तीन दिवस अचलपूर येथे सेवा देत असल्याची माहिती आहे. परिणामी नांदगाव पेठचा श्रेणी-१चा दवाखाना तीन दिवस डॉक्टरांअभावी पूर्णतः बंद राहतो.

जनावर आजारी पडल्यास किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास पशुपालकांना खासगी पशुवैद्यकीय सेवेकडे धाव घ्यावी लागत असून त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.नांदगाव पेठ परिसरात मोठ्या प्रमाणात पशुपालन व दुग्ध व्यवसाय केला जातो. जनावरांच्या लसीकरणापासून उपचारांपर्यंत तसेच विविध पशुसंवर्धन योजनांसाठी सरकारी पशुवैद्यकीय दवाखाना हा पशुपालकांसाठी महत्त्वाचा आधार आहे. मात्र दवाखानाच नियमित सुरू राहत नसल्याने शासकीय पशुवैद्यकीय सेवेचा उद्देश बाधित होत असल्याची भावना पशुपालकांमध्ये आहे.

नांदगाव पेठसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी श्रेणी-१चा दवाखाना असूनही येथे कायमस्वरूपी डॉक्टर उपलब्ध नसणे, ही बाब जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी असल्याची चर्चा आहे. पशुसंवर्धन विभागाचे उपआयुक्त जोशी यांच्याकडून जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखाने, पशुधन आणि पशुपालकांच्या समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोपही स्थानिकांकडून केला जात आहे.

> माझी बदली अचलपूर येथील पशुवैद्यकीय दवाखाना येथे करण्यात आली असून तूर्तास अचलपूर येथे आठवड्यातून तीन दिवस आणि नांदगाव पेठ येथे तीन दिवस पशुवैद्यकीय सेवा सुरु आहे. माझ्या पश्चात नांदगाव पेठ येथे दोन कर्मचारी तैनात आहेत. मी नसतांना ते देखील प्राथमिक जबाबदारी पार पाडतात.
>
> **-डॉ. डी.एन.हटकर**, पशुवैद्यकीय अधिकारी - पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी १ नांदगाव पेठ

> 'श्रेणी-१चा दवाखाना असूनही आठवड्यात तीनच दिवस सेवा मिळणे अन्यायकारक आहे. कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी, औषधे, लसी व आवश्यक साधने उपलब्ध करून द्यावीत.अन्यथा याविरोधात आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल.
>
> **-नितीन हटवार**-माजी जि.प. सदस्य तथा शिवसेना नेते

साहित्यरत्न डॉ.लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

तिवसा/प्रतिनिधीः- मातंग समाज संघर्ष क्रांती संघटनेद्वारे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती तिवसा येथे या द व देशमुख महाविद्यालयात संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयातील प्रा. डॉ. कुसुमेंद्र सोनटक्के,उदघाटक डॉ. मयूर कळसे तहसीलदार तिवसा, प्रमुख अतिथी गोपाल उपाध्याय पोलीस निरीक्षक तिवसा, प्रतिभा गौरखेडे नगराध्यक्ष तिवसा, बबलू तायडे -अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त, गजानन ताकतोडे, किरण खंडारे -अध्यक्ष मातंग समाज संघटना तिवसा, प्रा.अरविंद वाघमारे, सावित्रीबाई वाघमारे उपाध्यक्ष, मेजर बंडू खडसे उपाध्यक्ष, माजी सरपंच कविता हिवराळे, मंगला वाघमारे सहसचिव, अमृतराव खडसे इत्यादी उपस्थित होते. यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील कार्यावर पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.यावेळी दहावी,बारावी, स्कॉलरशिप, व कला कौशल्य मधून एकूण २२ विद्यार्थ्यांना गुणगौरव शील्ड देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे सचिव प्रशांत प्रधान, तर प्रास्ताविक अध्यक्ष किरण खंडारे, तर आभार प्रदर्शन सागर डोंगरदिवे यांनी केले. या कार्यक्रम यशस्वीतेकरिता संघटनेचे पदाधिकारी शरद हिवराळे,रमेश वाघमारे, विठ्ठल वाघमारे, सुनील इंगोले, राजू जोंधळे,सिद्धार्थ शिंदे, आकाश प्रधान, इत्यादीनी परिश्रम घेतले.तिवसा तालुक्यातील सर्व गावातील समाज बांधव कार्यक्रमाला उपस्थित होते.

सण-उत्सव काळात आक्षेपाहार्य गाणे -वाजविण्यास मनाई

-जिल्ह्यातील ग्रामीण भागात आदेश जारी

अमरावती/प्रतिनिधीः- ईद-ए-मिलाद, कावड यात्रा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहिहांडी,पोळा,गणपती उत्सव कालावधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात आयोजित धार्मिक कार्यक्रमांदरम्यान चिन्हीत व आक्षेपार्ह गाणे व भडकाऊ भाषणांच्या क्लिप्स वाजविण्यास अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १६३ अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. २४ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२६ पर्यंत हा आदेश लागू राहणार असून उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.ए.बी.कट्टे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१६८९/२०२६
अभिषेक व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.२८.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. **Abhishek Dilip Thakare**
Age 29 years. Occu.: Pvt. Ltd.
R/o. C/o. Captain Dilip Thakare, 2586/2,
Suryawansh Bhgyodaya Colony, Plot No.8,
Siddhivinayak Nagar, Vidarbh Mahavidyalaya, Amravati
2. **Aarti Dilip Thakare**
Age 27 years. Occu.: Teacher
R/o. C/o. Captain Dilip Thakare, 2586/2,
Suryawansh Bhgyodaya Colony, Plot No.8,
Siddhivinayak Nagar, Vidarbh Mahavidyalaya, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत दिलीप दिगंबर ठाकरे** हे दिनांक २८.०६.२०२६ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार अभिषेक व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अभिषेक व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.ए.बी.कट्टे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१६८२/२०२६
रंजना व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.२३.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. **Ranjana Onkarrao Andure,** Age 64 years. Occu.: Household
R/o. Near Sonal Colony Sangita Nagar,
Shegaon Naka Road VMV, Amravati
2. **Ankita Nayan Deshmukh,** Age 38 years. Occu.: Household
R/o. Plot No.37, Line No.2, Near Saiarapan Salon
Chandravati Colony, Sai Nagar, Amravati
3. **Nikita Onkarrao Andure,** Age 36 years. Occu.: Household
R/o.Near Sonal Colony Sangita Nagar,
Shegaon Naka Road VMV, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत ओंकार नागोराव अंदुरे** हे दिनांक १४.०४.२०२६ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार रंजना व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रंजना व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१२.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

तहसिलदार, तिवसा (राजस्व)यांचे कार्यालय

रा.मा.क्र. एम.आर.सी.-८१/ -------/कु-हा/२०२६-२७

क्र./प्रस्तु-१/स.म.अ./जन्म-मृत्यू नोंद/अह./कावि-८८४/२०२६ दिनांक २०/०८/२०२६

जाहीरनामा

या द्वारे सर्वत्र नागरिकांना सुचित करण्यात येते की,**अर्जदार सुनिल हरिभाऊ साबळे, रा.मौजा मालथुर,ता.तिवसा, जि.अमरावती** यांनी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) व जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा, २०२३ भारत राजपत्र दिनांक ११/०८/२०२३ व मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्रमांक -अका/एमएजी/डे-२७/जन्म व मृत्यू नोंदणी (सुधा.) अधि./आदेश/कावि-८१९/२०२३, दिनांक २३/१०/२०२३ व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्रमांक - जमृनो- २५२५(ई.ऑ.९९११८१)प्र.क्र. २२/ कु.क.दिनांक १२ मार्च २०२५ नुसार त्यांचे स्वतःचा जन्म दिनांक १७/०२/१९८७रोजी मौजा मालथुर येथे अर्जदार यांचे घरी झाला असल्यामुळे त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, अनकवाडी येथे होण्याकरिता आदेश मिळावा म्हणुन अर्ज दाखल केलेला आहे.

तेव्हा ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदर्हु जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे** आंत आपला आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा, मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
(मयुर कळसे)
तहसिलदार, तिवसा

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०८, यांचे न्यायालय
एम.ए.सी.पी. क्रमांक ४२४/२०२३ ने.ता.१७.०९.२०२६

पिटीशनर - रोहिणी संगम सोळंके व ईतर
-- वि --
रिस्पांडंट - कृष्णा रामदास शेंडे व ईतर

बनाम - कृष्णा रामदास शेंडे
रा.गणेश मंदिराजवळ, नांदगांव खंडे., ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation

ज्याअर्थी वरील पिटीशनर **रोहिणी संगम सोळंके** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०६, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **कृष्णा रामदास शेंडे**, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **१७.०९.२०२६** रोजी सकाळी **११.००** वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २३.०७.२०२६२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.
अमरावती
दि.२३.०७.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

कार्यालय नगर परिषद चांदूर बाजार, जि.अमरावती

जाहीर सूचना

मुख्य अभियंता-२, तथा राज्यस्तरीय समन्वय अधिकारी, रा.सु.अ. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) गृहनिर्माण भवन, कलानगर वान्द्रे (पुर्व) मुंबई यांचे जा.क्र. एमएच/मुअ-२/उमुअ/काअ१/प्रआयो/प्रा./न.क्र.३५०/१८, दि.०६.०६.२०१८ अन्वये कळविल्यानुसार नगर परिषद चांदूर बाजारचे स्तरावर खालीलप्रमाणे अस्थायी/तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहीत प्रक्रियेद्वारे उमेदवारांची निवड करुन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावयाची आहे.

तरी, पात्रताधारक उमेदवारांनी **दि.०३.०९.२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) आवश्यक सर्व कागदपत्रासह अर्ज स्वहस्ते/टपालाने विहीत मुदतीत सादर करावा. कोणत्याही कारणाने व दिरंगाईमुळे मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. सदर जाहिरातीबाबत सविस्तर माहिती संबंधित न.प.बांधकाम विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

अ.क्र.	पदाचे नांव	पदसंख्या	शैक्षणिक अर्हता	मासिक वेतन
१.	प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहर स्तरीय तांत्रिक कक्षातील तज्ञ (CLTC)	०१	मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी (B.E.) पदवी	रु.३५,०००/- (एकत्रित)

पात्रता व प दाचे नियुक्ती संदर्भातील अटी व शर्ती नगर परिषद कार्यालयाचे सूचना फलकावर तसेच संकेतस्थळ https://mahaulb.in/Portal Site/#/app/home वर उपलब्ध आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(गीता ठाकरे)
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१६७४/२०२६
चिरमई -वि- निरंक
पुढील ता.१६.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Chirmai Nurbu Tamang
Age 56 Yrs. Occu.: Household
R/o 83/1, Bilishivale, Bangalore North, Dr.Shivarama Karantah Nagar, Bangalore North, Bangalore Karnataka-560077

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Dhananjay Madhukar Padwal यांचे दिनांक **२९.११.२०२३** रोजी Karnataka येथे निधन झाले. **अर्जदार** Chirmai Nurbu Tamang यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Chirmai Nurbu Tamang वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखवित्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१५३३/२०२६
एजाज सिराज खान पठाण -वि- निरंक
पुढील ता.०४.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. एजाज खान सिराज खान पठाण, वय ४५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. सरफराज खान सिराज खान, वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.सिराज खान पठाण, मु.इंदला कॅम्प, पो.अमरावती कॅम्प, जि.अमरावती
३. हमराज खान सिराज खान, वय ५४ वर्षे, धंदा - मजुरी
रा.सिराज खान मार्डी रोड मस्जिद जवळ, मु.इंदला अमरावती कॅम्प-४४४६०२

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सिराज खाँ लतिफ खा पठाण** यांचे दिनांक **२७.०१.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार एजाज खान सिराज खान पठाण व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **एजाज खान सिराज खान पठाण व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखवित्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१५९३/२०२६
चिरमई -वि- निरंक
पुढील ता.१५.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Dwarka Mohan Sable
Age 61 Yrs. Occu.: Household work
R/o Sanjiwani Colony, Gadge Nagar, V.M.V.Road, Amt.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत तुषार मोहनराव साबळे** यांचे दिनांक **२६.१०.२०२५**रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार द्वारका विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **द्वारका विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखवित्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना आज दि.२६.०८.२०२६ रोजी जाहिररित्या कळविण्यात येते की,माझे पक्षकार **श्री मंगेश रमेश घटी, म.न.६५,वार्ड नं.०३,इंदिरा नगर, पाणीटाकीजवळ, मु.पो.सोमाखार, छिंदवाडा, मध्यप्रदेश-४८०००१ हल्लीचा पत्ता तर्फे दिपक सोनाप्पा खताडे, रा.शिवनेरी कॉलनी, कॅम्प रोड, महापोर बंगल्याजवळ मार्डी रोड, अमरावती,ता.जि.अमरावती**,यांनी दिलेल्या अधिकारावरुन व माहितीवरुन ही जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे.

नोंदणी तुकडी अमरावती, नोंदणी पोट तुकडी तिवसा, जिल्हा परिषद कार्यालय, अमरावती, पंचायत समिती कार्यालय, तिवसा, ग्रामपंचायत कार्यालय, माळोगांवचे कक्षेतील मौजा माळेगांव, ता.तिवसा, जि.अमरावती येथील कोरडवाहू शेतजमीन खालील वर्णन केल्याप्रमाणे.

गट नं.	भो.व.	हे.आर.	पो.ख.	आ.रु.	वि.क्र.
२४५	१	३.५७	०.००	३.८०	२

सदर्हू शेताची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे,
पुर्वेस - शेत सर्वे नं.२४६, पश्चिमेस - शेत सर्वे नं. २४४,
उत्तरेस - सरकारी शिव पांधण रस्ता, दक्षिणेस - शेत सर्वे नं. २४२

येणेप्रमाणे वरील वर्णन केलले व चर्तुःसिमेतील एकुण ३ हे.५७ आर शेतजमीन माझे पक्षकार हे शेतमालक श्री आबीद खान मुनेखान, रा.तिवसा, ता.तिवसा, जि.अमरावती यांचेकडून विकत घेत आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात आहे की, वर नमुद केलेल्या शेतजमीनीवर कुणाचाही व कसल्याही प्रकारचा हक्क, बोझा, गहाण इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून दि.०३.०९.२०२६ पुर्वी लेखी आक्षेप माझे पक्षकाराकडे द्यावा व त्याची लेखी पोहोच घ्यावी. वरील मुदतीच्या आत कोणतीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर्हू शेताची खरेदी माझे पक्षकाराचे नावाने नोंदणीकृत खरेदीखत झाल्यानंतर कुणाचीही कुठलीही हरकत माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही व ती अवैध असेल.

करिता ही जाहीर नोटीस.

सही/-
अधिवक्ता
ॲड.शिशिर लि.अळसपूरकर,
परांजपे कॉलनी, जिल्हा उद्योगसमोर, अमरावती

दि.२६.०८.२०२६
ठिकाण : अमरावती

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना आज दि.२६.०८.२०२६ रोजी जाहिररित्या कळविण्यात येते की,माझे पक्षकार **श्री मंगेश रमेश घटी, म.न.६५,वार्ड नं.०३,इंदिरा नगर, पाणीटाकीजवळ, मु.पो.सोमाखार, छिंदवाडा, मध्यप्रदेश-४८०००१ हल्लीचा पत्ता तर्फे दिपक सोनाप्पा खताडे, रा.शिवनेरी कॉलनी, कॅम्प रोड, महापोर बंगल्याजवळ, मार्डी रोड,अमरावती,ता.जि.अमरावती**, यांनी दिलेल्या अधिकारावरुन व माहितीवरुन ही जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे.

नोंदणी तुकडी अमरावती, नोंदणी पोट तुकडी तिवसा, जिल्हा परिषद कार्यालय, अमरावती, पंचायत समिती कार्यालय, तिवसा, ग्रामपंचायत कार्यालय, माळोगांवचे कक्षेतील मौजा माळेगांव, ता.तिवसा, जि.अमरावती येथील कोरडवाहू शेतजमीन खालील वर्णन केल्याप्रमाणे.

गट नं.	भो.व.	हे.आर.	पो.ख.	आ.रु.	वि.क्र.
२०८	१	१०.९२	०.०२	२३.००	२

सदर्हू शेताची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे,
पुर्वेस - भाजा सावंत यांचे शेत, पश्चिमेस - सुरेश गटरी यांचे शेत,
उत्तरेस - रोड , दक्षिणेस - वंदना खताडे यांचे शेत

येणेप्रमाणे वरील वर्णन केलले व चर्तुःसिमेतील एकुण ४ हे.७७ आर शेतजमीन माझे पक्षकार यांनी सादीक अहमद ईनायत खान, रा.जमील कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती व मोहम्मद कैसर मोहम्मद अफसर, रा.वार्ड नं.६, कु-हा, ता.तिवसा, जि.अमरावती यांचेकडून विकत घेत आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात आहे की, वर नमुद केलेल्या शेतजमीनीवर कुणाचाही व कसल्याही प्रकारचा हक्क, बोझा, गहाण इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून दि.०३.०९.२०२६ पुर्वी लेखी आक्षेप माझे पक्षकाराकडे द्यावा व त्याची लेखी पोहोच घ्यावी. वरील मुदतीच्या आत कोणतीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर्हू शेताची खरेदी माझे पक्षकाराचे नावाने नोंदणीकृत खरेदीखत झाल्यानंतर कुणाचीही कुठलीही हरकत माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही व ती अवैध असेल.

करिता ही जाहीर नोटीस.

सही/-
अधिवक्ता
ॲड.शिशिर लि.अळसपूरकर,
परांजपे कॉलनी, जिल्हा उद्योगसमोर, अमरावती

दि.२६.०८.२०२६
ठिकाण : अमरावती

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना आज दि.२६.०८.२०२६ रोजी जाहिररित्या कळविण्यात येते की,माझे पक्षकार **श्री मंगेश रमेश घटी, म.न.६५,वार्ड नं.०३,इंदिरा नगर, पाणीटाकीजवळ, मु.पो.सोमाखार, छिंदवाडा, मध्यप्रदेश-४८०००१ हल्लीचा पत्ता तर्फे दिपक सोनाप्पा खताडे, रा.शिवनेरी कॉलनी, कॅम्प रोड, महापोर बंगल्याजवळ, मार्डी रोड,अमरावती,ता.जि.अमरावती**, यांनी दिलेल्या अधिकारावरुन व माहितीवरुन ही जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे.

नोंदणी तुकडी अमरावती, नोंदणी पोट तुकडी तिवसा, जिल्हा परिषद कार्यालय, अमरावती, पंचायत समिती कार्यालय, तिवसा, ग्रामपंचायत कार्यालय, माळोगांवचे कक्षेतील मौजा माळेगांव, ता.तिवसा, जि.अमरावती येथील कोरडवाहू शेतजमीन खालील वर्णन केल्याप्रमाणे.

| गट न

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

ॲड. शीतल मेटकर यांच्या नृत्यकलेचा प्रवास आज दूरदर्शनवर

अमरावती-प्रख्यात ओडिसी नृत्यांगना ॲड. शीतल मेटकर यांच्या नृत्यकलेचा प्रवास बुधवार २६ ऑगस्टला रात्री १० वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'नागपूर दर्पण' या कार्यक्रमातून दाखवला जाणार आहे. ख्यातनाम निवेदक नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे. नागपूर दूरदर्शनच्या चमूने ॲड. शीतल मेटकर यांच्या निवासस्थानी त्यांच्या नृत्य साधनेच्या प्रवासाच्या निमित्ताने त्यांच्याशी गप्पांचे चित्रीकरण केले. प्राचार्य, नृत्य शिक्षिका, फिटनेस कोच आणि हौशी लेखिका अशा विविध भूमिका बजावणाऱ्या शीतल मेटकर आपल्या आवडत्या भूमिकेबद्दल यातून बोलणार असून नृत्यक्षेत्रातील ३५ वर्षांच्या प्रवासातले टप्पे त्या मुलाखतीतून विषद करणार आहेत.विदर्भातील एका गुणी ओडिसी नृत्य कलाकाराचा परिचय यानिमित्ताने होणार असून त्यांच्या नृत्याची झलकदेखील या कार्यक्रमातून बघायला मिळणार आहे. या कार्यक्रमाचे निर्माता मनोज जैन असून अमरावतीकरांनी हा कार्यक्रम आवर्जून बघावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कस्तुराबाई जैन विद्यालयात राखी निर्मिती कार्यशाळा

शिराळा-येथील महाराष्ट्र शिक्षण समिती व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालयात राखी निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.आंनददायी उपक्रम अंतर्गत राखी निर्मिती कार्यशाळा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यालयातील कला शिक्षक चव्हाणसर यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ग ५ते ८ च्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला विद्यार्थ्यांनी कौशल्याचा वापर करत सुंदर कलाकृतीच्या राख्या तयार केल्या.विद्यार्थानी तयार केलेल्या राख्या भारतीय सैनिकांना पाठवण्यात येणार आहेत.यावेळी मुख्याध्यापक डॉ.एस.आर.देशमुख व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे शेती शाळेचे आयोजन

अमरावती-येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय तर्फे खरीप पीक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर दर्यापूर तालुक्यातील मौजे टाकरखेडा कावरे व बोराळा येथे शेती शाळा व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालया तर्फे कृषी विद्या विभागाच्या प्रा. श्वेता गणवीर यांनी शेतकऱ्यांना कापसाची सघन लागवड पद्धत व एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देऊन कापूस,सोयाबीन पिकातीलअन्नद्रव्य व कीड व्यवस्थापनव्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली त्यांच्या शंकांचे निरसन केले.सदर शेती शाळा व प्रक्षेत्र भेटी मधील मार्गदर्शना बाबत उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात देखील पी. आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे पिक उत्पादन, संरक्षण, काढणी पश्चात तंत्रज्ञान व शेतमालाचे विपणन यासंदर्भात मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.सदर कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी विपिन चंदनकर, सहाय्यक कृषी अधिकारी प्रशांत हाडोळे व दीपक पांडे ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबीर

शिराळा- नजिकच्या सावंगा (आसरा) येथे राम उमेकर (रुग्णसेवक) यांच्या वाढदिवसानिमित्त श्री हनुमान नवयुवक मंडळ व भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ,सावंगा (आसरा) यांच्या पुढाकाराने तसेच समता फाउंडेशन, मुंबई आणि महात्मे हॉस्पिटल, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले सावंगा (आसरा), अंतोरा, देवरा, देवरी व ब्राह्मणवाडा भगत परिसरातील ७० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. नेत्र तपासणीदरम्यान १९ रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले असून, या सर्व रुग्णांची १ सप्टेंबर रोजी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.या शिबिरासाठी महात्मे हॉस्पिटल,अमरावतीचे मॅनेजर डॉ. माजरे, डॉ.करण डिकर तसेच समता फाउंडेशनचे नागेश पळसकर यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबीर यशस्वी करण्यासाठी भिमशक्ती युवा क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भावेश खेडकर, शैलेश खेडकर, गजानन म्हळसणे, अजिंक्य उमेकर, वसीम सौंदागर, आशिष उमेकर, शरद वाकाडे, वैभव डवरे, आशिष तसरे, रविंद्र राऊत, प्रथमेश काळमेघ, धनंजय शिगनापुरे तसेच भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ व श्री हनुमान नवयुवक मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. 'रुग्णसेवा हीच खरी समाजसेवा' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून गरजू नागरिकांना मोफत आरोग्यसेवा मिळाली. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

मध्यप्रदेशात आधुनिक रस्त्यांचे जाळे उभे, महाराष्ट्राच्या हद्दीत खड्डे

नागरिक चिखल आणि धुळीच्या विळख्यात; ३५ हून अधिक गावांचा विकास रखडला

धारणी/वार्ताहर
मेळघाटातील सीमाभागात विकासाच्या नावाने दोन वेगवेगळी चित्रे पाहायला मिळत आहेत. मध्यप्रदेशाच्या हद्दीत प्रवेश होताच प्रवाशांचे स्वागत प्रशस्त, गुळगुळीत आणि सुरक्षित रस्ते करतात. मात्र काही मीटर पुढे महाराष्ट्राच्या हद्दीत पाऊल टाकताच खड्ड्यांनी विदीर्ण झालेले रस्ते, उखडलेले डांबर आणि धुळीचे ढग नागरिकांच्या नशिबी येतात. एकाच सीमारेषेवर विकासातील एवढी मोठी तफावत दिसत असल्याने सीमाभागातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

धारणी तालुक्यातील डोमा, डेडपानी, चूरणी, काकरमाल, बोरी, सेमाडोह परिसरातील अनेक गावांना जोडणारा हा मार्ग हजारो नागरिकांसाठी दैनंदिन जीवनाचा आधार आहे. विद्यार्थ्यांपासून शेतकऱ्यांपर्यंत, रुग्णांपासून व्यापाऱ्यांपर्यंत प्रत्येकजण या मार्गावर अवलंबून आहे. मात्र वर्षानुवर्षे रस्त्याची अवस्था बदलत नसल्याने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असल्याचे चित्र आहे.महाराष्ट्राच्या हद्दीतील अनेक ठिकाणी रस्ता पूर्णपणे उखडला असून मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. काही ठिकाणी डांबराचा मागमूसही उरलेला नाही. वाहनचालकांना रस्ता टाळत खड्ड्यांमधून वाट काढावी लागत आहे. पावसाळ्यात हेच खड्डे पाण्याने भरल्याने अपघाताचा धोका अनेकपटीने वाढतो, तर उन्हाळ्यात धुळीमुळे समोरची वाहनेही दिसेनाशी होतात.स्थानिकांच्या मते, दरवर्षी लाखो रुपयांची डागडुजी केली जाते; मात्र काही दिवसांतच रस्ता पुन्हा पूर्ववत होतो. कायमस्वरूपी उपाययोजना मात्र आजपर्यंत झालेली नाही.

मध्यप्रदेशने दाखवला वेग

सीमेच्या दुसऱ्या बाजूला मध्यप्रदेश शासनाने अल्पावधीत दर्जेदार रस्ते उभारून नागरिकांना सुरक्षित वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, दर्जेदार साहित्य आणि वेळेत काम पूर्ण करण्याची कार्यपद्धती यामुळे तेथील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.याउलट महाराष्ट्राच्या बाजूला रस्त्यांची कामे मंजुरी, निविदा, प्रशासकीय प्रक्रिया आणि विविध कारणांमुळे वर्षानुवर्षे रखडल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे 'विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र मागे पडतोय का?' असा प्रश्न आता सीमाभागातील प्रत्येक नागरिक विचारत आहे.

> **आता फक्त आश्वासने नकोत, प्रत्यक्ष काम हवे**
>
> सीमाभागातील नागरिकांनी शासनाकडे तातडीने संपूर्ण रस्त्याचे उच्च दर्जाचे डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे. तात्पुरत्या डागडुजीऐवजी दीर्घकालीन उपाययोजना राबवून दर्जेदार रस्ते उभारावेत, अशी मागणी जोर धरत आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की, 'सीमेच्या पलीकडे विकास शक्य असेल तर महाराष्ट्रात का नाही?' या प्रश्नाचे उत्तर आता प्रत्यक्ष कामातून मिळाले पाहिजे.

शेतकरी, विद्यार्थी आणि रुग्ण सर्वाधिक त्रस्त

या मार्गावरून दररोज हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी, शेतकरी शेतीमाल विक्रीसाठी आणि रुग्ण उपचारासाठी प्रवास करतात. खराब रस्त्यांमुळे विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचणे कठीण होत आहे. रुग्णवाहिका अनेकदा संथगतीने धावतात. गंभीर रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यात अडथळे निर्माण होतात. शेतकऱ्यांचा शेतीमाल बाजारात पोहोचवताना वाहतुकीचा खर्च वाढतो. खराब रस्त्यामुळे मालाचे नुकसान होत असल्याने आर्थिक फटका बसत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. मेळघाट हा राज्यातील निसर्गरम्य पर्यटन पट्टा म्हणून ओळखला जातो. दरवर्षी हजारो पर्यटक या भागाला भेट देतात. मात्र रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अनेक पर्यटक हा मार्ग टाळत असल्याचे स्थानिक व्यावसायिक सांगतात. रस्ते चांगले झाल्यास पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळू शकते, मात्र दुर्लक्षामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधींपासून वंचित राहावे लागत आहे.

घोषणांचा पाऊस

गेल्या अनेक वर्षांत विविध लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून रस्त्यांच्या विकासाची आश्वासने देण्यात आली. निधी मंजूर झाल्याच्या घोषणा झाल्या. मात्र प्रत्यक्षात कामे पूर्ण झालेली दिसत नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी वाढत आहे.स्थानिकांचे म्हणणे आहे की, प्रत्येक निवडणुकीत रस्त्यांचा मुद्दा गाजतो; मात्र निवडणुका संपल्यानंतर हा प्रश्न पुन्हा विस्मरणात जातो.

विकासाचा प्रश्न की प्रशासनाची उदासीनता?

रस्ता हा केवळ वाहतुकीचा विषय नाही. तो शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, पर्यटन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे मेळघाटातील रस्त्यांचा प्रश्न हा आता केवळ स्थानिक राहिलेला नसून राज्याच्या विकास धोरणाची परीक्षा ठरत आहे.सीमेच्या दोन बाजूंना दिसणारी विकासाची दरी कमी करण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याची भावना सीमाभागातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

व्यक्त होणेसाठी भाषेचा सातत्याने अभ्यास करणे गरजेचे-डॉ.प्रज्ञा येनकर

अमरावती/का.प्र.
संवाद करताना केवळ शब्दसंग्रह आणि व्याकरणाचा अभ्यास पुरेसा नाही, तर प्रत्यक्ष बोलण्याचा नियमित सराव अत्यंत महत्त्वाचा आहे. आपल्या मनातील विचार स्पष्टपणे आणि आत्मविश्वासाने व्यक्त करण्यासाठी भाषेचा सातत्याने अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर यांनी व्यक्त केले.

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) अमरावती परिसरात 'भाषिक कौशल्य' या विषयावर विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्याभारती महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रज्ञा येनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विशेष कार्य अधिकारी डॉ. मनोज कुमार सोनोने, डॉ. विनोद निताळे, जयंत सोनोने तसेच रोहन तायडे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रज्ञा येनकर म्हणाल्या की, नवीन शब्द शिकताना त्यांचा योग्य उच्चार, अर्थ आणि वाक्यातील वापर समजून घेणे गरजेचे आहे. संवाद साधताना चुका होण्याची भीती विद्यार्थ्यांनी मनातून काढून टाकावी, असे सांगत डॉ. येनकर यांनी 'प्रॅक्टिस मेक कम्युनिकेशन बेटर' या भावनेतून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात इंग्रजीचा अधिकाधिक वापर करावा, असा सल्ला दिला. संभाषण, वाचन, ऐकणे आणि लेखन या चारही कौशल्यांचा नियमित सराव केल्यास भाषेवरील प्रभुत्व वाढते, तसेच व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास निर्माण होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे संचालन सागर याने तर आभार आश्लेषा हिने मानले. पाहुण्यांचा परिचय हिमांशू राय याने दिला.यावेळी सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

आदिवासी विद्यार्थ्यांचा संघर्ष सुरूच

अमरावती-येथील अप्पर आयुक्त कार्यालयासमोर आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन ठामपणे सुरू आहे.

पण संघर्षाची जिद्द कमी झालेली नाही; उलट विद्यार्थ्यांचा आवाज अधिक बुलंद होत आहे! न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या या लढ्याची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी जोर धरत आहे.हा केवळ आंदोलन नाही, हा हक्कासाठीचा संघर्ष आहे! एकजूट कायम राहील आवाज बुलंद राहील न्याय मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नाही!

गोरगरिबांच्या लेकरांचे बळी घेऊ नका
राज्याची घडी बसत नसेल तर राजीनामा द्या-अंकुश कावडकर

खल्लार/वार्ताहर
डफरीन हॉस्पिटल अमरावती येथे ३ चिमुकल्यांचा शॉर्टसर्किटमुळे गुदमरून मृत्यू झाला, ही घटना मन हेलावून टाकणारी निशब्द आहे. पोटचे लहान लेकरू गमावलेल्या एका असहाय पित्याचा हंबरडा मन हेलावून टाकणारा आहे. गोरगरिबांचे हाल होत आहेत.निष्पाप लेकरांचे बळी जात आहेत. मात्र आरोग्य व्यवस्थेसह अनेक क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचार आणि कमिशनखोरी बोकाळल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी केला.

देशाच्या पंतप्रधानांपासून सत्तेतील सर्वजण देशाला 'विश्वगुरू' बनविण्याच्या घोषणा करतात.मात्र दुसरीकडे सामान्य जनता कोणत्या भयाण परिस्थितीतून जात आहे. याची जाणीव सरकारला आहे का,असा सवालही कावडकर यांनी उपस्थित केला.'देवाभाऊ,तुम्हाला राज्याची घडी बसवता येत नसेल,तर राजीनामा द्या पण गोरगरिबांच्या लेकरांचे बळी घेऊ नका अशी संतप्त प्रतिक्रिया युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी व्यक्त केली. सामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा,सुरक्षित वातावरण आणि मूलभूत सुविधा मिळणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष परिस्थितीकडे गांभीर्याने पाहून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

शेतकऱ्यांचे अर्धनग्न आंदोलन

वाशीम - 'मनरेगा' अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण करूनही अनुदानाची रक्कम गेल्या दोन वर्षांपासून मिळाली नसल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन केले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामोदर इंगोले यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. वाशीम जिल्ह्यातील तब्बल ८ हजार ४९३ शेतकऱ्यांचे सिंचन विहिरींचे अनुदान दोन वर्षांपासून रखडले असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. 'मनरेगा' अंतर्गत विहिरी मंजूर झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शासनाच्या निकषांनुसार बांधकाम पूर्ण केले. मात्र, विहिरींचे काम पूर्ण होऊनही संबंधित शेतकऱ्यांच्य खात्यावर अनुदानाची रक्कम जमा झालेली नाही.

रामपुरी कॅम्प परिसरात प्लास्टिक प्रतिबंधक मोहिम, ५ हजारांचा दंड वसूल

अमरावती/का.प्र.
अमरावती महानगरपालिकेच्या वतीने रामपुरी कॅम्प परिसरात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले,अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे तसेच सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले झोन क्र.१ यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरातील विविध आस्थापनांची तपासणी केली. यावेळी प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, परिसरातील स्वच्छता तसेच ओला व सुका कचरा वर्गीकरणासाठी दोन डस्टबिनची उपलब्धता याबाबत पाहणी करण्यात आली.

मोहिमेदरम्यान एन. बी. श्रृंगारे यांच्याकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ५,००० इतका दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेत एकूण ५,००० दंडाची वसुली झाली.या कारवाईत प्लास्टिक नोडल अधिकारी ए.के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू ढिक्याव, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी,निखिल खंगाळे,मेघराज ढेनवाल, इमरान खान आणि रोहित हडाले उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या वतीने प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिक व व्यावसायिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यापीठात स्टार्ट-अप एक्स्पो - २०२६ उत्साहात
नवउद्योजक, स्टार्टअप व इनोव्हेटर्सचा उत्स्फूर्त सहभाग

अमरावती/का.प्र.
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) च्या वतीन व नवराष्ट्र युथ फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित स्टार्ट-अप एक्स्पो - २०२६ हा उपक्रम अमरावती शहरातील सायन्सकोर मैदान येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाला. हा एक्स्पो अमरावती युथ फेस्टिवल - २०२६ चा एक महत्त्वाचा भाग होता.

या स्टार्ट-अप एक्स्पोमध्ये अमरावतीसह विदर्भातील नवउद्योजक,स्टार्टअप्स,इनोव्हेटर्स, विद्यार्थी व युवा उद्योजकांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला. सहभागी स्टार्टअप्सनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना, उत्पादने, प्रोटोटाइप, बिझनेस मॉडेल्स आणि व्यवसाय योजनांचे आकर्षक स्टॉलच्या माध्यमातून प्रदर्शन केले. नागरिक, विद्यार्थी आणि युवा वर्गाने स्टॉल्सना भेटी देऊन विविध नवकल्पनांची माहिती घेतली. स्टार्ट-अप एक्स्पोचा उद्घाटन समारंभ मोठया उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा उद्योग केंद्र, अमरावतीचे निलेश निकम, विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनचे अधिष्ठाता प्रा.अरुण हराणे, इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या प्रमुख व संचालक प्रा. स्वाती शेरेकर तसेच नवराष्ट्र युथ फाऊंडेशन चे संस्थापक हिमांशू पाटील,संकल्प गवई, इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव,व्यवस्थापक अमोल हिरुळकर प्रामुख्याने उपस्थित होते.

स्टार्टअप्सच्या नाविन्यपूर्ण कल्पना,उत्पादनांची क्षमता, व्यवसाय मॉडेल, बाजारपेठेची शक्यता आणि उद्योजकीय दृष्टिकोनाचे मूल्यांकन करण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ रायजिरा हॉटेल मॅनेजमेंटचे अखिलेश राठी, खत्री ॲन्ड असोसिएट्सचे सी.एस.खत्री, प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंटचे प्रतिक देशमुख, एफएमसीजी तज्ज्ञ गोपाल पांडे, विद्यापीठाच्या केमटेकचे प्रशांत शिंग्वेकर, सीए दिपक झंवर परीक्षक म्हणून उपस्थित होते. या तज्ज्ञांनी स्टार्टअप्सशी संवाद साधून त्यांच्या व्यवसाय कल्पना,उत्पादनांची उपयुक्तता, बाजारपेठेतील संधी आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यता याबाबत मार्गदर्शन केले.

या स्टार्ट-अप एक्स्पोमध्ये रेव्ह इन्नोव्हेशन प्रा. लि. या कंपनीने अमरावतीत प्रथमच मॅन्युफॅक्चर केलेले इव्ही बुलेट मुख्य आकर्षण ठरले. कंपनीने आपल्या इलेक्ट्रिक बुलेटचे विविध मॉडेल्स एक्स्पोमध्ये प्रदर्शित केले.

संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र अनिवार्य
१८ ते ३१ ऑगस्टला विशेष शिबीर

अमरावती/का.प्र.
संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी अर्थात हयात प्रमाणपत्र (डिएलसी) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अमरावती तहसील कार्यालयाने १८ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विशेष शिबीर आयोजित केले आहे. सर्व लाभार्थ्यांना विना विलंब हयात प्रमाणपत्र काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक लाभार्थ्याने बेनिफीशरी सत्यापन ॲपच्या माध्यमातून हयात डिजीटल लाईफ सर्टिफीकेट (डिएलसी) काढून आपण हयात असल्याचे प्रमाणित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.हे प्रमाणपत्र सादर केल्यास संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांचा शासकीय लाभ सुरु राहील. या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी अमरावती शहर संजय गांधी तहसील कार्यालयामार्फत विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे.सर्व लाभार्थ्यांनी विना विलंब हे प्रमाणपत्र काढावे असे तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. लाभार्थी मोबाईलवर संबंधित ॲप डाउनलोड करून स्वतः डिजिटल लाइफ सर्टिफिकेट तयार करू शकतात किंवा जवळच्या सेतू केंद्रात जाऊन डिजिटल लाइफ सर्टिफिकेट काढून घेऊ शकतात तसेच तहसील कार्यालयातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

अडीच लाखांची लाच घेताना राज्य उत्पादन शुल्क विभागाचा दुय्यम निरीक्षक आकाश जाधव ACB च्या जाळयात

अचलपूरः- अचलपूर येथील महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या (एक्साइज) कार्यालयातील दुय्यम निरीक्षक आकाश जाधव (वय ३६) याला अडीच लाख रुपयांची लाच घेताना नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) आज (दि.२४)रंगेहाथ अटक केली.

परतवाडा-चिखलदरा मार्गावरील गावाजवळ प्रस्तावित बिअर बारच्या परवान्यासाठी एका व्यावसायिकाने अचलपूर कार्यालयात अर्ज केला होता. हा परवाना मिळवून देण्यासाठी दुय्यम निरीक्षक आकाश जाधव याने स्वतःसाठी ३ लाख रुपये आणि वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नावाने ५ लाख रुपये, अशा एकूण ८ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती स्वतःसाठी अडीच लाख रुपये घेण्याचे ठरले होते.

सततच्या त्रासाला कंटाळून संबंधित व्यावसायिकाने या प्रकरणाची तक्रार थेट नागपूर एसीबी कार्यालयाकडे केली. त्यानंतर नागपूर एसीबीचे पोलीस निरीक्षक राहुल चव्हाण आणि त्यांच्या पथकाने गेल्या १२ दिवसांपासून सापळा रचला होता. अखेर २४ ऑगस्ट रोजी दुपारी अचलपूर रोडवरील राज्य उत्पादन ☞(पान २ वर)

अमरावती ऐवजी नागपूरला तक्रार-

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अचलपूर कार्यालयातील लाचखोरी प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. रेस्टॉरंट अँड बारच्या परवान्यासाठी तब्बल ८ लाखांची लाच मागितल्याचा आरोप असून, याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक आकाश जाधव यांच्यावर कारवाई करण्यात आली असून ते सध्या पोलिसांच्या ताब्यात असल्याची माहिती आहे.

या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, तक्रारीतील माहितीनुसार मागण्यात आलेल्या ८ लाखांपैकी ५ लाख रुपये राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक गर्जे यांना देण्यात येणार असल्याचा आरोप समोर आला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अधीक्षक गर्जे यांची भूमिका तपासावी आणि दोष आढळल्यास त्यांनाही आरोपी करण्यात ☞(पान २ वर)

गुणनियंत्रण विश्लेषणात जिल्ह्यातील सोयाबीन बियाण्यांचे १८९ नमुने अप्रमाणित

बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीविरोध जिल्ह्यातून २ हजारांवर तक्रारी

कंपनी विरोधात एफआयआर दाखल

अमरावती/प्रतिनिधीः- सोयाबीन बियाण्यांच्या विश्लेषणासाठी अमरावती जिल्ह्यातील ४६४ नमुन्यांपैकी ३८५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून १७ ऑगस्ट पर्यंत यातील १८९ नमुने अप्रमाणित आढले आहेत. यासंदर्भात बियाणे उत्पादक कंपनीवर कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले.

याबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांची दखल घेण्यात आली आहे. सोयाबीन बियाण्यांच्या एकूण ३ हजार १५७ प्राप्त तक्रारींपैकी २ हजार ३२६ तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

विविध कंपन्यांचे सोयाबीन बियाणे उगवले नसल्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी तसेच कंपन्यांवर कार्यवाही करण्याविषयी वृत्तपत्रांमध्ये विविध वृत्त प्रसारित झाले होते. याची कृषी विभागाने गंभीर दखल घेत जिल्ह्यात पुरवठा झालेल्या सोयाबीन बियाण्यांचे वितरकनिहाय,वाणनिहाय,लॉट निहाय माहिती आदी सादर करण्याचे आदेश बियाणे उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींची पाहणी विहित वेळेत होण्यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती गठित करण्यात आल्या. या समित्यांमार्फत प्रातिनिधिक स्वरुपात कंपनीनिहाय आणि लॉटनिहाय तक्रारींची पाहणी सुरु असून उर्वरीत तक्रारींची पाहणी उपसमित्यांद्वारे करण्यात येत आहे. १७ ऑगस्ट पर्यंत घेतलेल्या जिल्ह्यातील ४६४ नमुन्यांपैकी ३८५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून यातील १९६ नमुने प्रमाणित तर १८९ नमुने अप्रमाणि आढले आहेत. बियाणे उत्पादक कंपन्यांवर बियाणे कंपनी कायदा १९६६ आणि बियाणे अधिनियम ☞(पान २ वर)

एसटी तिकीट दरवाढीविरोधात काँग्रेसचे आंदोलन

-माजी आमदार विरेंद्र जगताप यांचे नेतृत्व

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- उड्डाणपूल सुरू होऊन दोन वर्षे उलटली असून या मार्गावरून एस.टी. बससेवाही सुरू आहे. मात्र, एस.टी. महामंडळाकडून अद्याप जुन्या लांब मार्गानुसार तिकीटदर आकारले जात असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे. त्यामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, पालक, कामगार आणि सर्वसामान्य प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या वतीने चांदूर रेल्वे एस.टी. डेपो व्यवस्थापकांना घेराव घालून आंदोलन करण्यात आले. चांदूर रेल्वे ते सोनगाव, कळमगाव, कळमजापूर, बग्गी, जवळा निंभा

आणि राजुरा या मार्गांवरील तिकीट व पासचे दर तातडीने कमी करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

गेल्या दोन वर्षांपासून प्रवाशांकडून अतिरिक्त आकारण्यात आलेली रक्कम त्यांना परत करावी, अशी मागणीही ☞(पान २ वर)

'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' संकल्पनेतून शिवसेना विस्तार पर्वाचा भव्य शुभारंभ

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती जिल्ह्यात शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला नवी दिशा देणाऱ्या 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' या संकल्पनेतून भव्य शिवसेना विस्तार पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे व डॉक्टर श्रीकांत शिंदे तथा शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाला बच्च कडू यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. गावागावात शिवसेना शाखांची उभारणी, कार्यकर्त्यांची संघटनात्मक

बांधणी आणि वृक्षारोपणाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला जाणार आहे. रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता अचलपूर येथून या शिवसेना विस्तार पर्वाचा शुभारंभ होणार आहे. अचलपूर ,पथ्रोट , अंजनगाव ☞(पान २ वर)

मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमनाबाबत व्यापक मोहिम हाती घेणार- आशिष येरेकर

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्हा स्त्री रूग्णालयातील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमन यंत्रणा असावी, यासाठी पाहणी करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या गर्दीच्या ठिकाणी आगीचा प्रकार घडू नये, यासाठी व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज फायर ऑडीट आणि फायर सेफ्टी ऑडीट, इतर उपाययोजनांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, जिल्हा स्त्री रूग्णालयात घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यावर भर दिला. यासाठी जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापना आणि शासकीस कार्यालयांची येत्या आठ दिवसांत पाहणी करावी. यात प्रामुख्याने अग्निशमनाबाबत उपाययोजना सुचविण्यात याव्यात. तसेच या सूचना ☞(पान २ वर)

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाच्या लाभ

सोमठाना खुर्दच्या लाभार्थ्यांना मोबदल्यासाठी आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः- मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सोमठाना खुर्द येथील ४२ शेतमुल्यांकनधारक, २१ वनहक्कधारक आणि ११२ घरमुल्यांकनधारकांकरिता निधी उपलब्ध झाला असून काही लाभार्थ्यांना मोबदला रक्कम वितरीत करण्यात आली आहे. आवश्यक दस्तऐवजा अभावी उर्वरित लाभार्थ्यांना मुल्यांकन रक्कम अदा करण्यास अडचण येत आहे, अशा लाभार्थ्यांना अकोट वन्यजीव विभाग अकोट येथे तातडीने दस्तऐवज सादर करण्याचे आवाहन, अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक आर.एस.टोलिया यांनी केले आहे.

वर्ष २०१२ च्या शासन निर्णयानुसार सोमठाना खुर्द या गावाचे वर्ष २०१३-१४ मध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. या गावातील शेतमुल्यांकनधारक आणि वनहक्कधारकांना मुल्यांकनाची ४ पट रक्कम देय असून यातील १ पट मुल्यांकन रक्कम व त्यावरील ३० टक्के दिलासा रक्कम वजा करून उर्वरीत मोबदला रक्कम अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु काही ☞(पान २ वर)

शुभम राऊतच्या कुटुंबाला आर्थिक आधार द्या

जनराज संघटनेची तहसीलदार व ग्रामपंचायतकडे मागणी

तिवसा/प्रतिनिधीः- ग्रामपंचायत गुरुदेवनगर हद्दीतील 'पिंपळाची विहीर' परिसरात घडलेल्या दुर्दैवी घटनेत दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी शुभम राऊत या युवकाचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर जनराज संघटनेने राऊत कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत व सर्वतोपरी आधार देण्याची मागणी केली आहे.तसेच घटनास्थळावरील विहिरीची सुरक्षिततेच्या दृष्टीने दुरुस्ती करण्याची मागणी केली.

स्थानिक प्रशासनाने उपलब्ध शासकीय योजना व नियमांच्या चौकटीत राऊत कुटुंबाला शक्य ती आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी तातडीने प्रयत्न करावेत तसेच संबंधित जमीन मालकाने व समाजातील सक्षम नागरिकांनी मानवतावादी दृष्टिकोनातून राऊत कुटुंबाच्या पाठीशी उभे राहून आर्थिक मदत करावी, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान जनराज संघटनेने 'पिंपळाची विहीर' तातडीने सुरक्षित करण्याची मागणी केली आहे. विहिरीभोवती मजबूत संरक्षक व्यवस्था उभारावी किंवा तांत्रिक व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक असल्यास ती बुजविण्यात यावी, अशी मागणीही तहसीलदार मयुर कळसे व ग्रामपंचायत पदाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदन देताना जनराज संघटनेचे अध्यक्ष विनोद मुंगले, प्रशांत पांडे, अंकुश थोरात, सागर इंगळे, निरंजन इंगळे यांच्यासह अन्य जनसेवक उपस्थित होते.

खरीप हंगामासाठी खतांचा पुरवठा सुरळीत

-३४ हजार ४६२ मेट्रीक टन युरीयाचा पुरवठा

-खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात एकही तक्रार नाही

अमरावती/प्रतिनिधीः- खरीप हंगामासाठी जिल्ह्यात खतांचा पुरवठा सुरळीत झाला असून १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत ३४ हजार ४६२ मेट्रीकटन (मे.ट.) युरिया, १० हजार २७० मे. ट. डिएपी, ५ हजार ३७४ मे.ट. एमओपी, ४५ हजार ७९९ मे.ट. संयुक्त खते आणि २० हजार ५२६ मे. ट. एसएसपी खतांचा पुरवठा झाल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले. युरीया व डिएपी खतांच्या तुटवडयाबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांबाबत अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे. खरीप हंगामात खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात आजपर्यंत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झाली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यात एप्रिल महिन्यात खतांच्या रॅक लागण्यास विलंब झाला मात्र लवकरच पुरवठा सुरळीत करण्यात आला. रासायणीक खतांच्या किमंतीत कोणतीही वाढ झाली नाही. विशेषत: केंद्र शासन युरीयाच्या किंमती नियंत्रीत करीत असल्याने त्याच्या किंमतीत दरवाढ झालेली नाही. तसेच डिएपीच्या किमंतीत वाढ नाही. फोस्फेटिक आणि पोटॅशिक खतांच्या बाबतीत केंद्र शासनाचे पोषणतत्व आधारीत अनुदान लागू असल्याने किंमतीत वाढ झाली नाही. ☞(पान २ वर)

डफरिन दुर्घटनेमुळे भाजपचा दहीहंडी उत्सव रद्द

अमरावतीं/प्रतिनिधीः- डफरिन जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या NICU मध्ये झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेत ३ नवजात बालकांचा अंत झाला. या मन हेलावणाऱ्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आगामी ६ सप्टेंबर रोजी अमरावतीत राजकमल चौकात आयोजित भव्य दहीहंडी स्पर्धा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच उत्सवावरील खर्च वाचवून पीडित व बाधित कुटुंबांना आर्थिक मदत देण्याची

घोषणा करण्यात आली आहे.

आज आयोजित पत्रकार परिषदेत महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी ही घोषणा केली. या दुर्घटनेमुळे संपूर्ण शहर आणि भाजप परिवार सुन्न झाला असून अशा दुःखाच्या प्रसंगी दहीहंडीचा उत्सव साजरा करणे अयोग्य असल्याने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. या दहीहंडी उत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री आशिष शेलार, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, खासदार कंगना राणावत, अभिनेते रणवीर सिंह, विक्की कौशल, अनन्या पांडे, प्राजक्ता माळी, सई ताम्हणकर, सायली संजीव यांसह अनेक नेते व कलाकार उपस्थित राहणार होते; मात्र आता हा कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे. या दुर्घटनेतील पीडित कुटुंबांचे ☞(पान २ वर)

बाधित कुटुंबांना आर्थिक मदत देणार

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त माय भारत केंद्राकडून विविध उपक्रमांचे आयोजन

अमरावती/प्रतिनिधीः- माय भारत केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २७ ऑगस्ट रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २७ ऑगस्ट रोजी देशभरातील १६०० ठिकाणी सहभागी होणाऱ्या आठ लाखांहून अधिक युवकांना आभासी माध्यमातून संबोधन करणार आहे. याद्वारे देशभरातील युवक आभासी माध्यमातून एकत्र जुळणार आहेत. पंतप्रधानांच्या संबोधनानंतर येथील पोटे पाटील महाविद्यालय आणि बियाणी महाविद्यालयात सकाळी १० वाजता कार्यक्रम होणार आहे. या अंतर्गत युवक संवाद व विविध सहभागात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. माय भारत स्वयंसेवक आणि स्थानिक खेळाडू यांच्यात विशेष युवा संवाद सत्र आयोजित करण्यात येणार आहे. गेल्या १२ वर्षांत भारताच्या क्रीडा ☞(पान २

सुषमा अंधारे अमरावती दौऱ्यावर

-डफरिन रुग्णालयाला देणार भेट

अमरावती/प्रतिनिधीः- शिवसेना (उबाठा) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे २६ ऑगस्ट रोजी अमरावती दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान त्या सकाळी १० वाजता डफरिन रुग्णालयाला भेट देऊन पाहणी करणार आहेत.

सकाळी १० वाजता सुषमा अंधारे डफरिन रुग्णालयाची पाहणी करतील. सकाळी ११ वाजता त्या अमरावती येथे पत्रकारांशी संवाद साधतील.

बाळापूरचे शिवसेना (उबाठा) आमदार नितीन देशमुख हेदेखील या दौऱ्यात त्यांच्यासोबत उपस्थित राहणार आहेत. शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी अंधारे यांच्या या अमरावती दौऱ्याबाबत अधिकृत माहिती दिली आहे.

कृषी पर्यटन केंद्र संचालकांची एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

अमरावती/प्रतिनिधीः- पर्यटन संचालनालय प्रादेशिक, अमरावती अंतर्गत अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांसाठी १८ ऑगस्ट २०२६ रोजी 'मामाचं वावर' कृषी पर्यटन केंद्र, मौजे वळती, ता. चिखली, जि. बुलढाणा येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील विविध जिल्ह्यांतून आलेले कृषी पर्यटन केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक विजय जाधव, शाश्वत विकास केंद्र (अमरावती) चे गणेश चौधरी, कृषी पर्यटन केंद्र संचालक समिती (महाराष्ट्र राज्य) चे अध्यक्ष लहू अवताडे आणि कॅनव्हास फाउंडेशन, द चॅरिटेबल ट्रस्ट (अमरावती) चे आशिष शेरेकर उपस्थित होते.

कार्यशाळेत उपसंचालक विजय जाधव यांनी महाराष्ट्राचे पर्यटन धोरण २०२४ अंतर्गत कृषी पर्यटन, साहसी पर्यटन, प्रोत्साहन, होमस्टे, पर्यटन व्हिला, व्हॅकेशन होम अशा अधिकृत नोंदणी प्रक्रिया आणि कृषी पर्यटनाच्या ☞(पान २ वर)

विजय वडेट्टीवार आज अमरावती दौ-यावर

अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र विधानसभेचे विधिमंडळ गटनेते (काँग्रेस पक्ष) तथा लोकलेखा समितीचे अध्यक्ष, आमदार विजय वडेट्टीवार हे बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

या दौऱ्यादरम्यान सकाळी ९.०० वा. जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथे नवजात बालकांच्या झालेल्या मृत्यूच्या संदर्भात रुग्णालयाची पाहणी करून संबंधित परिस्थितीची माहिती घेणार आहेत.

त्यानंतर सकाळी १०.०० वा. शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे विजय वडेट्टीवार यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे.

२८ लाखांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर जप्तीची वेळ

अधिग्रहित जमिनीच्या वाढीव मोबदल्याचे प्रकरण; न्यायालयीन बेलीफ दाखल होताच प्रशासनाची धावपळ, ४ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

वर्धा : रस्त्यासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला आणि त्यावरील व्याजाची सुमारे २८ लाख रुपयांची रक्कम अदा न केल्याने जिल्हाधिकारी कार्यालयावरच जप्तीची नामुष्की ओढवण्याची वेळ मंगळवारी आली. न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणीसाठी याचिकाकर्ते आणि न्यायालयीन बेलीफ

जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होताच प्रशासनाची एकच धावपळ उडाली. दिवसभर अधिकारी आणि याचिकाकर्त्यांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सुरू होत्या. अखेर प्रशासनाने न्यायालयाकडे मुदतवाढ मागितल्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंतची मुदत मिळाल्याने जप्तीची कारवाई तूर्तास टळली.

सुधाकर कृष्णराव उमाटे आणि कमलाकर कृष्णराव उमाटे यांची २२ आर जमीन सन २००२ मध्ये सेवाग्राम-दत्तपूर मार्गासाठी ☞(पान २ वर)